म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक लाताम विश्वनाथ

पुस्तकाचें नांव भूगोल विषयेची मूलतत्वे भा. ३२

सन

५१

संक्र.

भूगोल-विषयेची मूलतत्वे (भा. ३२)
(भू-प्रवास)

The Department of Public Instruction, Bombay.

# ELEMENTARY GEOGRAPHY.

## PART III.

## ( GEOGRAPHY OF THE WORLD. )

BY

RÁO BÁHÁDUR SITÁRÁM V. PATAVARDHAN, B. A.

SEVENTH EDITION.—10,000 Copies.

*Registered for Copy-right under the Government of India's Act XXV of* 1867.

Bombay:

GOVERNMENT CENTRAL BOOK DEPÔT.

1898.

( All rights reserved. )

*Price One Anna Nine Pies.*

Bombay:
PRINTED AT THE EDUCATION SOCIETY'S PRESS.

मुंबई इलाख्यांतील सरकारी विद्याशाळाखातें.

# भूगोलविद्येचीं मूलतत्त्वें

## भाग ३.

( संक्षिप्त भूगोलवर्णन. )

हें पुस्तक,

रावबाहादुर सीताराम विश्वनाथ पटवर्धन, बी. ए.
ह्यांनीं केलें.

---

आवृत्ति सातवी:—४०,००० प्रती.

---

ह्या पुस्तकाची मालकी सन १८६७ च्या २५ व्या आक्टाप्रमाणें नोंदली असे.

मुंबई:
गवर्नमेंट सेंट्रल बुक डिपो.
सन १८९८ इ०.

---

ह्या पुस्तकासंबंधी सर्व अधिकार सरकारानें आपल्याकडे ठेविले आहेत.

---

किंमत पावणेदोन आणे.

मुंबई:
"एज्युकेशन सोसायटी"च्या छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

नवीन सुधारलेल्या इयत्तांप्रमाणें मराठी पांचवी व सहावी इयत्ता शिकणाऱ्या मुलांस भूगोलवर्णनाची माहिती असणें अवश्य आहे; परंतु अशी माहिती सुलभ रीतीनें थोडक्यांत मिळावी, ह्या हेतूनें हें लहानसें पुस्तक मेहेरबान डैरेक्तर साहेब बहादूर ह्यांचे हुकुमानें तयार केलें आहे.

मेहेरबान होप साहेब बहादूर ह्यांनीं केलेले गुजराथी भूगोलाची प्रस्तावना पुढें घेतली आहे. तिचा उपयोग नकाशा शिकवितेवेळीं पुष्कळ होईल अशी उमेद आहे.

"जेथें मुलें बसलीं असतील त्या जागेचा शिक्षकानें फळ्यावर नकाशा काढावा व नकाशा काढतेवेळीं मुलांस सूचक प्रश्न करावे. मुलांचे साहाय्यानें नकाशा संपल्यावर व त्याविषयींची त्यांस पूर्ण माहिती झाल्यावर, तो एका मोठ्या जागेचा लहान नकाशा आहे असें शिक्षकानें त्यांस नीट समजावून सांगावें.

जागा लांबट असल्यास शिक्षकानें चौरस आकृति काढून हा बरोबर आहे किंवा नाहीं असें मुलांस विचारावें, व त्यांजकडून बरोबर उत्तरें काढून घेऊन त्याप्रमाणें नकाशाची आकृति नीट करावी. असें केल्यानें मुलांची समजूत चांगली होत जाईल. जागा चौरस असल्यास प्रथम लांबट आकृति काढावी. ह्याप्रमाणें शिक्षकानें अशा कांहीं युक्तींची योजना करावी कीं, जेणेंकरून आपण जें कांहीं शिकवितों तें मुलांना बरोबर समजतें किंवा नाहीं, हें आपणांस कळेल व तें मुलांचे ध्यानांत चांगलें राहील. नंतर उत्तर, दक्षिण, पूर्व व पश्चिम ह्या दिशा त्यांना नीट समजावून द्याव्या.

मग प्रत्येक दिशेस आपल्या भोंवतालचीं जितकीं घरें फळ्यावर दाखवितां येतील तितकीं दाखवून एका रस्त्याचा नकाशा पूर्ण करावा. हा नकाशा मुलांस समजल्यावर तो पुसून टाकून दुसरा लहान त्या ऐवजीं काढावा. मग त्याचे प्रत्येक बाजूस मोटमोठ्या

रस्त्यांपैकीं कांहीं रस्ते जोडावे, ह्याप्रमाणें सर्व शहराचा किंवा खेड्याचा नकाशा पुरा करावा. गांवाभोंवताला तट असल्यास तो रेघांनीं दाखवावा. ह्या नकाशाची मुलांस चांगली माहिती झाली ह्मणजे तो पुसून टाकून त्याऐवजीं बारीक माहिती शिवाय करून दुसरा लहान नकाशा फक्त गांवकुसाचा काढावा.

मग ह्याला मुलांच्या माहितीचीं भोंवतालचीं गांवें जोडावीं. नंतर प्रत्येक दिशेकडील पलीकडच्या गांवांचीं नांवें मुलांस विचारावीं. उत्तरें बरोबर न आल्यास त्यांच्या चुक्या दुरुस्त कराव्या. आतां अंतर ह्मणजे काय? हें मुलांस समजावून सांगावें. भोंवतालच्या गांवांचीं नांवें अंतराचे मानानें लिहावीं ह्मणजे गांवांच्या व शहरांच्या नांवांमधील जें नकाशावर कमी जास्ती अंतर दिसतें तें निरर्थक नाहीं, असें मुलांस कळूं लागेल.

ह्याप्रमाणेंच टेंकड्या, तळीं, नद्या व आणखीं जें कांहीं त्या गांवाजवळ असेल तें त्या नकाशावर दाखवावें. ज्या तालुक्यांत किंवा परगण्यांत शाळा असेल त्याचा ह्याप्रमाणेंच नकाशा काढावा. ह्याची चांगली माहिती झाल्यावर शिक्षकानें त्याऐवजीं दुसरा लहानसा नकाशा काढून त्याला दुसरा तालुका जोडावा; व त्याच्या दिशा, मर्यादा वगैरे दाखवाव्या. मग तो दुसरा तालुका नुसताच मोठ्या आकाराचा काढावा आणि त्यावर त्या तालुक्याची विशेष बारीक माहिती दाखवावी.

अशा रीतीनें सर्व जिल्ह्याचा नकाशा मुलांस शिकवावा, परंतु ज्या तालुक्यांत शाळा असेल त्याखेरीज दुसऱ्या तालुक्यांची विशेष बारीक माहिती देऊं नये. प्रदेशाचे मानानें जसजसा नकाशा वाढेल तसतशी कमी माहिती द्यावी. नकाशावर नद्या वांकड्या रेघांनीं, तळीं वर्तुळांनीं, गांवें व शहरें टिंबांनीं दाखविलीं आहेत, असें मुलांस समजावून द्यावें.

ह्याप्रमाणेंच इतर माहिती सांगावी. सर्व जिल्हे व संस्थानें अशीं एकत्र केलीं ह्मणजे मुलांस सर्व महाराष्ट्राची माहिती होईल. महाराष्ट्राला गुजराथ व मुंबई इलाख्याचे दुसरे भाग एकामागून

एक जोडावे; परंतु गुजराथ व इतर भाग ह्यांचा माहिती महाराष्ट्रापेक्षां कमी द्यावी.

मुंबई इलाख्याची माहिती मुलांस चांगली झाली ह्मणजे मद्रास, बंगाल, व इतर प्रांत ह्यांची माहिती शिकवावी. असें करितां करितां हिंदुस्तान देश पुरा करावा.

मर्यादा, पर्वत, नद्या आणि शहरें एवढीं मात्र फळ्यावर काढून दाखवावीं. नकाशा काढितांना समुद्र, बेटें वगैरे दाखविण्याचा जेव्हां जेव्हां प्रसंग येईल तेव्हां तेव्हां त्यांच्या व्याख्या समजावून द्याव्या, हिंदुस्तान झाल्यावर एशियाचे नकाशास सुरुवात करावी. ह्यामध्यें मुख्य मुख्य देशांचीं नांवें, त्यांच्या मर्यादा व एक किंवा दोन मोठाले पर्वत अथवा नद्या, एवढें मात्र दाखवावें. जास्ती दाखवूं नये. एशिया झाल्या नंतर त्याला युरोपाचा नकाशा जोडावा व त्याच्या मर्यादा आणि आकृति हीं नीट समजावून दिल्यावर यांतील देशांचीं नांवें मात्र सांगावीं. मग त्याचप्रमाणें आफ्रिकेस सुरवात करावी; परंतु त्यांतील देश व पर्वत यांचीं नांवें सांगूं नयेत.

अशा रीतीनें नकाशा शिकवीत असतां संयोगीभूमि, सामुद्रधुनी वगैरे दाखविण्याचा प्रसंग आल्यास तीं कशीं झालीं आहेत हें प्रथम समजावून देऊन नंतर त्यांचीं नांवें व व्याख्या सांगाव्या; परंतु त्यांचा अर्थ मुलांस चांगला समजल्यावांचून त्यांचीं नुसतीं नांवें सांगूं नयेत.

मग ह्याच पद्धतीनें अमेरिकेचा नकाशा शिकवावा. नंतर महाद्वीपांचे मधील महासागर दाखवून त्यांचीं नांवें सांगावीं. इतकें शिकविल्यावर पृथ्वीच्या आकाराची थोडक्यांत माहिती करून द्यावी.

ही शिक्षणपद्धति चालू केल्यानें मुलांना आपल्या प्रांताची विशेष माहिती होईल; व आपले प्रांतापासून दुसरे प्रांत जसजसे दूर असतील, तसतशी त्यांची त्यांना कमी माहिती होईल. इतकें शिकविल्यावर शिक्षकानें पुन: मुळापासून शिकविण्यास सुरवात करून पूर्वींपेक्षां जास्ती माहिती सांगावी. ही माहिती शिकवितांना शिक्षकानें मुलांच्या मनास गोडी लागेल व त्यांस ध्यानांत ठेवणें सोपें पडेल याविषयीं होईल तितकें झटावें. व त्यासाठीं ज्या गोष्टी

त्यांना माहित आहेत त्यांचीं उदाहरणें द्यावीं. जसें, ज्या तालुक्यांत शाळा आहे त्यापेक्षां अमुक अमुक तालुका इतका मोठा किंवा लहान आहे.

शिकवितेवेळीं सरोवर ह्मणजे काय हें मुलांस आपले गांवीं जो पाण्याचा तलाव किंवा टांकें असेल त्याची तुलना करून प्रथम सरोवराची कल्पना मुलांचे मनांत आणून द्यावी. पर्वताविषयीं माहिती करून देणें असेल तेव्हां आपले शेजारचा एखादा उंचवटा किंवा टेंकडी दाखवून त्यांचे मनांत पर्वताची कल्पना आणून द्यावी.

शहरांचीं नांवें सांगतेसमयीं त्या शहरांत जे जे प्रख्यात पदार्थ तयार होतात त्यांसह सांगितलीं असतां सहज ध्यानांत राहतातः—"सोलापूर सांगतांना त्यांत तयार होणाऱ्या लुगड्यांविषयीं सांगावें." "बार्शीचें नांव निघेल तेव्हां त्यांतील कापसाचा व्यापार सांगावा." शहरासंबंधी एकादी दंतकथा किंवा गोष्ट असेल तर तीही थोडक्यांत सांगावी. उ० अहमदनगर, सातारा, जुन्नर, आणि पुणें या शहरांविषयीं सांगतांना, अवरंगजेब, शाहूराजा, शिवाजी, आणि पेशवे ह्यांविषयीं अनुक्रमें कांहीं गोष्टी सांगितल्यास तीं शहरें मुलांचे ध्यानांत पक्कीं ठसतील व त्यांचें मन त्यांकडे लागेल.

फळ्यावर नकाशा काढावा ह्मणून वर सांगितलेंच आहे. परंतु तालुका, जिल्हा किंवा प्रांत वगैरेचा नकाशा ह्याप्रमाणें शिकविल्यावर मुलें जें कांहीं शिकलीं असतील त्याची तुलना छापील नकाशाशीं त्यांस करितां यावी, ह्मणून तो त्यांच्या पुढें मांडावा. प्रत्येक विषय ह्याप्रमाणें शिकविल्या नंतर तोच पुनः बहुतकरून शिकवावा. प्रत्येक धडा चांगला व चित्तवेधक होईल अशा रीतीनें शिकवावा.

# अनुक्रमणिका.


भाग १ ला. साधारण माहिती. पृष्ठ.

प्रकरण १ लें. पृथ्वीचा आकार. ... ... ... १

प्रकरण २ रें. दिशा. .... ... ... ... ... २

प्रकरण ३ रें. भूगोलविषयींतील शब्दांच्या व्याख्या. २

प्रकरण ४ थें. जमीन आणि पाणी ह्यांचे मुख्य विभाग. ४

भाग २ रा. आशिया खंड ... ... .. ... ६

१ बलुचिस्तान ... ... ... ... ... ७

२ अफगाणिस्तान ... ... ... ... ७

३ इराण ... ... ... ... ... ८

४ अरबस्तान ... .. ... ... ... ९

५ तुर्कस्तान ... ... ... ... ... १०

६ रशियाचें राज्य ... ... ... ... १२

७ जपान ... ... ... ... ... १५

८ चीनचें राज्य ... ... ... ... १५

९ कोरिया ... ... ... ... ... १८

१० इंडियन चायना ... ... .. ... १८

११ सिंहलद्वीप ऊर्फ सिलोन ... ... ... २०

१२ हिंदुस्तान ... ... ... ... ... २२

भाग ३ रा यूरोप खंड ... ... ... ... २६

१ ग्रेट ब्रिटन आणि आयर्लंड ... ... २८

२ फ्रान्स ... ... ... ... ... ३१

३ स्पेन देश ... ... ... ... ... ३२

४ पोर्तुगाल ... ... ... ... ... ३३

५ बेलज्यम् ... ... ... ... ... ३४

६ हालंद ऊर्फ नेदर्लंद ... ... ... ... ३४

७ देन्मार्क ... ... ... ... ... ३५

| | | पृष्ठ. |
|---|---|---|
| ८ | स्वीदन व नार्वे | ३६ |
| ९ | रशिया | ३७ |
| १० | जर्मनी | ३९ |
| ११ | स्वित्सर्लेंद | ४१ |
| १२ | इताली | ४२ |
| १३ | आस्त्रिया व हंगेरी | ४३ |
| १४ | रूमानिया | ४४ |
| १५ | सर्विया | ४५ |
| १६ | मोन्तेनेग्रो | ४५ |
| १७ | तुर्कस्तान | ४६ |
| १८ | ग्रीस | ४७ |
| भाग ४ था. | आफ्रिका खंड. | ४८ |
| १ | उत्तर आफ्रिका. | ४९ |
| १ | ईजिप्त | ४९ |
| २ | अबिसीनिया | ५१ |
| ३ | बार्बरी संस्थानें. | ५२ |
| २ | पश्चिम आफ्रिका | ५३ |
| १ | सेनिगांबिया | ५३ |
| २ | वरचा गिनी | ५४ |
| ३ | खालचा गिनी ( पोर्तुगीज पश्चिम आफ्रिका) | ५५ |
| ४ | हार्तेंतात लोकांचा देश ( जर्मन पश्चिम आफ्रिका ) | ५६ |
| ३ | दक्षिण आफ्रिका | ५६ |
| १ | आरेंजफ्रीस्तेत | ५६ |
| २ | त्रान्सवालरिपब्लिक | ५६ |
| ३ | ब्रितिश सौथ आफ्रिका. | ५६ |
| ४ | पूर्व आफ्रिका. | ५९ |
| १ | पोर्तुगीज पूर्व आफ्रिका. | ५९ |
| २ | जर्मन पूर्व आफ्रिका | ५९ |
| ३ | ब्रितिश पूर्व आफ्रिका. | ६० |
| ४ | इतालियन पूर्व आफ्रिका (इरिथ्रिया ). | ६० |

पृष्ठ.
५ मध्य आफ्रिका ... ... ... ... ... ६१
१ सहाराचें मोठें मैदान ... ... ... ६१
२ सौदन ऊर्फ नीग्रिशिया ... ... ... ६२
३ कांगोफ्रीस्तेत ... ... ... ... ... ६३
४ ब्रिटिश सेंत्रल आफ्रिका ... ... ... ६३
लगत्याचीं बेटें ... ... ... ... ... ६४
भाग ५ वा. अमेरिका. ... ... ... ... ... ६४
उत्तर अमेरिका ... ... ... ... ... ६५
१ कानदाचें राज्य ... ... ... ... ६६
२ युनैतेस्तेत्स ... ... ... ... ... ६७
३ मेक्सिको ... ... ... ... ... ६९
४ सेंत्रल ( मध्य ) अमेरिका ... ... ... ७०
५ लगत्याचीं बेटें ... ... ... ... ७१
दक्षिण अमेरिका ... ... ... ... ... ७२
१ कोलंबिया ... ... ... ... ... ७२
२ वेनेजुएला ... ... ... ... ... ७३
३ इक्वेदोर ... ... ... ... ... ७३
४ गियाना ... ... ... ... ... ७३
५ ब्राजिल ... ... ... ... ... ७४
६ पेरू ... ... ... ... ... ... ७४
७ बोलिविया ... ... ... ... ... ७४
८ चिली ... ... ... ... ... ७५
९. आर्जेंतैन कान्फेदरेशन ऊर्फ लाप्लाता ... ७५
१० पाराग्वे ... ... ... ... ... ७५
११ युराग्वे ... ... ... ... ... ७५
१२ पातागोनिया व दक्षिणेकडील बेटें ... ... ७६

| | पृष्ठ. |
|---|---|
| भाग ६ वा. ओशियानिया ... ... ... ... ... | ७६ |
| १ मलायाशिया ... ... ... ... ... | ७६ |
| २ आस्त्रालेशिया... ... ... ... ... | ७८ |
| ३ मैक्रोनेशिया ... ... ... ... ... | ७९ |
| ४ पोलिनीशिया ... ... ... ... ... | ८० |

१-४ ९१

# मराठी शाळांकरितां भूगोलविद्या

# भाग १.

## साधारण माहिती.

---

## प्रकरण १.

### पृथ्वीचा आकार.

**भूगोलविद्या** ह्मणजे पृथ्वी, तिजवरील देश व त्या देशांतील लोक यांचें वर्णन होय.

पृथ्वी गोलाकार आहे, हें पुढील गोष्टींवरून सिद्ध होतें.

१. जे लोक पृथ्वीप्रदक्षिणा करितात ते आपल्या जहाजांची दिशा न बदलतां निघाल्या ठिकाणीं पुनः परत येतात.

२. चंद्रग्रहणीं पृथ्वीची छाया चंद्रावर वाटोळी पडते.

३. जसजसे आपण उत्तरेस जातों तसतसें ध्रुवनक्षत्र उंच दिसूं लागतें.

४. पूर्वेकडील प्रांतांपेक्षां पश्चिमेकडील प्रांतांत सूर्य उशीरां उगवतो. जसें:—सूर्योदय **मद्रास** शहरापेक्षां **मुंबई** शहरीं अर्ध तास उशिरां होतो.


५. मैदानांतल्या उंच झाडापासून दूर जातांना प्रथम त्याचा खालचा भाग दिसेनासा होतो, मग मधला भाग दिसेनासा होतो, व शेवटीं शेंडा दिसेनासा होतो. तसेंच बंदरांतून सपाट दिसणाऱ्या समुद्रांत एखादें तारूं जातें, तेव्हां त्याचा खालचा भाग दिसेनासा झाल्यावर शिडें व डोलकाठ्या मात्र दिसतात. पुढें तींही एकामागून एक दिसेनाशीं होतात.

# प्रकरण २ रें.

## दिशा.

शिक्षकानें दिशांची माहिती करून देते वेळीं बाजूस लिहिलेल्या आकृतीचा उपयोग करावा.

ज्या बाजूस सूर्य उगवतो ती **पूर्व** दिशा, ज्या बाजूस सूर्य मावळतो ती **पश्चिम** दिशा, पूर्वेस तोंड करून उभें राहिलें असतां डाव्या बाजूस **उत्तर** दिशा व उजव्या बाजूस **दक्षिण** दिशा असें समजावें.




**उत्तर** आणि **पूर्व** ह्या दोन दिशांमधील कोनास **ईशान्य** दिशा ह्मणतात.

**दक्षिण** आणि **पूर्व** ह्या दोन दिशांमधील कोनास **आग्नेयी** दिशा ह्मणतात.

**उत्तर** आणि **पश्चिम** ह्या दोन दिशांमधील कोनास **वायव्य** दिशा ह्मणतात.

**दक्षिण** व **पश्चिम** ह्या दोन दिशांमधील कोनास **नैर्ऋत्य** दिशा ह्मणतात.

---

# प्रकरण ३ रें.

## भूगोलविद्येंतील शब्दांच्या व्याख्या.

प्रत्येक संज्ञेची व्याख्या सांगितल्यावर शिक्षकानें मुलांकडून तिचीं दुसरीं प्रत्यंतरें ( उदाहरणें ) घेत जावीं.

पृथ्वीचा पृष्ठभाग जमीन आणि पाणी मिळून झाला आहे. जर त्याचे चार सारखे भाग केले तर पाणी सुमारें तीन भाग व कोरडी जमीन एक भाग होईल.

## जमीन.

जमिनीचे मोठे प्रदेश, ज्यांत पुष्कळ देश असतात त्यांस **खंडें** ह्मणतात.

चोहोंकडून पाण्यानें वेष्टित जो जमिनीचा प्रदेश त्यास **द्वीप** अथवा **बेट** ह्मणतात.

तिहींकडून पाणी असून जो जमिनीचा प्रदेश चौथे बाजूनें दुसऱ्या जमिनीशीं जोडलेला असतो त्यास **द्वीपकल्प** ( बहुतेक बेट ) ह्मणतात.

जमिनीच्या दोन प्रदेशांस जोडणारा जो जमिनीचा चिंचोळा भाग त्यास **संयोगीभूमि** ह्मणतात.

जें जमिनीचें लांब टोंक समुद्रांत गेलें असतें त्यास **भूशिर** ( केप ) ह्मणतात.

जमिनीचे उंचवट्यास **टेंकडी** ह्मणतात. फार मोठा उंचवटा असल्यास त्यास **पर्वत** ह्मणतात. पर्वत अथवा टेंकड्या तळाशीं एकमेकांस जोडलेल्या असल्यास त्यांस **पर्वत** किंवा **डोंगर** ह्यांच्या **ओळी** किंवा **रांगा** ह्मणतात. पर्वत किंवा टेंकड्या ह्यांमधील सखल प्रदेश अरुंद असल्यास त्याला **खिंड** व पसरट असल्यास त्याला **खोरें** अशीं नांवें आहेत.

सपाट जमिनीचा जो मोठा प्रदेश, त्यास **मैदान** ह्मणतात.

उंच मैदानास **डोंगरसपाटी** किंवा **पठार** ह्मणतात. ज्या उतार जमिनीवरून पाणी खालीं जातें तीस **पाणलोट** ह्मणतात.

## पाणी.

पृथ्वीचे पृष्ठभागावर जें खारें पाणी आहे त्याचे पांच भाग केले आहेत. त्या प्रत्येकास **महासागर** ह्मणतात.

महासागरापेक्षां लहान असा जो जलसमूह त्यास **समुद्र** ह्मणतात,

जो समुद्राचा भाग जमिनींत लांबवर गेलेला असतो त्यास **आखात** ह्मणतात.

आखाताचें मुख रुंद असल्यास त्यास **उपसागर** ह्मणतात. दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा अरुंद भाग त्यास **सामुद्रधुनी** किंवा **संयोगोजल** ह्मणतात.

चोहोंकडून जमीन असून मध्यें जो पाण्याचा समूह असतो त्यास **सरोवर** ह्मणतात.

पर्वतापासून किंवा सरोवरापासून पाण्याचा प्रवाह निघून जो उतार जमिनीवरुन वहात जाऊन समुद्रास मिळतो त्यास **नदी** ह्मणतात.

जेथून नदीचा प्रवाह निघतो तेथें तिचा **उगम** आहे आणि जेथें ती समुद्रास मिळते तेथें तिचें **मुख** आहे असें ह्मणतात.

नदीचें मुख समुद्राच्या भरतीचें पाणी आंत घेण्याजोगें रुंद असल्यास त्यास **खाडी** ह्मणतात.

समुद्राचें पाणी चढतें त्यास **भरती** ह्मणतात; आणि समुद्राचें पाणी उतरतें त्यास **ओहटी** ह्मणतात.

---

# प्रकरण ४ थें.

## जमीन आणि पाणी ह्यांचे मुख्य विभाग.

भूगोलवेत्त्यांनीं पृथ्वीच्या पृष्ठभागाचे, **पूर्वगोलार्ध** व **पश्चिमगोलार्ध** असे दोन भाग कल्पिले आहेत. ह्या गोलार्धांपैकीं प्रत्येकांत जमीन पुष्कळ असून सभोंवतीं पाण्याचा वेढा आहे. प्रत्येक गोलार्धांत एक एक महाद्वीप आहे. त्यांपैकीं एकांत **आशिया, यूरोप** आणि **आफ्रिका** अशीं तीन खंडें आहेत. तीं खंडें ज्या गोलार्धांत सांपडतात त्यास **पूर्वगोलार्ध** ह्मणतात. दुसऱ्या महाद्वीपांत **अमेरिका** ( उत्तर आणि दक्षिण मिळून ) हें एकच खंड आहे. हें खंड ज्या गोलार्धांत सांपडतें त्यास **पश्चिमगोलार्ध** ह्मणतात.

**आशिया, यूरोप** आणि **आफ्रिका** ह्या तीन खंडांतलि लोकांस प्राचीन काळापासून परस्परांची माहिती होती. **अमेरिकाखंडाचा**

शोध इ० स० १४९२ त **कोलंबस** नावाच्या पुरुषानें लाविला. त्यापूर्वी ह्याची माहिती तीन्ही खंडांतील लोकांस नव्हती ह्मणून त्यास **नवीन महाद्वीप,** व तीन्ही खंडें मिळून **जुनें महाद्वीप** असें ह्मणूं लागले. नवीन महाद्वीप पश्चिमेकडे सापडलें ह्मणून त्यास **पश्चिमेकडील** महाद्वीप, व जुन्या महाद्वीपास **पूर्वेकडील महाद्वीप** असेंही ह्मणूं लागले.

ह्याशिवाय **आस्त्रालिया*** ह्मणून एक मोठें बेट आहे त्यालाही केव्हां केव्हां **पांचवें खंड** ह्मणतात. **आस्त्रालेशिया** व त्याचे सभोंवतालचीं बेटें व **दक्षिण पासिफिक** महासागरांतील बेटें ह्या सर्वांस **आस्त्रालेशिया** हें नाव आहे.

**यूरोपखंड** आशियाखंडाचे पश्चिमेस आहे, आणि **आफ्रिका** खंड **यूरोपखंडाच्या** दक्षिणेस आहे. **यूरोप** आणि **आफ्रिका** ह्यांच्यामध्यें **भूमध्य†** समुद्र आहे. **अमेरिकाखंड यूरोप** आणि **आफ्रिका** ह्यांच्या पश्चिमेस आहे.

**पाणी.**— पृथ्वीचे पृष्ठभागावर पांच महासागर आहेत त्यांचीं नांवें—(१) **आर्क्तिक** (उत्तर) महासागर उत्तर ध्रुवासभोंवतीं ‡ आहे. (२) **अंतार्क्तिक** (दक्षिण) महासागर दक्षिण ध्रुवासभोंवतीं आहे. (३) **पासिफिक** महासागर **आशिया** आणि **अमेरिका** ह्यांच्या मध्यें आहे. (४) **अतलांतिक** महासागर **अमेरिकेच्या** पूर्वेस आणि **यूरोप** व **आफ्रिका** ह्यांच्या पश्चिमेस आहे. (५) **हिंदी** महासागर **आशियाचे** दक्षिणेस आहे.

---

* आस्त्रालिया ह्मणजे दक्षिणेकडची जमीन.

† भूमध्यसमुद्र ह्मणजे भूमीच्या मधला किंवा भूमीनें बहुतकरून वेष्टिलेला समुद्र.

‡ पृथ्वी सूर्यासभोंवतीं फिरतांना पश्चिमेकडून पूर्वेकडे जाते. ज्या काल्पित रेषेसभोंवतीं पृथ्वी फिरते तिला तिचा आंस आणि त्या आंसाच्या दोहों टोंकांस ध्रुव असें ह्मणतात. उत्तरेकडील टोंकास उत्तरध्रुव आणि दक्षिणेकडील टोंकास दक्षिणध्रुव अशीं नांवें आहेत.

# भाग २.

## आशिया.

**मर्यादा**—आशियाचे उत्तरेस उत्तर महासागर आहे; पश्चिमेस **उरल** पर्वत, उराल नदी, **कास्पियन** समुद्र, **काकेसस** पर्वत, **तुर्की** समुद्र, **मार्मोराचा** समुद्र, आर्किपेलागो, **भूमध्यसमुद्र**, **सुवेजची** संयोगीभूमि, आणि **तांबडा** समुद्र, हीं आहेत. दक्षिणेस **हिंदी** महासागर आहे; आणि पूर्वेस **पासिफिक** महासागर आहे.

क्षेत्रफळ व लोकसंख्या ह्यांचे मानानें पाहिलें असतां **आशियाखंड** हें पांचही खंडांत मोठें आहे. **आशिया** आणि **यूरोप** हीं एकमेकांस लागून आहेत. **आशिया** आणि **आफ्रिका** ह्यांचे मध्यें **सुवेजची** संयोगीभूमि आहे. ह्या संयोगीभूमींतून एक मोठा कालवा खणून त्याच्या योगानें **भूमध्यसमुद्र तांबड्या** समुद्रास जोडला आहे. ह्या कालव्यांतून सन १८६९ सालापासून तारवें जाण्यायेण्याची सुरवात झाली. **आशिया** आणि **अमेरिका** ह्यांच्या मध्यें **बेहेरिंग**ची सामुद्रधुनी आहे.

### आशिया खंडांतील देशांचीं नांवें.

**१ बलूचिस्तान. २ अफगाणिस्तान. ३ इराण. ४ अरबस्तान. ५ तुर्कस्तान. ६ रशियाचें राज्य. ७ जपान. ८ चीनचें राज्य. ९ कोरिया. १० इंदियन चायना** ( पूर्वेकडील द्वीपकल्प ) **११ सिंहलद्वीप** ऊर्फ **सिलोन. १२ हिंदुस्तान.**

**समुद्र**—१ **तांबडा** समुद्र **अरबस्तान** आणि **आफ्रिका** ह्यांच्या मध्यें आहे; २ **अरबी** समुद्र **अरबस्तान** आणि **हिंदुस्तान** ह्यांच्या मध्यें आहे; ३ **बंगाल**चा समुद्र **हिंदुस्तान** व **इंदियन चायना** ह्यांच्या मध्यें आहे; ४ **चिनई** समुद्र **चीन**च्या दक्षिणेस आहे; ५ **पीत** समुद्र **चीन** आणि **कोरिया** ह्यांच्या मध्यें आहे; ६ **जपान**चा समुद्र **जपान** व **चिनई तार्तरी** ह्यांच्या मध्यें आहे; ७ **ओखाटस्क**चा समुद्र **सैबीरिया** आणि **कामश्चाटका** ह्यांच्या मध्यें आहे; आणि ८ **बेहेरिंग**चा समुद्र **कामश्चाटका** आणि **अमेरिका** ह्यांच्या मध्यें आहे.

ह्यांशिवाय लहान लहान समुद्र, उपसागर व सामुद्रधुन्या पुष्कळ आहेत. त्यांचें वर्णन ज्या ज्या देशांस तीं लागून आहेत त्याचे वर्णनाबरोबर केलें आहे.

## १. बलूचिस्तान.

**बलूचिस्तान** हा डोंगराळ देश **सिंध** प्रांताचे पश्चिमेस आहे. हा देश आणि **सिंध** ह्यांचे मध्यें **हाला** पर्वत आहे.

ह्या देशांत **मुसलमान** लोक रहातात, ते रानटी असून शेतकी-विषयीं अगदीं काळजी घेत नाहींत. ते पुष्कळ मेंढ्या व गुरें बाळगतात. **बोलन** घाटांतून ते **हिंदुस्तानांत** येतात आणि लोकर, कातडीं, वगैरे जिन्नस देऊन त्यामोबदला दुसरे तयार केलेले जिन्नस घेऊन जातात.

ह्या देशांत पुष्कळ संस्थानिकांचा अंमल आहे. त्यांपकीं **खिलात** येथील **खान** फार प्रसिद्ध आहे. **खिलात** हें तटबंदीचें शहर आहे. हे सर्व संस्थानिक **इंग्लिशांचे** सल्यानें वागतात. **बोलन** घाटाचे माथ्याजवळ **क्वेटा** व त्याच्या आसपासचा बराच मुलूख खुद्द **इंग्लिशांचे** ताब्यांत आहे. त्यास **ब्रिटिश बलूचिस्तान** असें ह्मणतात. **क्वेटा** येथें फौजेचें मोठें ठाणें असतें.

## २. अफगाणिस्तान.

**अफगाणिस्तान** हा देश **बलुचिस्तानचे** उत्तरेस व **पंजाबचे** वायव्येस आहे. ह्याचे उत्तरेस **हिंदुकुश** पर्वत असून पलीकडे **तार्तरी** देश आहे. हा देश आणि **पंजाब** ह्यांच्या मध्यें **सुलेमान** पर्वत आहे. ह्या देशांत कांहीं सुपीक खोरीं आहेत, परंतु एकंदरीनें हा देश डोंगराळ असून उत्तरेकडे उंच होत गेला आहे. **काबूलनदी** ह्या देशांतून वाहत येऊन **सिंधूस** मिळते.

ह्या देशात **मुसलमान** लोक राहतात. ते स्वभावानें उद्धट असून बहुतेक **पुश्तु** ( पठाणी ) भाषा बोलतात. **पंजाब, तार्तरी** व **इराण** ह्या देशाशीं त्याचा मोठा व्यापार चालतो. **घोडे**, सुकलेलीं फळें वगैरे बाहेर पाठवून त्याऐवजीं कापसाचें कापड व दुसरे कमावलेले पदार्थ ते आपले देशात नेतात. त्याचा **पंजाबांत** येण्याचा मार्ग **खैबर** घाटांतून आहे.

तेथील राजास **अमीर** ह्मणतात व तो **काबूल** येथें राहतो. हें शहर **काबूल** नदीचे कांठीं आहे. **कंदाहार** आणि **गिजनी** हीं दोन मजबूत तटबंदीचीं शहरें आहेत. उत्तरेस **बल्क** शहर आहे. हें पूर्वी व्यापाराकरितां प्रसिद्ध होतें. पश्चिमेस **हिरात** शहर आहे.

३. इराण.

इराण हा **मुसलमान** लोकांचा तिसरा देश आहे. हा **अफगाणिस्तान** व **बलूचिस्तान** ह्यांच्या पश्चिमेस आहे. **इराण**च्या उत्तरेस **पारोपामिसस** नांवाची उंच डोंगरांची ओळ व **कास्पियन** समुद्राचे किनाऱ्यावरची **एल्बुर्ज** नांवाची ओळ ह्या आहेत. ह्याचे दक्षिणेस **इराण**चें आखात आहे. ह्या देशाचा पश्चिमेकडील बहुतेक भाग व **कास्पियन** समुद्राचे किनाऱ्यावरील कांहीं प्रदेश हे सुपीक आहेत. परंतु पूर्वेकडील प्रदेश ओसाड आहे. **इराण**चें आखात **इराण** व **अरबस्तान** ह्यांच्या मध्यें आहे. ह्या आखातांत तीन प्रसिद्ध बेटें आहेत. पैकीं **करक** नांवाचें बेट **इराण**चे ताब्यांत आहे. ह्या बेटाचे किनाऱ्याजवळ मोतीं पुष्कळ सांपडतें. दुसरीं दोन **किश्म** व **आर्मझ** हीं **मस्कत**चे **इमामा**चे ताब्यांत आहेत. **आर्मझ** हें **इराणी** आखाताचे मुखापाशीं, हें आखात व **ओमान**चें आखात ह्यांच्या मध्यें आहे. **पोर्तुगीज** लोकांनीं ह्या बेटासभोवता तट बांधिला व त्यांचेवेळीं येथें व्यापारही पुष्कळ चालत होता.

येथील राजास **शहा** ह्मणतात. त्याची राजधानी **तेहरान** शहर आहे. **इस्पहान** पूर्वीची राजधानी. **शिराज** हें फार प्राचीनकाळीं राजधानीचें शहर होतें. येथें मद्य चांगलें होतें व येथेंच **सादी** आणि **हाफीज** हे दोन प्रसिद्ध कवि जन्मले. **येज्द** हें एक मोठें शहर आहे. येथें **पार्शी** ( जोरास्तरचे अनुयायी ) रहातात. उत्तरेस **ताब्रीज** शहर आहे; त्याचा **रशिया** आणि **तुर्कस्तान** ह्या देशांशीं मोठा व्यापार चालतो. **कास्पियन** समुद्रावरील **अस्त्राबाद** आणि दुसरीं शहरें ह्यांचा **रशिया**शीं मोठा व्यापार चालतो. पूर्वेस **मशद** शहर आहे; त्याचा **तार्तरी** व **हिरात** ह्यांशीं मोठा व्यापार चालतो. **इराणी** आखाताचे कांठीं **बुशायर** शहर आहे, त्याचा **हिंदुस्तान**शीं व्यापार चालतो.

ह्या देशांतील घोडे व कुत्रे फार प्रसिद्ध आहेत. येथून फळें, लोंकर, रेशीम व कापूस ह्यांचीं वस्त्रें, कातडीं, जवाहीर, अत्तर, केशर, चाकू, कांच, शस्त्रें व मातीचीं भांडीं हे जिन्नस बाहेर जातात. ह्या देशांत पुष्कळ प्रकारच्या उपयुक्त धातु व उत्तम संगमरवरी दगड सांपडतात. हिंदुस्तानांतून ह्या देशांत नीळ, तंबाखू, साखर, जवाहीर आणि यूरोपांतून आलेले जिन्नस जातात.

## ४. अरबस्तान.

**अरबस्तान** हें एक मोठें द्वीपकल्प **इराण**चे पश्चिमेस आहे. हें द्वीपकल्प आणि **आफ्रिका** ह्यांचेमध्यें **तांबडा** समुद्र आहे. **तांबडा** समुद्र व **हिंदी** महासागर ह्यांच्यामध्यें **बाबेल-मांडेब**ची सामुद्रधुनी आहे. **रासअलहद्द** हें भूशिर **अरबस्तान**चे आग्नेयेस आहे. **इराण**चे आखातांत **बेहेरीन** नांवाचें बेट आहे, तें **अरबस्तान**चे ताब्यांत आहे. तेथें मोतीं पुष्कळ सांपडतें.

**अरबस्तान**चे पश्चिम व दक्षिण किनाऱ्यांजवळ पर्वतांची एक मोठी ओळ आहे; तिच्या उतरणीवरील जमीन सुपीक आहे. परंतु ह्या देशांतील मध्यभागचा प्रदेश, ठिकठिकाणच्या ओलाव्याच्या जागा खेरीज करून, सर्व ओसाड मैदान आहे.

**अरबस्तान**चा सर्व पश्चिमभाग **कान्स्तांतिनोपल** येथील **सुलतानाचे** ताब्यांत आहे. त्यांत **हेदजझ** आणि **येमेन** हे प्रांत आहेत. ह्यांत पुष्कळ प्रसिद्ध शहरें आहेत. **हेदजझ** प्रांतांत **मक्का** हें **मुसलमान** लोकांचें फार प्रसिद्ध शहर आहे. येथेंच **महमदाचा** जन्म झाला. ह्या शहराजवळ **तांबड्या** समुद्रावर **जिद्दा** हें मोठें बंदर आहे. **मक्क्याच्या** उत्तरेस **मदिना**, येथें **महमदाची** कबर आहे. **येमेन** प्रांतांत **मोका** हें मोठें तटबंदीचें बंदर आहे. येथून उत्तम बुंद परमुलखास रवाना होतो. दक्षिणेस **हेद्रामोत** प्रांत आहे. ह्यांत **इंग्लिशांची** एक लहानशी वसाहत असून त्यांत **आदन** हें प्रसिद्ध शहर आहे. **अरबस्तानचे** पूर्वेस **ओमान** प्रांत आहे तो **मस्कत**चे इमामाचे ताब्यांत आहे. **मस्कत** हें तटबंदीचें शहर आहे. **इराणचे** किना-

ह्यावर **इमामची** लहानशी वसाहत आहे. **अरबस्तानांत** दुसरा सांगण्यासारखा प्रांत ह्मटला ह्मणजे मध्यभागांतील उंचवट्याचा प्रदेश होय. हा प्रदेश सुपीक असून त्यांत पाणी विपुल आहे. ह्यास **नज्द** ह्मणतात, व ह्यांत **रियाद** हें मुख्य शहर आहे. येथील राजाजवळ उत्तम जातीचे घोडे असतात अशी आख्या आहे. अरबी घोडे, उंटें व सांडणी हीं चोहोंकडे प्रसिद्ध आहेत. **अरबलोक** दांडगे व आशिक्षित आहेत. ह्या लोकांच्या फिरणाऱ्या टोळ्या व्यापारी लोकांस लुटतात. ह्या देशांतून डीक, काफी व घोडे परमुलखास जातात.

## ५. तुर्कस्तान.

**तुर्कस्तान** हा देश **कान्स्तान्तिनोपल** येथील **सुलतानाचे** ताब्यांत आहे. हा **अरबस्तानचे** उत्तरेस असून ह्याचे **आशियामैनर, सिरिया** वगैरे चार भाग आहेत.

१. **आशियामैनर.**—हें वायव्येकडील द्वीपकल्प, **भूमध्य** समुद्र आणि **काळा** समुद्र ह्यांच्यामध्यें आहे. ह्यांतील प्रदेश डोंगराळ आहे. ह्यांत मुख्य शहर **स्मरना**, हें **तुर्कस्तानची** राजधानी व **यूरोपियन** लोकांची व्यापाराची जागा आहे. ह्या प्रांतांत कापूस, लोंकर, रेशीम ह्यांचीं वस्त्रें चांगलीं तयार होतात. येथील **अंगोरा** जातीच्या बकऱ्यांच्या केसांच्या शाली उत्तम होतात. लोहचुंबक व तांबें ह्यांविषयीं ह्या प्रांताची प्रसिद्धी आहे. येथून अफू, धान्य, फळें व दारू हीं परमुलखास जातात.

ह्या प्रांताचे आसपास पुष्कळ बेटें आहेत. त्यांत पश्चिम किनाऱ्याजवळचीं **लेस्बॉस, सेमॉस कोस** आणि **ऱ्होड्स** व दक्षिण किनाऱ्याजवळचें **सैप्रस** हीं प्राचीन **ग्रीक** लोकांचे कारकीर्दींत प्रसिद्ध होतीं. अलीकडे **सैप्रस** हें **इंग्लिशांचे** ताब्यांत आलें आहे. ह्या प्रांतांत **तारस** पर्वत आहे.

२. **सिरिया.**—हा प्रांत **आशियामैनरचे** दक्षिणेस आहे. ह्याचे पश्चिमेस **लेबानन** पर्वत असून तो **आशियामैनरांतील तारस** पर्वतापासून **अरबस्तानापर्यंत** गेला आहे. ह्या प्रांताचा पूर्वेकडील प्रदेश ओसाड मैदान आहे.

अतिशय प्राचीन काळचें व व्यापाराकरितां प्रसिद्ध असें जें **दमास्कस** शहर तें ह्या प्रांताची राजधानी आहे. **आलेपो** हें दुसरें व्यापाराचें मोठें शहर उत्तरेस आहे. प्राचीन काळीं **हिंदुस्तान, अरबस्तान** व **इराण** ह्या देशांतील व्यापाराचे जिन्नस हल्लींप्रमाणें जलमार्गानें न जातां खुष्कीनें **यूरोपांत** जात असत. त्या वेळीं ह्या प्रांतांत दुसरीं पुष्कळ शहरें प्रसिद्ध होतीं. **सैदोन** व **तायर** ह्या दोन शहरीं कांच प्रथम झाली असावी असें ह्मणतात. हीं शहरें प्राचीन काळीं व्यापार व नौकागमन ह्यांकरितां प्रख्यात होतीं.

कापूस, लोंकर व रेशीम ह्यांचे वस्त्रांविषयीं हा प्रांत प्रसिद्ध आहे. ह्या प्रांतातून साबण, स्पंज, तंबाखू, धान्य व पोंवळीं परमुलखास जातात.

**सिरियाचे** दक्षिण भागाला **पालिस्तैन** ह्मणतात. येथें पूर्वी **इस्रायल** लोक रहात असत; परंतु ते आता चोहोंकडे पसरले आहेत. **येशूख्रिस्त** ह्याच प्रांतात जन्मला. **येरुशलेम** ही ह्या प्रांताची राजधानी होती. ह्या प्रांतांतील **जार्दन** नदी इतिहासांत प्रसिद्ध आहे. ती **मृतसमुद्र** ह्या सरोवरास मिळते. ह्या सरोवराचें पाणी बाहेर जात नाहीं, ह्यांत मासे वांचत नाहींत व ह्याचे काठीं झाडेंही होत नाहींत, ह्मणून ह्याला **मृतसमुद्र** हें नांव पडलें असावें.

**३. तिसरा भाग***—हा **सिरियाचें** ओसाड मैदान व **इराण** ह्यांच्यामध्यें आहे. ह्यात **आलजेसिरा, इराकअरबी** आणि **कुर्दिस्तान** हे प्रांत आहेत. ह्यांतील बहुतेक प्रदेश **तैग्रीस** व **युफ्रातीस** ह्या दोन नद्यांचे मध्यें आहेत. ह्या नद्या **तारस** पर्वतातून निघून **इराण**चे आखाताकडे जाताना त्याचा संगम झाला आहे. ह्या प्रांतांत पाणी विपुल व जमीन सुपीक आहे.

मुख्य शहर **बगदाद्** हें **तैग्रिस** नदीचे काठीं असून पूर्वी **खलीप** ह्मणजे **मुसलमान** धर्माचा मुख्य ह्याची राजधानी होतें. येथें व्यापार पुष्कळ चालतो. **बसरा** हें **युफ्रातीस** नदीचे काठीं आहे. ह्या शहरचा **हिंदुस्तान** व **इराण** ह्या देशाशीं मोठा व्यापार चालतो. ह्याच प्रांतांत **बाबेलन**, हें प्राचीनकाळीं एका मोठ्या राष्ट्राची राजधानी होतें. येथेंच **शिकंदर** बादशहा इ० स० पूर्वी ३२३ वे वर्षी मरण पावला. **बाबिलनचे** उत्तरेस **निनवी** ह्मणून फार प्राचीनकाळीं राजधानीचें शहर होतें.

---

* पूर्वी ह्या भागास मेसापोतेमिया ह्मणजे नद्यांमधील देश हें नांव होतें.

शेतकी करणें, कापसाचीं व रेशमी वस्त्रें काढणें, व तांब्याचीं भांडीं करणें हे येथील लोकांचे मुख्य धंदे आहेत.

४. **आर्मिनिया**—हा ईशान्येकडील डोंगराळ प्रांत **रशियाचें** आग्नेयीस आहे. ह्यांत उंचवट्याचीं खोरीं आहेत. मुख्य शहर **अर्झरूम** हें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. **काळया** समुद्रावर **त्रिबिझोंद** ह्मणून मोठें बंदर आहे. ह्या प्रांतांतील डोंगरांत उपयोगी धातु सांपडतात. कापसाचीं लाल वस्त्रें ह्या प्रांतांत उत्तम होतात. **आर्मिनियाचे** दक्षिणेस **वान** नांवाचें मोठें सरोवर आहे.

## ६. रशियाचें राज्य.

ह्या राज्याचे **ट्रान्सकाकेशिया, सैबिरिया,** आणि **तार्तरी** असे तीन भाग आहेत.

१. **ट्रान्सकाकेशिया**—हा **आशिया** आणि **यूरोप** ह्यांच्यामध्यें जो **काकेसस** पर्वत आहे त्याचे दक्षिणेकडील भाग होय. त्या भागाचे नैर्ऋत्येकडील **कार्सचा किल्ला, ब्यातूमचें** बंदर व त्याचें आसपासचा १२,००० चौरसमैल प्रदेश **रशियन** लोकांनीं सन १८७८ त **कान्स्तान्तिनोपलचे सुलताना**पासून जिंकून घेतला व बाकीचा प्रदेश सन १८२० चे सुमारास **इराण**चे बादशहापासून घेतला.

ह्या भागांत **रिअन** आणि **कर** ह्या दोन मोठ्या नद्या आहेत. त्या अनुक्रमें **काळया** समुद्रास व **क्यास्पियन** सरोवरास मिळतात. ह्या नद्यांच्या कांठची जमीन सुपीक असून तींत द्राक्षें, संत्रे, मोसंबे व तुतीचीं झाडें चांगलीं होतात.

**काकेसस** पर्वतांत तांबें, लोखंड, दगडी कोळसे, मीठ वगैरे पदार्थ विपुल सांपडतात; परंतु फारच उत्पन्नाचा पदार्थ ह्मटला ह्मणजे त्या पर्वताचे दोहों टोंकांजवळ जें मातीचें तेल सांपडतें तो होय. हें तेल पुष्कळ देशांत रवाना होतें.

ह्या प्रांताची राजधानी **तिफ्लिस** हें शहर **कर** नदीचे कांठीं असून व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. दुसरें मोठें शहर **एरिवान** हें आहे. **कास्पियन** सरोवराचे पश्चिम किनाऱ्यावर **बकू** व **काळ्या** समुद्राचे पूर्वकिनाऱ्यावर **ब्यातूम** हीं प्रसिद्ध बंदरें आहेत व त्यांमध्यें आगगाडीचा

रस्ता केला आहे. रशियाचें राज्य, तुर्कस्तानचें राज्य आणि इराणचें राज्य ह्यांचे हद्दींवर आराराट नामक पर्वत आहे. त्याची उंची १७,००० फूट आहे.

२. सैबीरिया—हा आशियाखंडांतला अगदीं उत्तरेकडचा देश आहे. ह्याचे पश्चिमेस उरल पर्वत आणि उराल नदी व दक्षिणेस आलताई पर्वत आणि अमूर* नदी हीं आहेत. आलताई आणि उरल ह्या दोन्हीं पर्वतांमध्यें सोनें, रुपें व इतर धातु सांपडतात.

अमूरखेरीज या देशांत ओबी, येनसी आणि लेना ह्या तीन मोठ्या नद्या आहेत. त्या आलताई पर्वतांतून निघून आर्क्तिक महासागरास मिळाल्या आहेत. अमूरही त्याच पर्वतांतून निघून पूर्वेस ओखाटस्कच्या समुद्रास मिळते.

ओबीचें आखात उत्तरमहासागरांत आहे. अनादिराचें आखात पासिफिक महासागरांत आहे. तातारचें आखात सैबीरिया आणि साघलीनबेट ह्यांच्यामध्यें असून त्याचे योगानें जपानचा समुद्र ओखाटस्कच्या समुद्रास जोडलेला आहे.

ह्या देशाचे पूर्वेस व उत्तरेस पुष्कळ बेटें आहेत. त्यांमध्यें साघलीन हें मुख्य आहे.

ओखाटस्कचा समुद्र आणि कामश्चाटकाचा समुद्र ह्यांच्या मध्यें कामश्चाटकाचें द्वीपकल्प आहे; ह्या द्वीपकल्पाचे दक्षिण टोंकास केपलोपाटका असें ह्मणतात. सैबीरियाचे पूर्व बिंदूस पूर्वकेप असें ह्मणतात.

ह्या देशाचे पूर्व व पश्चिम सैबीरिया असे दोन भाग आहेत. ह्या दोन्ही भागांत हिंवाळा फार कडक असून सुमारें नऊ महिनेपर्यंत राहतो व त्या दिवसांत जमीन बर्फानें आच्छादलेली असते. पश्चिम भागांत मोठमोठीं खाऱ्या पाणथळीचीं मैदानें आहेत. पूर्व भाग डोंगराळ आहे. परंतु त्याच्या दक्षिण आंगास सुपीक खोरीं आहेत. उन्हाळ्यामध्यें हवा बरीच उष्ण असते व त्या दिवसांत दक्षिणेकडील भागांत गहूं व इतर धान्यें ह्यांचें चांगलें पीक होतें. ह्या भागांत बैकल सरोवर आहे. हें पृथ्वीमध्यें सर्वांहून मोठें गोड्या पाण्याचें सरोवर आहे.

---

* अमूर नदीचे आग्नेयेकडील समुद्रकिनाऱ्या जवळचा थोडासा प्रदेश रशियन लोकांनीं चीनचे राजापासून जिंकून घेतला आहे.

पूर्वसैबीरियाची राजधानी अर्कुतस्क आहे. लेना नदीचे कांठीं याकुतस्क, अमूर नदीचे मुखाजवळ निकोलायवस्क आणि बैकल सरोवराचे दक्षिणेस किआखत हीं शहरें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहेत. पश्चिमसैबीरियाची राजधानी ओमास्क आहे. तोबालस्क ही पूर्वीची राजधानी होती. तोमास्क हें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहे. दक्षिणेस बारनाळ हें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. आगगाडीचा रस्ता उरल पर्वतांमधून पश्चिमसैबीरियांत त्यूमेन शहरापर्यंत नेला आहे व तो पूर्वसैबीरियांतून जपानचे समुद्रावर व्लाडिव्होस्तोकच्या बंदरापर्यंत नेण्याचा विचार आहे.

३. रशियन तार्तरी.—ज्याला पूर्वी स्वतंत्र तार्तरी ह्मणत असत, तो देश हा होय व तो हल्लीं रशियाचे ताब्यांत आहे. त्याचे उत्तरेस सैबीरिया, पश्चिमेस कास्पियन समुद्र, दक्षिणेस हिंदुकुश व कुएनलून पर्वत आणि पूर्वेस चीनचें राज्य हीं आहेत. हा देश व चिनई तारतरी ह्यांचेमध्यें पामरस्तेपी नांवाचा उंचवट्याचा प्रदेश व हिंदुकुश पर्वतापासून तहद अलताई पर्वतापर्यंत गेले आहेत असे बोलरताग व थियनशान हे दोन पर्वत आहेत. ह्यांतील जमीन सपाट असून ती पश्चिमेकडे उतरती होत गेली आहे. ह्यांत सर्व पृथ्वींत मोठें असें कास्पियन सरोवर आणि आरल, बाल्काश वगैरे दुसरीं सरोवरें आहेत. हीं सर्व खाऱ्या पाण्याचीं आहेत. अमू आणि सर ह्या दोन नद्या ह्या मैदानांतून वहात जाऊन आरलचे सरोवरास मिळतात. इली नदी बाल्काशचे सरोवरास मिळते. ह्या सर्व नद्यांचे कांठचा प्रदेश सुपीक असून बाकी सर्व ओसाड वाळवंट आहे.

रशियन लोकांनीं ह्या देशांतील सर्व संस्थानिकांचा पराजय करून पुष्कळ मुलूख हस्तगत करून घेतला. बुखारा, खिवा वगैरे ठिकाणचे खान रशियास खंडणी देतात. बुखारा शहर महमदी विद्येविषयीं प्रसिद्ध आहे. खिवा व्यापाराकरिता प्रसिद्ध आहे. खोकंद हें दिल्लीचा बादशाहा बाबर याचें शहर होतें. समरकंद ही तैमरलंगची राजधानी होती व तेथें त्याची कबर आहे. बुखाऱ्याचे दक्षिणेस मर्व हें प्राचीनकाळीं इराणच्या एका बादशाहाचें राजधानीचें शहर होतें. ताशकंद हें शहर मोठें असून हल्लीं ह्या प्रांताची राजधानी आहे. कास्पियन सरोवराच्या

पूर्व किनाऱ्यावर क्रास्नोव्होडस्क शहर आहे. तेथून आगगाडीचा रस्ता मर्व व बुखारा ह्या शहरांवरून समरकंदपर्यंत नेला आहे.

## ७. जपानचें राज्य.

हें राज्य पुष्कळ बेटें मिळून झालें आहे. हीं बेटें आणि आशियाखंड ह्यांच्या मध्यें जपानचा समुद्र आहे. ह्यांत चार बेटें मुख्य आहेत. (१) येसो, (२) होनाशियू ऊर्फ निफोन, (३) शिकोकू आणि (४) कियूशियू; पैकीं होनाशियू हें सर्वांत मोठें आहे. हल्लींची राजधानी तोकियो ही होनशियू बेटांत आहे. कियूशियू बेटांत नागासाकी हें उत्तम बंदर आहे. योकोहामा, कोबे, ओसाका आणि हिओगो हीं दुसरीं बंदरें आहेत. नागोया हें मोठें शहर आहे. कियोतो हें विद्या, कलाकौशल्य आणि धर्म यांचें मुख्य स्थान आहे.

येथील बादशाहास मिक्यादो (पूज्य) ह्मणतात व तो पार्लमेंताच्या संमत्तीनें राज्यकारभार चालवितो. चीन आणि हिंदुस्तान खेरीजकरून आशियांतील सर्व देशांमध्यें जपानची लोकसंख्या मोठी आहे. येथील लोक बुद्धिमान असून विद्या आणि कलाकौशल्य ह्यांमध्यें निपुण आहेत. येथें तलवारी, मातीचीं भांडीं, व रंगित चिजा चांगल्या तयार होतात. हा देश सुपीक असून सोनें, रुपें, लोखंड, तांबें, कोळसे आणि गंधक ह्यांचे खाणींनीं संपन्न आहे.

पिंवळा समुद्र आणि चिनई समुद्र ह्यांचे मध्यें फोर्मोसा बेट आहे. तें जपानचे बादशाहानें चीनपासून सन १८९५ त जिंकून घेतलें.

## ८. चीनचें राज्य.

क्षेत्रफळाच्या* मानानें चीनचें राज्य सर्व पृथ्वीमध्यें तिसरें आहे.

---

* पुढें लिहिलेलीं राज्यें पृथ्वींत मोठीं असें मानिलें आहे.

| | क्षेत्रफळ. चौ. मै. | लोकसंख्या. |
|---|---|---|
| ब्रिटिश राज्य........ | १,१३,००,००० | ३८,१०,००,००० |
| रशियाचें राज्य ...... | ८६,५०,००० | १२,६०,००,००० |
| चीनचें राज्य........ | ४३,००,००० | ४०,००,००,००० |
| युनैटेडस्टेट्स ... ... | ३५,३१,००० | ६,३०,००,००० |
| ब्राझिलचें राज्य ....... | ३२,०९,००० | १,४०,००,००० |

**इंग्लंड**चें राज्य पहिलें व **रशियाचें** राज्य दुसरें. लोकसंख्येच्या मानानें **चीन**चें राज्य पहिलें आहे. ह्या राज्यांत **चीन, तिबेत** आणि **चिनई-तार्तरी ( मंगोलिया**सह ) हे देश आहेत.

**चीन**.—ह्या देश आणि **तिबेत** ह्यांच्यामध्यें उंच पर्वत आहेत, त्यांस **स्नोई** पर्वत असें ह्मणतात. **पेइहो, होआंगहो, यांगत्सीक्यांग** आणि **कंतान** ह्या मोठ्या नद्या ह्या पर्वतांमधून येऊन **चीन**च्या मैदानांतून जाऊन **पासिफिक** महासागरास मिळाल्या आहेत. **चीन**च्या ताब्यांतील बेटांपैकीं **हैनान** हें मुख्य आहे. **फोर्मोसा** बेट आणि **चीन** ह्यांच्यामध्यें **फोर्मोसाची** सामुद्रधुनी आहे.

**चीन**ची राजधानी **पेकीन** आहे. येथें बादशाहा राहातो. **नांकीन** हें मोठें शहर **यांगत्सी** नदीचे कांठीं असून व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. **नांकीन**पासून थोड्या अंतरावर **शांघाय** व दक्षिणेस **कंतान** हीं मुख्य बंदरें आहेत. या देशांतून चहा, साखर, रेशीम, कापसाचीं वस्त्रें, साटीन, खेळणीं, मातीचीं भांडीं वगैरे जिन्नस बाहेर रवाना होतात. **हिंदुस्तानांतून** पुष्कळ अफू ह्या देशांत जाते. **कंतान** नदीचे मुखाजवळ **इंग्लिशांचे** ताब्यांत **हांगकांग** व **पोर्तुगीज** लोकांचे ताब्यांत **मकाउ** हीं बेटें आहेत.

**चिनी** लोक मोठे हुशार आणि उद्योगी आहेत. त्यांनीं पुष्कळ कालवे बांधून आपल्या देशांतील शेतकीची सुधारणूक केली आहे. त्यांपासूनच चहाचे झाडाची प्रसिद्धि झाली. मातीचीं भांडीं आणि रेशीम तयार करण्याचे कामांत **चिनी** लोकांची बरोबरी कोणी करूं शकत नाहीं. बंदुकीची दारू, छापण्याची युक्ति व कंपस ( लोहचुंबकाची सुई ) हीं त्यांनींच शोधून काढिलीं असें ह्मणतात. ह्या देशांत पुष्कळ मौल्यवान धातु सांपडतात.

**तिबेत**.—ह्या देशाचे पूर्वी **स्वतंत्र तिबेत** आणि **चिनई तिबेत** असे दोन भाग होते. परंतु **स्वतंत्र तिबेत** आतां **काश्मीर**चा भाग झाला आहे. (काश्मीर* पहा). **चिनई तिबेत** आणि **काश्मीर** ह्यांच्यामध्यें **काराकोराम** पर्वतांची ओळ आहे. ह्या देशांतील जमीन उंचवट्याची असून त्यांत **सिंधु** व **ब्रह्मपुत्र** हे नद आणि **सतलज, इरावती, यां-**

* हिंदुस्तानचें वर्णन पहा.

गत्सी आणि होआंगहो ह्या मोठ्या नद्या उगम पावतात. सिंधु आणि ब्रह्मपुत्र ह्यांचे उगम जवळ जवळ आहेत, आणि हिमालयाचे टोंकांस वळसा घालून पुढें जातपर्यंत ते अनुक्रमें पश्चिमेकडे व पूर्वेकडे वाहतात; नंतर दक्षिणेकडे वळून अरबी समुद्र व बंगालचा उपसागर ह्यांस अनुक्रमें मिळतात. तिबेटांत पुष्कळ सरोवरें आहेत, त्यांत ब्रह्मपुत्राच्या जवळचीं तेंग्रिनार व पालटी आणि सतलजच्या जवळचीं रावणऱ्हद आणि मानस हीं सरोवरें प्रसिद्ध आहेत.

मुख्य शहर लासा, ही बौद्धधर्माची पवित्र जागा आहे. येथें बौद्धधर्माचा मुख्य गुरु ( ग्रांद्लामा ) राहतो. सर्व धर्मामध्यें बौद्धधर्म अतिविस्तृत आहे. चीन, ब्रह्मदेश, सिंहलद्वीप वगैरे देशांत हाच धर्म चालतो. ह्या देशांतील लोकांच्या रीतिभाती तारतर लोकांच्या रीतिभातीसारख्याच आहेत. तिबेटांतील कांहीं लोक शेतकी व दुसरे कांहीं धंदे करितात; परंतु बहुतेक लोक आपला निर्वाह मेंढ्या व गुरें बाळगून करितात व नेहमीं चाऱ्याकरितां फिरत असतात. येथील लोकरीच्या उत्तम शाली होतात.

चिनई तार्तरी—[ मंगोलियासह ] हा देश चीन आणि तिबेट ह्यांचे उत्तरेस आहे. हा देश आणि चीन ह्यांच्यामध्यें एक मोठी भिंत आहे. ती पुष्कळ वर्षांपूर्वी चिनई लोकांनीं लुटारू तारतर लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां बांधली. हा देश आणि तिबेट ह्यांच्यामध्यें कुएन्लन पर्वत आहे. ह्या देशाचे चार भाग आहेत. १ पूर्वेस मंचूरिया, राजधानी मुकदेन. २ उत्तरेकडील आणि पश्चिमेकडील पर्वतांतील उंचवट्याचा प्रदेश, ह्यांत सुंदर झाडी असून ठिकठिकाणीं सुपीक जागा आहेत. ३ मंगोलिया (गोबीचें मैदान), राजधानी उर्गा. ह्यांत मैमाचीन ही व्यापाराची जागा आहे. ४ पूर्व तार्तरी, ह्यांत यार्कंद आणि काश्गर हीं प्रसिद्ध शहरें आहेत. ह्याचे पश्चिमेस पामर स्तेपी नांवाचा उंचवट्याचा प्रदेश असून पलीकडे रशियन अथवा पश्चिमतार्तरी आहे.

ह्या देशाचे उत्तरेस **अमूरनदी** असून दक्षिणेकडे **चीनां**तील नद्यांस मिळणाऱ्या लहान लहान नद्या आहेत. किनाऱ्याजवळचे प्रदेशांत मासे धरणें व धातूंकरितां खणणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत. उत्तरेकडील प्रदेशांत शेतकी हा मुख्य धंदा आहे. येथें कापूस व रेशीम ह्यांचीं वस्त्रें करितात. बाकी सर्व ठिकाणचे लोक तंबूंत राहून मेंढ्या व गुरें पाळतात. **कारवान**लोक हमेश ह्या देशांतून चहा व रेशीम **सैबीरिया** देशांतील **किआख्त** शहरास नेतात आणि तेथून लोंकर घेऊन येतात.

## ९. कोरिया.

**कोरिया** हें द्वीपकल्प असून **जपान**चा समुद्र आणि **पिंवळासमुद्र** ह्यांच्यामध्यें आहे. हें द्वीपकल्प आणि **जपान** ह्यांच्यामध्यें **कोरियाची** सामुद्रधुनी आहे. हा देश डोंगराळ आहे व ह्याचे आंतले भागाची चांगलीशी माहिती नाहीं. समुद्रकांठची जमीन चांगली असून तींत तांदूळ, धान्य, कापूस, तंबाखू, ताग आणि फळें ह्यांचें चांगलें पीक होतें.

येथील राजास **लीही** ह्मणतात व **सिउल** ही त्याची राजधानी आहे. **चेमलपो, फ्यूसन** आणि **गुएनसन** हीं मुख्य बंदरें असून तेथें परराष्ट्रांतील लोकांस व्यापार करण्याची मोकळीक आहे.

हा देश पूर्वीं **चीन**चे ताब्यांत होता. पण सन १८९४ त **चीन** आणि **जपान** ह्यांच्यामध्यें जी लढाई झाली तींत तो स्वतंत्र झाला आहे. हल्लीं येथें **जपान**चें वर्चस्व विशेष आहे. येथील लोक बौद्ध धर्माचे आहेत.

## १०. इंडियन चायना (पूर्वेकडील द्वीपकल्प).

**इंडियनचायना** हें मोठें द्वीपकल्प **चीन**चे राज्याचे दक्षिणेस व **हिंदुस्तान**चे पूर्वेस आहे. हें द्वीपकल्प आणि **हिंदुस्तान** ह्यांच्यामध्यें **बंगाल्चा** समुद्र व **आराकान**चे उत्तरेकडील डोंगर आहेत. ह्या देशांत धातु, अरण्यें, व सुपीक जमीन ह्यांची समृद्धि आहे. तेथील लोक हुशार असून घंटा, रंगीत सामान, मातीचीं भांडीं, उंचीं वस्त्रें व कांचेचीं भांडीं करण्याचे कामांत कुशल आहेत. त्यांच्या रीतिभाती कांहीं हिंदुलोकांप्रमाणें व कांहीं चिनई लोकांप्रमाणें आहेत. ह्या देशाचे **ब्रह्मदेश, सियाम, मलाया,** आणि **कोचीन चीन** असे चार भाग आहेत.

**ब्रह्मदेश.**—हा या द्वीपकल्पाचा अगदीं पश्चिमेकडचा भाग आहे,

व तो हिंदुस्तानांतील **गवरनर जनरल**चे ताब्यांत आहे. **इरावती, सितांग** आणि **सालवेन** ह्या नद्या ह्या देशांतून वाहत जाऊन **मार्तावान**चे आखातास मिळतात. ह्या देशांत सागाचीं सुंदर अरण्यें व भाताचीं उंचीं शेतें आहेत. ह्या देशापैकीं **आसाम, आराकान,** आणि **तेनासरिम** हे प्रांत **इंग्लिशां**नीं सन १८२६ त जिंकून घेतले; चौथा प्रांत **पेगू** हा सन १८५२ त खालसा करून घेतला; आणि बाकी सर्व देश सन १८८६ त खालसा करून घेतला. **आसाम** एका **चीफ कमिशनरा**चे ताब्यांत आहे व त्यांत **गोवाटी** हें मुख्य शहर आहे. बाकी सर्व देश एका **लेफ्तेनेंत गवरनरा**चे ताब्यांत आहे. त्याची राजधानी **मंडले** ही **इरावती**नदीचे कांठीं आहे. **आवा, अमरपूर, मंचोबा** ह्या पूर्वीच्या राजधान्या **इरावती** नदीचे कांठीं आहेत. **रंगून, आराकान, प्रोम, पेगू** हीं दुसरीं शहरें व **मोलमेन, बासेन** आणि **अकियाब** हीं मोठीं बंदरें ह्या देशांत आहेत. ह्या देशांतून तांदूळ आणि मीठ खुष्कीनें **चिनां**त पाठवितात आणि तेथून लोंकर, रेशीम आणि कापूस ह्यांचीं वस्त्रें ह्या देशांत आणितात.

**सियाम.**—हा देश **ब्रह्मदेशा**चे पूर्वेस आहे. **मिनाम**नदी ह्या देशांतून वहात जाऊन **सियाम**चे आखातास मिळते. हा देश एका राजाचे ताब्यांत आहे. त्याची राजधानी **बांकोक**. ही **मिनाम**नदीचे कांठीं आहे. उत्तरेकडील **शान** लोकांच्या **लाओ** देशावर आणि **मलायां**तील कांहीं संस्थानांवर येथील राजाचा तावा आहे. ह्या देशांत मौल्यवान रत्नें सांपडतात. येथील व्यापार **ब्रह्मदेशां**तील व्यापारासारखाच आहे. **मिनाम**नदीचे डावे अंगचा बराच मुलुख हल्लीं **फ्रेंचां**चे ताब्यांत आहे.

**मलाया.**—हें द्वीपकल्प दक्षिणेस असून **क्रा** ह्या नांवाचे संयोगीभूमीनें मुख्य द्वीपकल्पास जोडलेलें आहे. हें द्वीपकल्प आणि **सुमात्रा** बेट ह्यांच्यामध्यें **मलाका**ची सामुद्रधुनी आहे. हा देश पुष्कळ संस्थानिकांच्या ताब्यांत आहे. पैकीं कांहीं **सियाम**चे राजाचे ताब्यांत आहेत, कांहीं स्वतंत्र आहेत, व कांहीं **इंग्लिशां**स खंडणी देतात. **मलाका** आणि **वेलस्ली** हे दोन प्रांत व **मलाका**चे सामुद्रधुनींतील **सिंगापुर** आणि **पिनांग** हीं बेटें **इंग्लिशांचे** ताब्यांत आहेत. हीं बेटें **हिंदुस्तान** व **चीन** ह्या

देशावरोबरचे व्यापाराकरितां सोईचीं ठाणीं आहेत. **मलायी** लोक **मुसलमान** आहेत व **इंदियन चायनांतील** बाकी सर्व लोक बौद्ध धर्माचे आहेत.

**कोचीन चीन**—हा देश **सियामाचे** पूर्वेस आहे. **मेकांग** ऊर्फ **कांबोज** ही मोठी नदी ह्या देशांतून वहाते. ह्या नदीचे मुखावर **फ्रेंच** लोकांची मालकी आहे. किनाऱ्यावरचें **सायगांव** शहर त्यांचेच ताब्यांत आहे. ह्या देशांतील **टांकिन**प्रांत **फ्रेंच** लोकांचे ताब्यांत आहे व त्यांत **होनाय** हें मुख्य शहर आहे. **आनाम** आणि **कांबोज** येथील राजे **फ्रेंच** लोकांस खंडणी देतात. **आनामची** राजधानी **हुई** हें तटबंदी शहर त्याच नांवाच्या नदीचे कांठीं आहे आणि **कांबोजची** राजधानी **नामपेन** ही **मेकांग** नदीचे कांठीं आहे.

## ११. सिंहलद्वीप ऊर्फ सिलोन.

**सिंहलद्वीप ऊर्फ सिलोन**—हें बेट **हिंदुस्तानचे** दक्षिण टोकाजवळ आहे. ह्यालाच हिंदुलोक **लंका** असें ह्मणतात. हें बेट आणि **हिंदुस्तान** ह्यांच्यामध्यें **मानारचें** आखात व **पाल्कची** सामुद्रधुनी हीं आहेत. **मानार** आणि **पाल्क** ह्यांच्यामध्यें **सिलोन**पासून **हिंदुस्तानचे** आग्नेय किनाऱ्यापर्यंत कांहीं बेटें* व रेतीचे उंचवटे मिळून ६० मैल लांबीचा पुलासारखा एक तुटक कडा आहे. त्यास हिंदुलोक **रामाचा सेतु** ह्मणतात व इतर लोक **आदामचा पूल** असें ह्मणतात. ह्या पुलाचें वर्णन हिंदु लोकांचे पुराणांत केलेलें आहे.

**सिलोनचें** क्षेत्रफळ २५,३६५ चौरसमैल, व लोकसंख्या ३० लक्षांपेक्षां जास्त आहे. ह्या बेटाचे कांहीं भाग इ० स० १८१५ पर्यंत **डच** व **फ्रेंच** लोकांचे ताब्यांत होते; परंतु हल्लीं सर्व बेट **इंग्लंदचे** राणीचे ताब्यांत असून तिचेच हुकुमानें तेथील **गवरनर** काम करितो.

---

* ह्या बेटांपैकीं मानार आणि रामेश्वर हीं मोठीं आहेत. हीं बेटें व रेतीचे उंचवटे ह्यांच्यामधून लहान लहान तारवें व आगबोटी जाण्याजोग्या खोल खाड्या आहेत. परंतु पांबेन नांवाच्या खाडींतून मोठमोठीं तारवें नेतां यावीं ह्मणून ती पुष्कळ खोल करण्याचा सरकारचा इरादा आहे. असें झाल्यानें सिलोन बेटास वळसा घातल्याशिवाय मधूनच गलबतें नेतां येतील.

**पर्वत.**—ह्या बेटांत पुष्कळ पर्वत आहेत पैकीं **पेद्रोतालागेला** आणि **इलिया** हे अतिशय उंच आहेत. परंतु **आदाम्सपीक** हा पर्वत फार प्रसिद्ध आहे ह्या पर्वताचे शिखरावर बुद्धाचीं पावलें उठलीं आहेत, असें बौद्धधर्माचे गुरु सांगतात.

ह्या बेटाचा मध्यभाग व दक्षिणभाग हे डोंगराळ आहेत. परंतु बहुतेक किनाऱ्याजवळ सखल जमिनीची पट्टी आहे. पर्वतावर झाडी असून मध्यें सुपीक मैदानें व खोरीं आहेत. ह्या बेटाचे उत्तरेकडील व पूर्वेकडील प्रदेशांत मोठमोठे जुनाट पडके तलाव आहेत, ते कोणत्या जातीच्या लोकांनीं बांधले ह्याचा थांगच लागत नाहीं. किनाऱ्याजवळचा प्रदेश सुपीक असून त्यांत पाणी विपुळ आहे. तेथें बागाईत फार चांगलें होतें परंतु तेथील हवा सरदगरम आहे. डोंगराळ प्रदेशांतील हवा चांगली असून तेथें बुंद व चहा ह्यांचें पीक चांगलें होतें. ह्या बेटांत पाऊस पुष्कळ पडतो आणि पावसाळा सहा सात महिनेपर्यंत असतो.

दालचिनी, मिर्च्यें वगैरे मसाल्याचे पदार्थ व नारळ आणि दुसरीं फळें ह्यांकरितां ह्या बेटाची प्रसिद्धि आहे. तांदूळ, कापूस, नीळ, ऊंस आणि तंबाखू ह्यांचेंही बरेंच पीक होतें. लोखंड व इतर धातु आणि विशेषेंकरून मौल्यवान रत्नें ह्या बेटांत पुष्कळ सांपडतात. वायव्य किनाऱ्याजवळ उत्तम मोतीं सांपडतें. पश्चिम किनाऱ्यावर पुष्कळ मिठागरें आहेत. तेथून मीठ **हिंदुस्तानांत** पाठवितात. इमारती लांकूड ह्या बेटांतून परमुलखास पुष्कळ रवाना होतें.

**सिलोन** बेटांत **सिंघली, हिंदु, अरब, मलायी** आणि मूळचे डोंगरी लोक ह्यांची वस्ती आहे. **सिंघली** लोक स्वभावानें शांत असून ते पश्चिम व दक्षिण किनाऱ्याजवळील सखल प्रदेशांत राहतात. ते बौद्धधर्माचे आहेत, व त्यांची भाषा अगदीं निराळी आहे. **हिंदु** लोक **तामील** भाषा बोलतात, व ते **मद्रास** इलाख्यांतून ह्या बेटांत आले आहेत. हे लोक मुख्यत्वेंकरून ह्या बेटाच्या उत्तरभागांत राहतात. मूळचे लोक अगदीं रानटी असून डोंगरांत राहतात. शेतकी, मासे धरणें, धातूंचीं कामें करणें, पांट्या विणणें, दोरखंडें तयार करणें, हे लोकांचे मुख्य धंदे आहेत.

ह्या बेटाची राजधानी **कोलंबो**, हें बंदर पश्चिम किनाऱ्याजवळ आहे. दक्षिणेस **पॉइंट दि गाली** ह्या नांवाचें सुंदर बंदर आहे. ह्या बंदरांत **मुंबई**, **कलकत्ता**, **चीन**, **यूरोप** आणि **आस्ट्रेलिया** येथून आगबोटी व तारवें येतात. ईशान्येस **महावली गंगे**च्या मुखाजवळ **त्रिकोमाली** ह्मणून एक बंदर आहे. उत्तरेस **पॉइंत पेद्रो** ह्या नांवाचें चौथें बंदर आहे. मध्यभागचे डोंगराळ प्रदेशांत **क्यांदी** ह्मणून एक प्राचीन राजधानीचें शहर आहे. हल्लीं **कोलंबो**पासून **क्यांदी**पर्यंत आगगाडीचा रस्ता केला आहे.

## १२. हिंदुस्तान.

**आशियाखंडा**चे दक्षिण आंगास जीं तीन द्वीपकल्पें आहेत, त्यांपैकीं **हिंदुस्तान** हें सर्वांत मोठें व महत्वाचें आहे. ह्याचे उत्तरेस **हिंदुकुश**, **काराकोरान**, व **हिमालय** हे पर्वत असून त्यांचे पलीकडे **तातेरी** व **तिबेत** हे देश आहेत. पश्चिमेस **हाला** व **सुलैमान** हे पर्वत आहेत, व त्यांच्या पलीकडे **बलुचिस्तान** व **अफगाणिस्तान** हे देश आहेत; नैर्ऋत्येस **अरबी** समुद्र, दक्षिणेस **हिंदी** महासागर, आग्नेयीस **बंगाल**चा उपसागर व पूर्वेस **आराकान**चे व दुसरे डोंगर असून पलीकडे **ब्रह्मदेश** आहे. ह्या देशाचें क्षेत्रफळ १५,८२,१२० चौरसमैल आहे व लोकसंख्या २८ कोटी ७० लक्ष आहे.

ह्या देशाचा आकार तिकोनी आहे. **हिमालय** ह्या त्रिकोणाचा पाया आहे. **विंध्याद्रि** पर्वताचे योगानें त्या त्रिकोणाचे दोन मोठे भाग झाले आहेत. पैकीं उत्तरेकडील भागाला **हिंदुस्तान** व दक्षिणेकडील भागाला **दक्षिण** असें ह्मणतात.

**उत्तरहिंदुस्तान** किंवा **हिंदुस्तान** ह्याचे स्वभावतः सहा भाग झाले आहेत; (१) **हिमालया**चे उतरणीवरचा प्रदेश, ह्यांत **काश्मीर** (**पंजाबा**खालचें) व **नेपाळ** व **भूतान** हीं स्वतंत्र संस्थानें व दुसरीं डोंगरी लोकांचीं संस्थानें आहेत; (२) **सिंधू**चे कांठचा प्रदेश, ह्यांत **पंजाब** व **सिंध** हे प्रांत आहेत; (३) मोठें मैदान, हा वाळूचा प्रदेश उत्तरेस **सतलज** नदी, पश्चिमेस **सिंध** व **पंजाब**चा कांहीं भाग, दक्षिणेस **कच्छ**चें रण, आणि पूर्वेस **अरवली** पर्वत, ह्यांच्या मध्यें आहे. ह्या मै-

दानाचा आग्नेयीकडील प्रदेश सुपीक असून त्यांत **जोधपूर** व **राजपुतान्यां**तील दुसरीं कांहीं संस्थानें हीं आहेत; (४) **मध्यहिंदुस्तानां**तील उंचवट्याचा प्रदेश, ह्यांत **राजपुतान्या**चा कांहीं भाग, **माळवा** व **बुंदेलखंड** हे प्रांत आहेत; (५) गंगेच्या कांठचा प्रदेश, ह्यांत **वायव्येकडील प्रांत**, **अयोध्या** व **बंगाल**चा कांहीं भाग हे आहेत; आणि (६) **ब्रह्मपुत्रा**च्या कांठचा प्रदेश, ह्यांत **बंगाल**चा कांहीं भाग व **आसाम** हे प्रांत आहेत.

**दक्षिण हिंदुस्तान** किंवा **दक्षिण** ह्याचे स्वभावत: चार भाग झाले आहेत; (१) **नर्मदे**च्या कांठचा प्रदेश, हा **विंध्याद्रि** आणि **सातपुडा** ह्या दोन पर्वताच्या ओळींमध्यें आहे. त्यांत **गोंडवण**चा बहुतेक प्रदेश येतो; (२) खुद्द **दक्षिण**, ह्यांत **मध्यप्रांता**चा कांहीं भाग, **हैदराबाद**, **वऱ्हाड**, **महाराष्ट्रदेश**, **दक्षिण महाराष्ट्रदेश** आणि **कर्नाटक** हे प्रांत आहेत; (३)पूर्व किनाऱ्याजवळचा सखल प्रदेश, हा **पूर्व घाट** आणि पूर्व किनारा ह्याच्या मध्यें आहे; आणि (४)पश्चिम किनाऱ्याजवळचा सखल प्रदेश, हा **सह्याद्रि** आणि पश्चिम किनारा ह्यांचे मध्यें **तापी** नदीपासून **कन्याकुमारी**पर्यंत आहे.

पुढें लिहिल्याप्रमाणें **हिंदुस्तान**चे १३ राजकीय विभाग आहेत.

| | |
|---|---|
| १ **मुंबई** इलाखा. | ८ **पंजाब** इलाखा. |
| २ **मद्रास** इलाखा. | ९ **वायव्येकडील प्रांत.** |
| ३ **म्हैसूर** व **कुर्गप्रांत.** | १० **बंगाल** इलाखा. |
| ४ **हैदराबाद** व **वऱ्हाडप्रांत.** | ११ **आसामा**कडील मुलूख. |
| ५ **मध्यप्रांत.** | १२ **नेपाळ, भूतान** व इतर डोंगरी संस्थानें. |
| ६ **मध्य हिंदुस्तानां**तील संस्थानें. | |
| ७ **राजपुतान्यांतील** संस्थानें. | १३ **पोर्तुगीज** व **फ्रेंच** लोकांचीं संस्थानें. |

**हिंदुस्तान**चा राज्यकारभार **वैसराय** आणि **गवरनर जनरल** पाहतो. त्याची नेमणूक **हिंदुस्तान**ची चक्रवर्तिनी व **इंग्लंड**ची **राणी** करते, व त्याच्या मदतीस **कौन्सलदार** असतात. **मुंबई** व **मद्रास** येथील **गवरनर**; **पंजाब**, **वायव्येकडीलप्रांत**, **बंगाल**

आणि **ब्रम्हदेश** येथील **लेफ्तेनेंत गवरनर; मध्यप्रांत,** व **आसाम** येथील **चीफ कमिशनर; हैदराबाद, म्हैसुर, मध्यहिंदुस्तान, राजपुताना, नेपाळ** व इतर संस्थानें येथील **रेसिदेंत** व **पोलीतिकल एजन्त,** हे सर्व अधिकारी **गवरनर जनरल**चे ताब्यांत आहेत. तरी त्यांचे ताब्यांतील मुलखांची सर्व जवाबदारी त्याच्यावर सोंपवलेली असते ह्मणून ते स्वतंत्रपणें त्यांची व्यवस्था ठेवितात.

**शहरें**—१. **मुंबई** इलाख्यांत मुख्य शहर **मुंबई,** ह्याच नांवाच्या **बेटां**त आहे. हें शहर साऱ्या **हिंदुस्तानां**त मोठ्या वस्तीचें आहे. **सिंधूचे** कांठीं **हैदराबाद** व **कराची,** हीं **सिंध** प्रांतांत मोठीं शहरें आहेत. **साबरमती**चे कांठीं **अमदाबाद** व **तापी**चे मुखाजवळ **सुरत,** हीं **गुजराथे**त मोठीं शहरें आहेत. **महाराष्ट्र** देशांत **पुणें, पेशव्यां**ची राजधानी व **सातारा शिवाजी**चे वंशांतील राजांची राजधानी होती. दक्षिण **महाराष्ट्रांत बेळगांव, धारवाड, हुबळी,** व **विजापूर** हीं मोठीं शहरें आहेत. **मुंबई, कराची, कारवार,** हीं मुख्य बंदरें आहेत.

२. **मद्रास** इलाख्यांत **मद्रास** हें मुख्य शहर आहे. **त्रिचनापल्ली** हें मजबूत शहर **कावेरी**चे कांठीं आहे. **तुंगभद्रे**च्या कांठीं **विजयानगर** हें प्राचीन काळीं प्रसिद्ध शहर होतें. शिवाय **अर्काट, तंजावर, बल्लारी, मच्छलीपट्टन, राजमहेंद्री, मंगळूर, कलीकत** वगैरे मोठीं शहरें आहेत.

३. **म्हैसूर** प्रांतांत **म्हैसूर** हल्लींची राजधानी, **श्रीरंगपट्टण** पूर्वींची राजधानी, **बंगलूर रेसिदेंता**ची राहण्याची जागा, आणि **कुर्ग**प्रांतांत **मरकारा,** हीं प्रसिद्ध शहरें आहेत.

४. **हैद्राबाद व वऱ्हाड,** ह्या प्रांतांचे मुख्य शहर **हैदराबाद,** ही **निजामा**ची राजधानी आहे; **सिकंदराबाद** हें साऱ्या **हिंदुस्तानां**त फौजेचें मोठें ठाणें आहे. **गोंवळकोंडें,** हें **गोंवळकोंड**च्या राज्याचें प्राचीन काळीं राजधानीचें शहर होतें. शिवाय **अवरंगाबाद, दौलताबाद, बेदर, एलिचपूर, आकोला,** वगैरे मोठीं शहरें आहेत. **खांबगांव** आणि **उमरावती** ह्या कापसाच्या व्यापाराच्या मोठ्या पेठा आहेत.

५. **मध्यप्रांतांत नागपूर** हें मुख्य शहर आहे. **हिंगणघाट** ही कापसाचे व्यापाराची मोठी पेठ आहे. शिवाय **सागर, जबलपूर, रायपूर, चांदा,** वगैरे मोठीं शहरें आहेत.

६. **मध्य हिंदुस्तानांत ग्वालेर**, शिंद्याची राजधानी आहे; **इंदूर**, **होळकराची** राजधानी आहे; **भोपाळ**, **भोपाळच्या बेगमची** राजधानी आहे; **महू** आणि **नीमच**, येथें **इंग्रज** सरकारची फौज असते.

७. **राजपुतान्यांत**, **अजमीर**, **उदेपूर**, **जोधपूर**, **जयपूर**, **भरतपूर**, वगैरे मोठीं शहरें आहेत.

८. **पंजाबांत** मुख्य शहर **लाहोर**, **रावी**च्या कांठीं आहे. **अमृतसर** हें **सीक** लोकांचें पवित्र शहर आहे. **चिनाब**चे कांठीं **मुलतान** हें मोठें मजबूद शहर आहे. **यमुने**च्या कांठीं **दिल्ली**, **मोंगल** लोकांची राजधानी होती. **दिल्ली**चे उत्तरेस **पानिपत**ची प्रसिद्ध रणभूमि आहे. शिवाय **लुधियाना**, **फिरोजपूर**, **अंबाला**, वगैरे मोठीं शहरें आहेत.

९. **वायव्ये**कडील प्रांताचें मुख्य शहर **अलहाबाद** ऊर्फ **प्रयाग**, हें **गंगा** आणि **यमुना** ह्यांचे संगमावर आहे. **आग्रा**, ह्या प्रांताची जुनी राजधानी, येथें **ताजमहाल** व दुसऱ्या पाहण्यासारख्या इमारती आहेत. **गोमती**चे कांठीं **लखनौ**, हें पूर्वी **अयोध्या**प्रांताचें राजधानीचें शहर होतें. ह्याच प्रांतांत **फैजाबाद** व त्याचे पूर्वेस **अयोध्या** हीं मोठीं शहरें आहेत. **अयोध्या** हें फार प्राचीन काळचें शहर असून तेथें **श्रीरामचंद्रा**चा जन्म झाला. शिवाय **यमुने**च्या कांठीं **मथुरा**, **काल्पी** व **इटावा** आणि **गंगे**च्या कांठीं **फत्तेगड**, **कानपूर**, **मिरजापूर**, **काशी** ऊर्फ **बनारस**, **गाजीपूर** व **कनोज** आणि दक्षिण भागांत **झांशी**, हीं मोठीं शहरें आहेत.

१० **बंगाल्यांत हुगळी** नदीचे कांठीं **कलकत्ता**, ही **हिंदुस्ताना**ची राजधानी व **गवरनर जनरल**ची राहण्याची जागा आहे. **डाका** आणि **मुर्शिदाबाद** हीं कारागिरीचे पदार्थांकरितां प्रसिद्ध आहेत. **बहार** प्रांतांत **पाटणा** व **मोंगीर** हीं **गंगे**च्या कांठीं आहेत. **ओरिसा** प्रांतांत **कटक** व **जगन्नाथ** आणि **छोटा नागपूर** प्रांतांत **रांची** हीं मोठीं शहरें आहेत.

११. **आसामांत शिलांग**, **गोव्हाटी**, **सिल्हेट** आणि **सिलचार** हीं मोठीं शहरें आहेत.

१२. **नेपाळांत काटमांडू**, **भूतानांत तासिसदन** व **काश्मीरांत काश्मीर** ( श्रीनगर ) आणि **जंमू** हीं मोठीं शहरें आहेत.

१३. चंद्रनगर, पांदिचरी, यानन, कारिकल आणि माही हीं फ्रेंचांचीं व गोवें हें पोर्तुगीज लोकांचें शहर आहे.

पर्वत—हिंदुस्तानांत पर्वतांच्या अनेक ओळी आहेत. उत्तरेस हिमालय व हिंदुकुश, ह्या पर्वतांच्या ओळी आहेत. हिमालयाचें अति उंच शिखर एवरेस्त (गौरीशंकर) हें समुद्राचे सपाटीपासून २९,००० फूट उंच आहे. धवलगिरी हें दुसरें मोठें शिखर आहे. पश्चिमेस सुलैमान व हाला ह्या पर्वतांच्या ओळी आहेत. गुजराथ व बुंदेलखंड ह्यांच्या मध्यें विंध्याद्रि पर्वतांची ओळ आहे. विंध्याद्रिपर्वतांचे पश्चिम टोंकापासून दिल्लीपर्यंत अरवली पर्वतांची ओळ आहे. ह्या ओळींत अबूचा पहाड हें फार उंच शिखर आहे. विंध्याद्रीचे दक्षिणेस त्याशीं समांतर सातपुड्याची ओळ पूर्वपश्चिम आहे. ह्याच्या दक्षिणेस पश्चिम किनाऱ्याकडे सह्याद्रि (पश्चिम घाट) व पूर्व किनाऱ्याकडे पूर्व घाट अशा दोन ओळी आहेत. नीलगिरि पर्वतांची ओळ पूर्वपश्चिम घाटांचीं दक्षिण टोंकें जोडते.

नद्या—हिंदुस्तानांत पुष्कळ नद्या व नद आहेत. पैकीं गंगा, यमुना, गोग्रा, गोमती, गंडकी, चंबळा, वटवा, मही, तापी, नर्मदा, महानदी, कृष्णा, गोदावरी, कावेरी, पेन्नार, पालार, ह्या नद्या, व सिंधु, ब्रह्मपुत्रा, आणि शोणभद्र हे नद, प्रसिद्ध आहेत.

व्यापाराचे जिन्नस—नीळ, साखर, चहा, बुंद, तांदूळ, गहूं, कापूस, गळिताचीं धान्यें, रेशीम, सोरा, मीठ, अफू वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात.

---

## भाग ३.

### यूरोप.

यूरोपाच्या उत्तरेस आर्क्तिक महासागर; पश्चिमेस अत्लांतिक महासागर; दक्षिणेस भूमध्य समुद्र, आर्किपेलागो, मार्मोराचा समुद्र, काळा समुद्र व काकेसस पर्वत आणि पूर्वेस कास्पियन समुद्र, उराल पर्वत हीं आहेत.

**यूरोप** आणि **आशिया** हीं एकमेकांस लागून आहेत. **यूरोप** आणि **आफ्रिका** ह्यांच्यामध्यें **भूमध्य** समुद्र आहे व **यूरोप** आणि **अमेरिका** ह्यांच्यामध्यें **अत्लांतिक** महासागर आहे.

**यूरोपांत** १८ राज्यें आहेत. त्यांचीं नांवें:—१ **ग्रेतब्रितन** व **अयर्लंद**, २ **फ्रान्स**, ३ **स्पेन**, ४ **पोर्तुगाल**, ५ **बेलज्यम्** ६ **हालंद** ऊर्फ **नेदर्लंद**, ७ **देन्मार्क**, ८ **स्वीदन** व **नार्वे**, ९ **रशिया**, १० **जर्मनी**, ११ **स्वित्सर्लंद**, १२ **इताली**, १३ **आस्त्रिया** व **हंगरी**, १४ **रूमानिया**, १५ **सार्विया**, १६ **मोन्तेनेग्रो**, १७ **तुर्कस्तान** आणि १८ **ग्रीस**.

**समुद्र**—१ **श्वेत** समुद्र **रशिया**चे उत्तरेस आहे; २ **बाल्तिक्** समुद्र हा एका आंगास **स्वीदन** आणि दुसऱ्या आंगास **जर्मनी** व **रशिआ** ह्यांच्या मध्यें आहे; ३ **जर्मन (उत्तर)** समुद्र हा एका आंगास **इंग्लंद** आणि दुसऱ्या आंगास **जर्मनी** व **देन्मार्क** ह्यांच्या मध्यें आहे; ४ **भूमध्यसमुद्र** **यूरोप** व **आफ्रिका** ह्यांच्या मध्यें आहे; ५ **आद्रियातिक** समुद्र **इताली** व **तुर्कस्तान** ह्यांच्या मध्यें आहे; ६ **आर्किपेलागो** **ग्रीस** व **आशियांतील तुर्कस्तान** ह्यांच्या मध्यें आहे; ७ **मार्मोराचा** समुद्र **यूरोपांतील तुर्कस्तान** व **आशियांतील तुर्कस्तान** ह्यांच्या मध्यें आहे. ८ **काळा (तुर्की)** समुद्र **रशिया** आणि **आशियांतील तुर्कस्तान** ह्यांच्या मध्यें आहे; ९ **अजोवचा** समुद्र **रशियाचे** दक्षिणेस आहे; १० **अयरिश** समुद्र, **उत्तर** खाडी आणि **सेन्त जॉर्जची** खाडी हीं **इंग्लंद** आणि **अयर्लंद** ह्यांच्या मध्यें आहेत; आणि ११ **इंग्लिश** खाडी **इंग्लंद** आणि **फ्रान्स** ह्यांच्या मध्यें आहे.

**धर्म व राज्यरीति**—**यूरोपांत** **मुसलमानी** धर्म एका **तुर्कस्तानामध्यें** मात्र आहे. बाकी सर्वत्र **ख्रिस्ती** धर्म आहे. **ख्रिस्ती** धर्माचीं, **प्रातेस्तंत**, **रोमन क्याथलिक** आणि **ग्रीक** अशीं तीन मतें आहेत. **ग्रीक** मत **रशिया**, **ग्रीस**, **रूमानिया**, **सार्विया**, **मोन्तेनेग्रो** आणि **तुर्कस्तान**चा सुमारें ½ भाग ह्यांत चालतें. **प्रातेस्तंत** मत **ग्रेत ब्रितन**, **हालंद**, **जर्मनी**, **देन्मार्क**, **स्वीदन**, व **नार्वे** आणि **स्वित्सर्लंद** ह्या देशांत चालतें. बाकी सर्व देशांत **रोमन क्याथलिक** मत चालतें.

**तुर्कस्तान** आणि **रशिया** येथील राजे आपल्या मर्जीप्रमाणें राज्य

करितात. **स्वित्सर्लंद** आणि **फ्रान्स** येथें प्रजेच्या संमतानें निवडलेले लोक राज्य करितात. बाकी सर्व देशांत राजे प्रजेच्या संमतानें कायदे ठरवून त्याप्रमाणें राज्य करितात.

### १. ग्रेत ब्रितन आणि अयर्लंद.

हें संयुक्त राज्य महाराणी **विक्तोरिया** हिचें आहे. **ग्रेत ब्रितन** हें **इंग्लंद** व **स्कातूलंद** मिळून एक बेट आहे, व **अयर्लंद** हें निराळेंच बेट आहे.

### इंग्लंद.

**इंग्लंदाचे इंग्लंद** व **वेल्स** असे दोन भाग आहेत. **इंग्लंदांत** ४० व **वेल्सांत** १२ परगणे आहेत. प्रत्येक परगण्यास **कौंती** किंवा **शयर** ह्मणतात.

**इंग्लंदांतील मुख्य शहरें**—**तेम्स** नदीचे कांठीं **लंदन** हें राजधानीचें शहर असून पृथ्वींमध्यें सर्वांत मोठें आहे. **मर्सी** नदीचे कांठीं **लिवर्पूल** हें मोठें बंदर आहे. **मानचेस्तर** हें कापसाचे वस्त्रांच्या कारखान्याकरितां प्रसिद्ध आहे. **तैन** नदीचे कांठीं **न्यूकासल**, ह्या शहराजवळ दगडी कोळशांच्या मोठमोठ्या खाणी आहेत. **बर्मिंगहाम** आणि **शेफील्द** हीं लोखंडी व पोलादी सामानाकरितां प्रसिद्ध आहेत. **नातिंगहाम** हें जाळीदार कापड व पायमोजे ह्यांकरितां प्रसिद्ध आहे. **ब्रिस्तल** आणि **हल** हीं मोठीं बंदरें आहेत. **आक्सफोर्द** आणि **केंब्रिज** हीं शहरें विद्यालयांकरितां प्रसिद्ध आहेत. **कांतर्बरी** आणि **यार्क** येथें मुख्य धर्माधिकारी राहतात. **पोर्तस्मौथ** व **प्लिमौथ** हीं **ब्रितिश** सरकारच्या आरमाराचीं मुख्य ठाणीं आहेत. ह्यांशिवाय **डोवर**, **सौथम्तन**, **ब्रैतन**, **वुल्वर्हाम्तन**, **ब्राद्फर्द**, **कार्लैइल**, **सन्दर्लंद**, वगैरे दुसरीं प्रसिद्ध शहरें आहेत.

**वेल्सांतील मुख्य शहरें**—**कार्दिफ** आणि **स्वानसी** हीं मुख्य बंदरें आहेत. **मरथिर-तिद्विल** हें सर्वांत मोठें शहर आहे. **मिलफर्द-हेवन** हें एक प्रसिद्ध बंदर आहे. हें इतकें मोठें आहे कीं, त्यांत सर्व **इंग्लिश** आरमार चांगले रीतीनें ठेवतां येईल.

**पर्वत**—**चेवियत** डोंगर, हे **इंग्लंद** आणि **स्कातलंद** ह्यांच्या मध्यें आहेत; **स्काफेल** **कंबर्लंद** मध्यें आहे; व **स्नोदन** **वेल्स** मध्यें आहे.

**नद्या**—**टेम्स** ही **इंग्लंद**चे दक्षिण भागांतून वाहत जाऊन **जर्मन** समुद्रास मिळते. हिचे कांठीं **लंदन** शहर आहे. **सेवर्न ब्रिस्तल**च्या खाडीस मिळते. **मर्सी अयरिश** समुद्रास मिळते. हिच्या कांठीं **लिव्हर्पूल** शहर आहे. ह्यांशिवाय **तेन**, **त्रेंत**, **हंबर**, **ऊज**, **टी** आणि **वाय** ह्या मोठ्या नद्या आहेत.

**आखातें**—**साल्वेफिर्थ**, **ब्रिस्तलची** खाडी, **कार्डिगनवे**, **मोरक्यांब** वे आणि **वाश** हीं मुख्य आहेत.

**सामुद्रधुन्या**—**मिलाय**ची सामुद्रधुनी **केरनार्वन** आणि **आँगलसी** ह्यांच्यामध्यें आहे. **डोवर**ची सामुद्रधुनी **जर्मन** समुद्र आणि **इंग्लिश-खाडी** ह्यांच्या मध्यें आहे.

**भूशिरें**—**लांदसएंद** इंग्लन्दचें अगदीं पश्चिमेकडचें टोंक आहे, व **लिजर्द** अगदीं दक्षिणेकडचें टोंक आहे. तसेंच **स्तार्त** आणि **बीचीहेद** हीं **इंग्लंद**चे दक्षिण किनाऱ्यावर आहेत. ह्यांशिवाय **होलीहेद** वगैरे लहान लहान भूशिरें पुष्कळ आहेत.

**सरोवरें**—**दर्वेंतवातर**, **अल्जवातर** व **विंदरमीर** हीं प्रसिद्ध आहेत.

**बेटें**—**अेरिश** समुद्रांत **मान** व **आंगलसी** आणि **इंग्लिश** खाडींत **व्हैत**, **जर्सी**, **गर्नसी**, **आल्दर्नी**, व **सार्क** हीं मुख्य आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—कथील, दगडी कोळसे, कापसाचीं व लोंकरीचीं वस्त्रें, लोखंड व पोलादी सामान, कांच, कागद, यंत्रें वगैरे जिन्नस येथून परमुलखास जातात.

## २. स्कात्लंद.

**स्कात्लंदांत** ३३ परगणे ( कौंती ) आहेत.

**मुख्य शहरें**—**एदिनबरो स्कात्लंद**ची राजधानी आहे. **ग्लासगो** हें **स्कात्लंदांत** सर्वांत मोठें शहर असून तें कापसाचीं वस्त्रें करणें, तारवें बांधणें, यंत्रें करणें, वगैरे कामांकरितां प्रसिद्ध आहे. **आबर्दीन** आणि **दंदी** हीं तागाच्या वस्त्रांच्या कारखान्यांकरितां प्रसिद्ध आहेत. **ग्रीनाक** आणि **लीथ** हीं चांगलीं बंदरें आहेत. **आबर्दीन**, **एदिन्बरो**, **सेन्तआन्ड्रूस** आणि **ग्लासगो** हीं शहरें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहेत. **पर्थ** आणि **पेजली** ह्या ठिकाणीं व्यापाराचे नाना-

प्रकारचे जिन्नस तयार होतात. ह्यांशिवाय **दंडीस, फालकर्क, स्तर्लिंग,** वगैरे मोठीं शहरें आहेत.

**पर्वत**— **ग्रांपियन** नामक डोंगरांचे रांगेमध्यें **बेननेविस** हा **ग्रेत ब्रितनांत** सर्वांत उंच डोंगर आहे. **स्कातृलंद**चा उत्तरेकडचा व मध्यभागचा प्रदेश अगदीं डोंगराळ आहे; व त्यांत लहान लहान डोंगर पुष्कळ आहेत.

**नद्या**—**त्वीद, फोर्थ, ते, दी, स्पे, नेस** व **क्लैद** ह्या मुख्य नद्या आहेत. पैकीं पहिल्या सहा **उत्तरसमुद्रास** मिळतात व **क्लैद उत्तर-खाडीस** मिळते.

**सरोवरें**—**स्कातृलंदां**तील सरोवरें फार रमणीय आहेत. **लाख-लोमंद्** हें सर्वांत मोठें आहे. शिवाय **लाख्शिन, लाख्मारी, लाख्नेस, लाख्आ, लाख्ले** वगैरे पुष्कळ आहेत.

**आखातें**—**स्कातृलंद**चा किनारा जागजागीं तुटलेला असल्या-मुळें त्या किनाऱ्यावर पुष्कळ आखातें आहेत. त्यांत **फोर्थ, ते, मोरे, क्लैद** आणि **साल्वे** हीं मुख्य आहेत.

**भूशिरें**—**दनेतहेद्** हें **स्कातृलंद**चें अगदीं उत्तर टोंक आहे, व **मल्-आफ्-ग्यालोवे** हें अगदीं दक्षिण टोंक आहे.

**बेटें**—उत्तरेस **आर्कनी** व **शेतृलंद** व पश्चिमेस **हेब्रिदीज**, हीं प्रसिद्ध आहेत.

ह्या देशांतील व्यापार **इंग्लंदां**तील व्यापारासारखाच आहे.

## ३. अयर्लंद.

**अयर्लंद्** हें मोठें बेट आहे. त्यांत **अल्स्तर, लिन्स्तर, मनस्तर** आणि **कोन्नात** असे ४ प्रांत आहेत. ह्या प्रांतांत ३२ परगणे ( कौंती ) आहेत.

**शहरें**—मुख्य शहर **दब्लिन लिफी** नदीचे कांठीं आहे. हें राज-धानीचें शहर असून येथें एक विद्यालय आहे. ह्या शहराजवळ **किंगस्तौन** नांवाचें बंदर आहे. **बेल्फास्त** हें तागाच्या कपड्याक-रितां प्रसिद्ध आहे. **वातर्फोर्द, लंदनदेरी, कार्क** व त्याचे जवळचें **क्वीन्सतौन** नांवाचें बंदर आणि **शानन** नदीचे कांठचें **लिमरिक** हीं मोठीं शहरें आहेत.

**पर्वत**—**अयर्लंद्**चे मुख्य पर्वत उत्तर आणि पश्चिम किनाऱ्याजवळ आहेत; त्यांत **केरी** परगण्यांतील सर्वांत उंच आहेत. पूर्व किनाऱ्याजवळ **मोर्न** आणि **विकलो** हे प्रसिद्ध डोंगर आहेत.

**नद्या**—**फाइल** आणि **वान** ह्या उत्तरेकडे वाहतात; **बाइन**, **लिफी** आणि **स्लेनी** ह्या **अयरिश** समुद्रास मिळतात; **सुविर** आणि **ली** ह्या दक्षिणेकडे वाहत जाऊन समुद्रास मिळतात. **शानन** ही **अयर्लंदांत** सर्वांत मोठी नदी आहे. ती पुष्कळ सरोवरांतून वाहत जाऊन **अतलान्तिक** महासागरास मिळते.

**सरोवरें**--**ने**, **अर्न**, **मास्क**, **कारिब**, **री**, **दर्ग**, **किलार्नी** वगैरे पुष्कळ आहेत.

**उपसागर**—**अयर्लंदचा** किनारा जागजागीं तुटलेला असून त्यांत पुष्कळ उपसागर आहेत. पैकीं **दानिगाल**, **स्लैगो**, **गालवे**, **बेलफास्त**, **फाइल** हे मुख्य आहेत.

**भूशिरें**—**केपक्लीअर अयर्लंदचे** दक्षिणेस एका वेटांत आहे. **मालिन्हेद् अयर्लंद्**चें उत्तर टोंक आहे व **फेरहेद्** पूर्वटोंक आहे.

**बेटें**—**राथलिन्** **अयर्लंद्**चे उत्तरेस आहे. **क्लेर**, **वालेन्शिया** आणि **आरन्** हीं बेटें पश्चिमेस आहेत.

**इंग्लंद्** आणि **स्कात्लंद्** ह्या देशांपेक्षां **अयर्लंद** जरी शेतकी आणि खनिज पदार्थ याहीं कमी संपन्न आहे, तरी येथें चराईची सोय चांगली ह्मणून ह्या देशाची प्रसिद्धि आहे. **अयर्लंदा**ची हवा इतकी सौम्य आहे आणि तेथें पाऊस इतका पडतो कीं तेथील शेतें नेहेमीं हिरवीं असतात, ह्यामुळें **अयर्लंदाला** कधीं कधीं हिरवळीचें बेट असेंही ह्मणतात.

## २. फ्रान्स.

फ्रान्सचे ८७ विभाग आहेत. त्यांस **दिपार्तमांग** ह्मणतात.

**शहरें**--येथील राजधानीचें शहर **पारिस**, **सेन** नदीचे कांठीं आहे. हें शहर पृथ्वीमध्यें देखणें आहे. ह्याशिवाय **रुआंग**, **लील**, **तुलूज** वगैरे पुष्कळ मोठीं शहरें असून तीं व्यापार आणि कारखाने यांकरितां प्रसिद्ध आहेत. **ब्रेस्त** आणि **शेर्बूर** ह्या आरमाराच्या

जागा आहेत. ल्वार नदीचे कांठीं नान्स ही व्यापाराची मोठी जागा आहे. गारोन नदीचे कांठीं बोर्दो येथून परमुलखास पुष्कळ दारू रवाना होते. भूमध्यसमुद्राचे कांठीं मार्सेल्स आणि तुलो हीं मोठीं बंदरें आहेत. रोन आणि स्रोन ह्या नद्यांच्या संगमावर लायन्स, हें पारिस शिवाय करून फ्रान्सांत मोठें शहर आहे. हें रेशिमाचे कारखान्यांकरितां प्रसिद्ध आहे

**पर्वत**—पिरनीज फ्रान्स आणि स्पेन ह्यांच्या मध्यें आहे; आणि आल्प्स फ्रान्स व इताली आणि स्वित्झर्लंद ह्यांच्या मध्यें आहे.

**नद्या**—सेन नदी इंग्लिशखाडीस मिळते; ल्वार आणि गारोन ह्या बिस्केच्या उपसागरास मिळतात; आणि रोन ही लायन्सच्या आखातास मिळते.

**आखातें आणि उपसागर**—बिस्केचा उपसागर फ्रान्सचे पश्चिमेस आहे; व लायन्सचें आखात फ्रान्सचे दक्षिणेस आहे.

**भूशिरें**—केप दि-ला-हेग आणि केप बालफ्लूर हीं फ्रान्सचे उत्तरेस आहेत.

**बेटें**—कार्सिका, हीएर्स, उश्यांग वगैरे प्रसिद्ध आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—मद्य, रेशीम, तागाचें आणि लोंकरीचें कापड, जाळीदार कापड, कांच, फळें, जवाहीर वगैरे आहेत. पृथ्वीवर अतिशय सधन व वलाढ्य असे जे देश आहेत त्यांपैकीं फ्रान्स हा एक आहे. येथील लोक मोठे हुशार व उद्योगी असून सर्व कलाकौशल्यांमध्यें वाकबगार आहेत.

## ३. स्पेनदेश.

स्पेन व पोर्तुगाल मिळून एक मोठें द्वीपकल्प फ्रान्सचे दक्षिणेस आहे. स्पेनचे ४९ परगणे आहेत.

**शहरें**—एथील राजधानी माद्रिद ही मान्सानारेस नदीच्या कांठीं आहे. तोलेथो तेगस नदीच्या कांठीं आहे. सालमान्का एथें एक प्रसिद्ध विद्यालय आहे. थारागोथा एब्रोनदीच्या कांठीं आहे. त्याशिवाय सेविल्ला आणि ग्रानादा हीं मोठीं शहरें आहेत. बार्थेलोना, वालेन्थिया, कादिथ आणि कोरुनिया हीं मोठीं बंदरें आहेत.

**स्पेन**च्या दक्षिणेस **जिब्रालतर** नांवाचा मजबूद किल्ला, त्याच नांवाच्या सामुद्रधुनीवर आहे. तो **इंग्लिशांचे** ताब्यांत आहे.

**पर्वत**—मुख्य पर्वत **पिरनीज** हा **फ्रान्स** आणि **स्पेन** ह्यांच्या मध्यें आहे. ह्याशिवाय दुसरे लहान पर्वत पुष्कळ आहेत.

**नद्या**—**दूरो**, **तेगस**, वगैरे नद्या **अतलान्तिक** महासागरास मिळतात. **एब्रो भूमध्यसमुद्रास** मिळते.

**भूशिरें**—**ओर्तेगाल स्पेनचें** अगदीं उत्तरेकडील टोंक आहे; **फिनिस्तेर** अगदीं पश्चिमेकडील टोंक आहे; व **क्रूस** अगदीं पूर्वेकडचें टोंक आहे. **त्राफल्गार स्पेन**च्या दक्षिणेस आहे. **तारीफा स्पेन**चें व **यूरोपचें** अगदीं दक्षिणेकडचें टोंक आहे.

**सामुद्रधुन्या**—**जिब्रालतर**ची सामुद्रधुनी **स्पेन** आणि **आफ्रिका** ह्यांच्या मध्यें आहे. ह्या सामुद्रधुनीच्या योगानें **भूमध्यसमुद्र अतलान्तिक** महासागराशीं जोडला गेला आहे.

**बेटें**— **माजोर्का**, **मिनोर्का**, **इवीसा** व **फोरमेन्तेरा**, हीं **भूमध्यसमुद्रांत** आहेत. ह्यांना **बालियारिक** बेटें ह्मणतात. **कानेरी** बेटें **अतलान्तिक** महासागरांत आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—धान्य, घोडे, चामडीं, तरवारी, रेशीम, लोंकर, मद्य, बदाम, नारिंगें वगैरे फळें हे आहेत. **स्पेन** देश खनिज पदार्थांनींही संपन्न आहे.

**स्पेन** देशांतील लोक आळशी आणि अव्यवस्थित आहेत म्हणून **युरोपांत** त्यांचें वजन मुळींच नाहीं. ते **स्पानिश** भाषा बोलतात.

## ४. पोर्तुगाल.

ह्या देशांत १० परगणे आहेत.

**शहरें**—मुख्य राजधानीचें शहर **लिस्बोन** हें **तेगस** नदीच्या मुखाजवळ आहे. **दुरो** नदीच्या मुखाजवळचें **ओपोर्तो** हें द्राक्षासवाकरितां प्रख्यात आहे. **कोइंब्रा** हें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहे.

**नद्या**—**दूरो** आणि **तेगस** ह्या मुख्य आहेत.

**भूशिरें**—**सेन्तविन्सेन्त पोर्तुगालचे** दक्षिणेस आहे; परंतु अगदीं

दक्षिणेकडचें टोंक **सान्तामारिआ** हें आहे. **रोका** हें ह्या देशाचें व **युरोपखंडाचें**ही अगदीं पश्चिमेकडचें टोंक आहे.

**बेटें**—**ओझोर्स, मदीरा** बेटें आणि **केपवर्द** बेटें, हीं **अतलान्तिक** महासागरांत आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—मद्य, लोंकर, बदाम, नारिंगें आणि दुसरीं फळें, रेशमाचीं वस्त्रें, वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात. **पोर्तुगाल** देशांतील डोंगरांत खनिज पदार्थांची समृद्धि आहे.

ह्या देशांतील लोक **स्पेन** देशांतील लोकांपेक्षां अधिक उद्योगी आहेत. ते **पोर्तुगीज** भाषा बोलतात.

## ५. बेलज्यम्.

हा लहान देश **फ्रान्स**चे ईशान्येस आहे. ह्याचे ९ परगणे आहेत.

**शहरें**—मुख्य राजधानीचें शहर **ब्रूसेल** हें **सेन्न** नदीचे कांठीं आहे. येथील जाळीदार कापड आणि गालीचे प्रसिद्ध आहेत. **आंतवर्प** ही **स्केल्त** नदीचे कांठीं मोठी व्यापाराची जागा आहे. **मालिन्स** (अथवा मेक्लिन) हें जाळीदार कापड आणि तागाचीं वस्त्रें ह्याकरितां प्रसिद्ध आहे. **स्केल्त** आणि **लीस** ह्यांचे संगमावर **गेंत** ही विद्यालयाची मुख्य जागा असून तेथें पुष्कळ कारखाने आहेत. **लिएज** हें लोखंडी काम व घड्याळें ह्यांचे कारखान्यांकरितां प्रसिद्ध आहे. **ओस्तेंद** हें मुख्य बंदर आहे.

**नद्या**—**म्युज** (अथवा मास) आणि **स्केल्त** ह्या **जर्मनसमुद्रास** मिळतात.

जाळीदार कापड व नानाप्रकारचीं बारीक वस्त्रें ह्यांकरितां ह्या देशाची प्रसिद्धि आहे. ह्यांत लोखंड आणि दगडी कोळसे ह्यांच्या मोठमोठाल्या खाणी आहेत. एथील जमीन सुपीक आहे, व वस्ती **यूरोपां**तील कोणत्याही देशापेक्षां दाट आहे. एथील लोकांस **बेलजी** ह्मणतात. येथें **फ्रेंच** व **डच** भाषा चालतात. लोक उद्योगी आणि कारागिरीच्या कामांत कुशल आहेत.

## ६. हालंद ऊर्फ नेदर्लंद.

**हालंद** देश **बेलज्यम**च्या उत्तरेस आहे. त्याचे ११ परगणे आहेत.

**बेलज्यम**च्या दक्षिणेस व **फ्रान्स** आणि **जर्मनी** ह्यांच्या मध्यें **लक्सें-बूर्ग**चें लहानसें स्वतंत्र संस्थान आहे. **हालंद्चा** राजा तोच **लक्सें-बूर्ग**चा **ग्रांद्ड्यूक** असतो.

**शहरें**— राजधानीचें शहर **अमस्तरदाम** हें **वाय** नदीचे कांठीं असून व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. **रातरदाम** ही **म्यूज** नदीचे कांठीं मोठी व्यापाराची जागा आहे. वायव्येकडे **हेग** ही न्यायाची मुख्य जागा आहे. **लेद्न, उत्रेक्त** आणि **ग्रोनिन्गेन** ह्या विद्यालयांच्या जागा आहेत.

**नद्या—म्यूज** (अथवा मास), **ऱ्हैन** आणि **स्केल्त** ह्या मुख्य आहेत. त्या **जर्मनसमुद्रास** मिळतात.

**बेटें—वालचेरेन, तेक्सेल** वगैरे पुष्कळ बेटें ह्या देशाचे लगत्यास आहेत.

हा देश सपाटीचा असून त्यांत समुद्राचे बाजूनें पुष्कळ खाड्या आहेत. समुद्राचें पाणी देशांत न यावें म्हणून मोठमोठे धक्के बांधले आहेत. व्यापाराचे सोयीकरितां पुष्कळ कालवे केले आहेत. ह्या देशांतून गुरें आणि खारे मासे परमुलखास रवाना होतात.

ह्या देशांतील लोकांस **दच** म्हणतात. ते उद्योगी, हुशार, शेतकी व बागबगीचे करण्यांत कुशल आणि दर्यावर्दीपणांत मोठे धाडशी आहेत. त्यांची भाषा **जर्मन** भाषे जवळ जवळ आहे. **दच** आणि **बेलजी** लोक मानसिकश्रमसाध्य कलांत आणि विशेषेंकरून चित्रविद्येंत प्रवीण आहेत, अशी आख्या आहे. सर्व हस्तकौशल्याचे कामांत ते कुशल आहेत.

## ७. देन्मार्क.

**जतलन्द्**चें द्वीपकल्प व त्याचे लगत्याचीं बेटें मिळून **देन्मार्क**चें राज्य झालें आहे. **जतलन्द् जर्मनी**चे उत्तरेस, **बाल्तिक** समुद्र व **जर्मन** समुद्र ह्यांच्या मध्यें आहे.

**शहरें**—मुख्य राजधानीचें शहर **कोपनहेगन** हें **सीलन्द्** बेटांत आहे. दुसरें मोठें शहर **एल्सिनोर** हेंही त्याच बेटांत आहे.

**आखातें—लिम्फिअर्द्** हें **जतलन्द्**मध्यें आहे.

**सामुद्रधुन्या**—**सौंद**, **सीलन्द** आणि **स्वीदन** ह्यांच्या मध्यें; **ग्रेतबेल्त**, **सीलन्द** आणि **फ्यूनेन** ह्यांच्या मध्यें; **लितलबेल्त**, **फ्यूनेन** आणि **जर्मनीं**तील **स्लेस्वीग** ह्यांच्या मध्यें; **कातेगत**, **देन्मार्क** आणि **स्वीदन** ह्यांच्या मध्यें; आणि **स्केगरराक**, **देन्मार्क** आणि **नार्वे** ह्यांच्या मध्यें आहे.

**बेटें**—**सीलन्द**, **फ्यूनेन**, **लालन्द**, तसेंच **अत्लांतिक** महासागरांतील **ऐस्लन्द** व त्याच्या दक्षिणेचीं **फेर्यू** बेटें हीं **देन्मार्क**चे ताब्यांत आहेत. **ऐसलन्द** हें बेट **ग्रीनलन्द**चे पूर्वेस आहे व त्यांत **हेक्ला** नामक प्रसिद्ध ज्वालामुखी पर्वत आहेत.

ह्या देशांतुन गुरें व धान्य हीं परमुलखास रवाना होतात. येथील लोक **स्वीदन** व **नार्वे** येथील लोकांसारखे आहेत. ते उद्योगी, हुशार व दर्यावर्दीपणांत कुशल आहेत.

## ८. स्वीदन व नार्वे.

**स्वीदन** आणि **नार्वे** मिळून एक द्वीपकल्प आहे. त्याला **स्कांदिनाविया** ह्मणतात. त्याचे उत्तरेस **आर्क्तिक** महासागर; पश्चिमेस **अत्लान्तिक** महासागर आणि **जर्मन** समुद्र; दक्षिणेस **स्केगरराक**, **कातेगत** व **सौंद**; आणि पूर्वेस **बाल्तिक** समुद्र व **बाथन्याचें** आखात हीं आहेत.

**स्वीदन** आणि **नार्वे** मिळून एक राज्य आहे.

### ( १ ) स्वीदन.

**स्वीदन** हा देश **नार्वे**पेक्षां मोठा असून त्याचे पूर्वेस आहे. ह्याचे ३ विभाग आहेत.

**शहरें**—राजधानीचें शहर **स्ताकहोम** हें **बाल्तिक**समुद्र आणि **मेलर**चें सरोवर ह्यांच्या संगमावर आहे. ह्याचे उत्तरेस **उप्सला** हें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहे. **गोतनबोर्ग** हें **स्ताकहोम** शिवाय करून एथील व्यापाराची मुख्य जागा आहे. **कार्लस्क्रोना** हें **स्वीदन**चें आरमाराची मुख्य जागा आहे.

**सरोवरें**—**वेनर**, **वेत्तर** आणि **मेलर** हीं मुख्य आहेत.

**बेटें**—**गोतलन्द** व **ईलन्द** हीं मुख्य आहेत.

### (२) नार्वे.

**नार्वे**चे ६ विभाग आहेत.

**शहरें**—**क्रिस्तियानिया** ही **नार्वेची** राजधानी आहे; **बर्गेन** हें शहर व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. उत्तरेस **हामरफेस्त** हें **यूरोपां**त अगदीं उत्तरेकडचें शहर आहे. एथें उन्हाळ्यांत एक दिवस दोन महिन्यांचा होतो, व हिंवाळ्यांत एक रात्र दोन महिन्यांची होते.

**पर्वत**—हा देश अगदीं डोंगराळ आहे. एक मोठी डोंगरांची ओळ उत्तरेकडून दक्षिणेकडे गेली आहे. उत्तरेकडील डोंगर **किओलेन** पर्वत ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे पर्वत **स्वीदन** आणि **नार्वे** ह्यांचे मधल्या हद्दीवर आहेत.

**भूशिरें**—केप **नार्दकिन** हें **यूरोपाचें** अगदीं उत्तरेकडचें टोंक आहे. तसेंच **उत्तरकेप** हें उत्तरेस आहे व **नाज** हें दक्षिणेस आहे.

**बेटें**—ह्या देशाचे सर्व किनाऱ्याजवळ लहान लहान पुष्कळ बेटें आहेत. त्यांत **मागेरू** बेटें, व **लोफेदेन** बेटें, हीं प्रसिद्ध आहेत. **मिलस्त्रीम** नांवाचा प्रसिद्ध भोंवरा **लोफेदेन** बेटांपैकीं **दोन** बेटांमध्यें आहे. ह्या देशाचा किनारा फार तुटक आहे म्हणून त्यांत आखातें आणि उपसागर बहुत आहेत. **स्वीदन**प्रमाणें ह्यांत पुष्कळ सरोवरें आहेत. परंतु लहान लहान आहेत.

**स्वीदन** आणि **नार्वे** ह्या देशांतून लोखंड, तांबें, रुपें, धान्य, लाकूड वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात. **स्वीदन** देशांतील लोखंडाच्या खाणी सर्व पृथ्वीमध्यें फार प्रसिद्ध आहेत.

ह्या देशांतील लोक उद्योगी आणि हुशार असून **देन्स** लोकांप्रमाणें दर्यावर्दीपणांत कुशल आहेत.

## ९. रशिया.

**रशिया**चे उत्तरेस **आर्क्तिक** महासागर, आणि **नार्वे**; पश्चिमेस **स्वीदन**, **बाथन्याचें** आखात, **बाल्तिक** समुद्र, **प्रुश्या**, **आस्त्रिया** आणि **रुमानिया**; दक्षिणेस **काळा** समुद्र व **काकेसस** पर्वत आणि पूर्वेस **कास्पियन** समुद्र, **उराल** नदी आणि **उराल** पर्वत हीं आहेत.

**कास्पियन** समुद्र, **उराल** नदी व **उराल** पर्वत ह्यांचे पूर्वेकडील व **काकेसस** पर्वतांचे दक्षिणेकडील देश **रशियाचे**च आहेत, परंतु ते **आशियांतील** असल्यामुळें त्यांचें वर्णन पूर्वी झालेंच आहे. येथें **यूरोपांतील** देशांचें मात्र वर्णन करणें आहे. **फिन्लंद** आणि **पोलंदचे**

प्राचीन राज्यापैकीं **रशियाचा** वांटा मिळून **यूरोपांतील रशियाचे** ५३ विभाग आहेत.

**शहरें**—**रशियाची** हल्लींची राजधानी **सेन्तपीतर्सबर्ग** ही **नीवा** नदीचें कांठीं आहे. पूर्वींची राजधानी **मास्को** ही **मास्का** नदीचे कांठीं आहे. हें शहर देशाचे मध्यभागीं असल्यामुळें लढाऊ जहाजें बाळगण्याची सोई नव्हती ह्मणून **सेन्तपीतर्सबर्ग** ही राजधानी **पीतर दी ग्रेत** ह्या बादशाहानें इसवी सन १७०३ ह्या वर्षी स्थापिली. ह्या शहराजवळ **क्रानस्तान** ह्मणून एक तटबंदी बंदर आहे. **विस्तुला** नदीचे कांठीं **वार्सा** नामें **पोलन्द्**ची प्राचीन राजधानी आहे. **दूना** नदीचे मुखाजवळ **रैगा** हें मोठें बंदर आहे. **द्वीना** नदीचे मुखाजवळ **आर्केंजल** हें एक बंदर आहे. **वोलगा** नदीचे मुखाजवळ **आस्त्राखान** हें मोठें बंदर आहे. **काळ्या** समुद्रावर **आदेसा** हें एक बंदर आहे. **क्रिमीया** द्वीपकल्पाचे किनाऱ्यावर **सेबास्तपूल** ही आरमाराची मोठी जागा आहे.

**पर्वत**--**काकेसस** (यूरोपांत सर्वांहून उंच पर्वत) आणि **उरल** पर्वत हे मुख्य आहेत.

**नद्या**—**द्वीना श्वेत** समुद्रास मिळते. **विस्तुला** ही **रशिया** व **प्रशिया** ह्या देशांतून वाहत जाऊन **बाल्तिक** समुद्रास मिळते. **नियेपर** काळ्या समुद्रास मिळते. **दॉन अजोव** समुद्रास मिळते. **वोलगा** आणि **उराल** ह्या कास्पियन समुद्रास मिळतात.

**सरोवरें**--**लादोगा, ओनेगा, इलमेन** वगैरे अनेक आहेत. त्यांत **लादोगा** हें यूरोपांत सर्वांत मोठें गोडें पाण्याचें सरोवर आहे. **कास्पियन** समुद्र हें पृथ्वीमध्यें सर्वांहून मोठें खाऱ्या पाण्याचें सरोवर **यूरोपांतील रशिआ** व **आशियांतील रशिआ** ह्यांच्या मध्यें आहे.

**आखातें आणि उपसागार**—**आर्केंजल** आणि **ओनेगा** हे उपसागर **श्वेत**समुद्रांत आहेत; **बाथन्या, फिन्लंद** आणि **रैगा** हीं आखातें **बाल्तिक** समुद्रांत आहेत. **पेरिकोप**चें आखात **क्रिमीया** आणि **रशिया** ह्यांच्या मध्यें आहे.

**सामुद्रधुन्या**—**केर्तच**ची सामुद्रधुनी **अजोव्**चा समुद्र आणि **काळा** समुद्र ह्यांच्या मध्यें आहे.

**बेटें**—**स्पित्सबर्ग** आणि **नोवाजेम्ला** हीं **आर्क्तिक्** समुद्रांत आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—येथें धान्य, अंबाडी, ताग, लांकूड, चामडीं, चरबी, तेल, डामर, लोंकर, कितान, दोरखंडें वगैरे जिन्नस उत्पन्न होऊन परमुलखास रवाना होतात.

**रशिया**—हा देश मुख्यत्वें शेतकीचा व चराईचा आहे. परंतु **उराल** पर्वतांत धातूंची चांगली समृद्धि असल्यामुळें येथें कारागिरीचे कामांचीही सुरवात होत चालली आहे. येथील बादशाहास **झार** असें ह्मणतात व तो आपल्या मर्जीप्रमाणें राज्य करितो. **यूरोपां**तील इतर सर्व देशांपेक्षां सुधारणुकीचे कामांत जरी **रशिआ** मागें आहे, तरी एवढा मोठा देश एका मनुष्याचे ताब्यांत असल्यामुळें **यूरापां**तील फार बलाढ्य देशांमध्यें त्याची गणना होते.

ह्या देशांतील लोकांच्या जाति अनेक आहेत. पैकीं बहुतेक **स्लावानिक** घराण्यापैकीं आहेत. उत्तरेस व दक्षिणेस **मोंगोलिअन** ( मोंगल ) अथवा **तार्तर** घराण्यापैकीं लोक आहेत. जातिभेदपरत्वें भाषाही अनेक आहेत; पैकीं **रशियन** भाषा फार प्रचारांत आहे.

## १०. जर्मनी.

ह्या देशाचे उत्तरेस **जर्मन** समुद्र, **देनार्क** आणि **बाल्तिक** समुद्र; पूर्वेस **रशिया**; आग्नेयीस व दक्षिणेस **आस्त्रिया** व **स्वित्सर्लंद**. आणि पश्चिमेस, **फ्रान्स**, **बेलज्यम** आणि **हालंद** हे देश आहेत.

ह्या देशांत चार मोठीं संस्थानें व एकुणीस लहान संस्थानें मिळून २३ विभाग आहेत. त्या सर्वांचा एक कट आहे. **प्रुश्याचें** संस्थान सर्वांत मोठें आहे, ह्मणून तीं सर्व संस्थानें **प्रुश्याचे** राजास आपला बादशाहा मानितात.

चार मोठीं संस्थानें आहेत तीं:—

| | | |
|---|---|---|
| **प्रुश्या.** | राजधानी. | बर्लिन. |
| **साक्सनी.** | ,, | ड्रेसदेन. |
| **बाबारिया.** | ,, | मुनिक. |
| **बर्तंबर्ग.** | ,, | स्तुतगार्त. |

**शहरें**—**विस्तुला** नदीचे मुखाजवळ **दांजिग**, ही धान्याचे व्यापारांची मोठी जागा आहे. **ओदर** नदीचे कांठीं **ब्रेस्लाव**, **फ्रांक्‌फूर्त** आणि **स्तेतीन** हीं मोठीं शहरें आहेत. **स्प्री** नदीचे कांठीं **बर्लिन** ही **जर्मनी**ची राजधानी व मोठी विद्येची जागा आहे. **एल्ब** नदीचे कांठीं **द्रेसदेन**, **माग्देबूर्ग**, **हंबुर्ग** आणि **आल्तोना** हीं मोठीं शहरें आहेत; पैकीं, **द्रेसदेन** ही **साक्सनी**ची राजधानी आहे; **माग्देबूर्ग** हें मोठें मजबूद शहर आहे; व **हंबुर्ग** हें स्वसत्ताक शहर असून साऱ्या **जर्मनीं**त व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. **वेझर** नदीचे कांठीं **ब्रेमन** हेंहीं स्वसत्ताक शहर आहे. **मेन** नदीचे कांठचें **फ्रांकफूर्त**, **व्हैन** नदीचे कांठचीं **स्त्रासबुर्ग** आणि **कोलोन**, व **मोसेली** नदीचे कांठचें **मेत्झ** हीं मोठीं शहरें आहेत. **लेप्सिक**, **गार्तिंजन**, **म्युनिक** आणि **साल** नदीचे कांठचें **हाल** हीं शहरें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहेत. **कील**, **लूबेक**, **स्त्रालसुंद** आणि **कोनिग्‌जबर्ग** हीं **बाल्तिक** समुद्राचे लगत्यास मोठीं बंदरें आहेत. पैकीं **लूबेक** स्वसत्ताक आहे.

**नद्या**—**विस्तुला** आणि **ओदर** ह्या **बाल्तिक** समुद्रास मिळतात; **एल्ब**, **विझर** आणि **व्हैन** ह्या **जर्मन** समुद्रास मिळतात. **दान्यूब** ही मोठी नदी दक्षिणकडील **वर्तंबर्ग** आणि **बावारिया** ह्या संस्थानांतून **आस्त्रिया** देशांत गेली आहे.

**बेटें**—**बाल्तिक** समुद्रांत **रुगेन**, हें **जर्मनी**चे ताब्यांतील बेटांमध्यें मोठें आहे.

एकंदरीनें पाहतां **जर्मनी** हा अगदीं सपाट देश आहे. परंतु दक्षिण आणि पश्चिम हद्दीवर डोंगरांच्या रांगा आहेत आणि **आल्प्स** पर्वतांचे फांटे **वर्तंबर्ग** आणि **बावारिया** ह्या संस्थानांस लागून आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—लोंकर, वाख, लांकूड, धान्य, तंबाखू, जस्त, द्राक्षासव, शेंदेलोण, मातीचें तेल, हे जिन्नस व गुरें ह्या देशांतून परमुलखास रवाना होतात. ह्या देशांत पुष्कळ कारखाने आहेत, त्यांत ताग, लोंकर व रेशीम ह्यांचीं वस्त्रें, खेळणीं, मातीचीं भांडीं, सुगंधी पदार्थ, द्राक्षासव, यंत्रें, वाद्यें, वगैरे जिन्नस तयार होतात.

ह्या देशांत धातूंच्या व रत्नांच्या खाणी पुष्कळ आहेत व

जमीन बरीच पिकाऊ आहे. येथील लोक उद्योगी व कलाकौशल्यांत कुशल आहेत. येथें शस्त्रें चांगलीं होतात. यूरोपांतील फार बलाढ्य देशांमध्यें ह्या देशाची गणना होते.

## ११. स्वित्सर्लंद.

हा लहान देश उत्तरेस व पूर्वेस जर्मनी आणि आस्त्रिया, दक्षिणेस इताली आणि पश्चिमेस फ्रान्स ह्यांचे मध्यें आहे.

ह्या देशाचे २२ परगणे आहेत. त्यांस क्यांतान म्हणतात.

**शहरें**—ऱ्होन नदीचे उगमाजवळ जेनीवा हें घड्याळें आणि जवाहीर ह्यांचे कारखान्यांकरितां प्रसिद्ध आहे. ऱ्हैन नदीचे कांठीं बाजल् ऊर्फ बाल हें रेशिमाचे व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. आर नदीचे कांठीं बर्न ही ह्या देशाची राजधानी आहे. जूरिक येथें एक प्रसिद्ध विद्यालय आहे.

**पर्वत**—यूरोपामध्यें स्वित्सर्लंद हा अति डोंगराळ देश आहे. त्यांत आल्प्स पर्वतांच्या तीन मोठ्या ओळी आहेत. मांग्ब्लांग हें आल्प्स पहाडाचें फार उंच शिखर फ्रान्स, स्वित्सर्लंद, आणि, इताली ह्यांचे सरहद्दीवर आहे.

**नद्या**—यूरोपांत स्वित्सर्लंद हा मोठा पाणलोट आहे; त्यांत ऱ्हैन आणि ऱ्होन ह्या मुख्य नद्या आहेत. शिवाय दान्यूब आणि पो, ह्या नद्यांस आल्प्स पर्वतांवरील बर्फापासून पाण्याचा पुरवठा होतो.

**सरोवरें**—कान्स्तान्स आणि जेनीवा हीं मुख्य आहेत. पहिल्यापासून ऱ्हैन नदी निघते व दुसऱ्यापासून ऱ्होन नदी निघते. ह्यांखेरीज दुसरीं सुंदर सरोवरें पुष्कळ आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—रेशीम, घड्याळें, जवाहीर, जाळीदार कापड, लांकूड, गुरें वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात.

स्वित्सर्लंद हा बहुतकरून शेतकीचा देश आहे. परंतु लोक उद्योगी आणि कुशळ असून पुष्कळ प्रकारचीं कारागिरीचीं कामें करितात.

ह्या देशांत पुष्कळ लोक फ्रेंच लोकांचे व कांहीं इतालियन लोकांचे वंशज आहेत; परंतु मोठा भरणा जर्मन लोकांचे वंशजांचा आहे.

## १२. इताली.

**इताली** हें द्वीपकल्प असून त्याचा आकार मनुष्याचे पायासारखा आहे. ह्याचे उत्तरेस **आल्प्स** पर्वत असून पलीकडे **आस्त्रिया** व **स्वित्सर्लंड** हे देश आहेत; पश्चिमेस **फ्रान्स** व **भूमध्य**समुद्र, दक्षिणेस **भूमध्य** समुद्र, आणि पूर्वेस **आद्रिआतिक** समुद्र व **आस्त्रिया** हीं आहेत. ह्या देशाचे ६३ विभाग आहेत.

**शहरें**—**तैबर** नदीचे कांठीं **रोम**, **इताली**ची राजधानी; हें शहर इ० स० पूर्वी ७५३ वे वर्षी स्थापिलें. पृथ्वीवरील फार प्रसिद्ध शहरांपैकीं हें एक आहे. ह्या शहरांत **पोप** ह्मणजे **रोमन क्याथलिक** मताचा मुख्य राहतो. **भूमध्य**समुद्राचे कांठीं **नेपल्स** हें **इताली**मध्यें सर्वांत मोठें शहर आहे. **मिलान**, प्राचीन **लांबार्दी** प्रांताची राजधानी आहे. **सिसली**चे उत्तर किनाऱ्यावर **पालर्मो** ही त्या बेटाची राजधानी आहे. **पो** नदीचे कांठीं **तुरिन**, प्राचीन **पीद्मांत** प्रांताची राजाधानी आहे. **आर्नो** नदीचे कांठीं **फ्लारेन्स** ही प्राचीन **तस्कनी**ची राजधानी आहे. ह्या शहराजवळ **लेघार्न** हें मोठें बंदर आहे. **जेनोवा** हें बंदर **जेनोवा**चे आखातावर आहे. **आद्रिआतिक** समुद्राचे कांठीं **वेनिस्** हें प्रसिद्ध बंदर आहे. **पादुआ** हें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहे. ह्यांशिवाय, **बोलोना**, **पार्मा**, **मेसीना**, हीं शहरें व **ब्रिन्दीसी** हें बंदर हींही प्रसिद्ध आहेत. **सानमारीनो** हें स्वसत्ताक संस्थान आहे.

**पर्वत**—उत्तरेस **आल्प्स** पर्वत आहे. **अपेनैन** पर्वत हा दक्षिणोत्तर आहे. **नेपल्स** शहराजवळ **वेसूविअस** व **सिसिली** बेटांत **एतना** हे प्रसिद्ध ज्वालामुखी पर्वत आहेत.

**नद्या**—**पो** आणि **आदिज** ह्या **आद्रिआतिक** समुद्रास मिळतात. **आर्नो** आणि **तैबर** ह्या भूमध्यसमुद्रास मिळतात.

**सरोवरें**—**गार्दा**, **कोमो**, आणि **माजिओर** हीं मुख्य आहेत. ह्यांशिवाय दुसरीं पुष्कळ सुंदर सरोवरें आहेत.

**आखातें**—**वेनिसचें**, **तारांतोचें**, आणि **जेनोवाचें** हीं मुख्य आखातें आहेत.

**सामुद्रधुन्या**—**ओत्रांतो**ची सामुद्रधुनी **इताली** आणि **तुर्कस्थान** ह्यांच्या मध्यें आहे; **मेसीना**ची सामुद्रधुनी **इताली** आणि **सिसिली** ह्यांच्या मध्यें आहे; आणि **बोनिफाशिओ**ची सामुद्रधुनी **सार्दिनिआ** आणि **कार्सिका** ह्यांच्या मध्यें आहे.

**भूशिरें**—**स्पार्तिवेन्तो** हें **इताली**चे दक्षिणेस आहे; आणि **पासारो** **सिसिली**चे दक्षिणेस आहे.

**बेटें** —ह्या देशाचे लगत्यास **सिसिली**, **सार्दिनिया**, **कार्सिका**, **एल्बा** वगैरे पुष्कळ बेटें आहेत. **भूमध्य** समुद्रांतील बेटांमध्यें **सिसिली** हें सर्वांत मोठें आहे. त्याचा आकार त्रिकोणाकृति आहे व तें **इताली**चे दक्षिण टोंकाजवळ आहे. **सिसिली**चे दक्षिणेचीं **माल्ता**, **गोजो** आणि **कोमीनो** हीं बेटें इंग्लिशांचे ताब्यांत आहेत. **कार्सिका** बेट **फ्रान्सा**चे ताब्यांत आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—फळें, तेल, मद्य, रेशीम, ताग, गंधक, यंत्रें व संगमरवरी दगड हे आहेत.

येथील लोक हुशार पण गरीब व आळशी आहेत. शेतकी हा त्यांचा मुख्य धंदा आहे; तरी काव्य, अलंकार, गायन, चित्र इत्यादि मानसिकश्रमसाध्य कला ह्यांकरितां त्यांची प्रसिद्धी आहे. ते **इताल्यन** भाषा बोलतात. **इताल्यन**, **फ्रेंच**, **स्पानिश** व **पोर्तूगीज** ह्या भाषा लातिन भाषेपासून झाल्या असल्यामुळें अगदीं जवळ जवळ आहेत.

## १३. आस्त्रिया व हंगरी.

**आस्त्रिया** व **हंगरी** मिळून एक प्रबळ राज्य आहे. तेथील अधिकाऱ्यास **आस्त्रिया**चा बादशाहा व **हंगरी**चा राजा असें ह्मणतात.

ह्या राज्याचे उत्तरेस **रशिया** आणि **जर्मनी**; पश्चिमेस **जर्मनी**, **स्वित्सर्लंद** आणि **इताली**; दक्षिणेस **इताली**, **आद्रिआतिक** समुद्र, **तुर्कस्तान** आणि पूर्वेस **रुमानिया** आणि **रशिया** हे आहेत. **हंगरी** **आस्त्रिया**चे पूर्वेस आहे.

**आस्त्रिया**चे १७ विभाग आहेत; पैकीं दोन **पोलंद**चे प्राचीन राज्यांतून मिळालेले आहेत. **हंगरी**चे ५ विभाग आहेत.

शहरें—दान्यूब नदीचे कांठीं विएन्ना, आस्त्रियाची राजधानी, प्रेसबूर्ग, ब्यूडा आणि पेस्त, हंगरीची राजधानी, हीं आहेत. ह्यांशिवाय प्राग, बोहिमिया प्रांताची राजधानी आहे. तिरोलप्रांतांतील इन्स्ब्रूक, हें विद्यालयाकरितां प्रसिद्ध आहे. त्रिएस्त हें आद्रिआतिक समुद्राचे कांठीं मोठें बंदर आहे. हंगरी प्रांतांत देब्रेत्सिन हें कारागिरीचे कामांकरितां प्रसिद्ध आहे. सिराजोवो हें बास्नया प्रांतांत मुख्य शहर आहे.

पर्वत—आस्त्रिया हा अगदीं डोंगराळ देश आहे. ह्याचे दक्षिणेस व पश्चिमेस आल्प्स नामक उंच पर्वत आहेत. हंगरीचे उत्तरेस व पूर्वेस कार्पाथियन पर्वत आहेत.

नद्या—मुख्य नदी दान्यूब ही जर्मनींतून आस्त्रियांत आली आहे, हिला पुष्कळ नद्या मिळतात, त्यांत इन, द्राव, तैस, व साव ह्या मोठ्या आहेत.

सरोवरें—बालातोनसी आणि नाइसीद्लरसी हीं मुख्य आहेत.

व्यापाराचे जिन्नस—धान्य, ताग, पोत, तेल, फळें, मद्य, लोंकर, लांकूड, लोखंडी व पितळी सामान, यंत्रें, वाद्यें वगैरे जिन्नस येथून परमुलखास रवाना होतात.

ह्या राज्यांत जमीन पिकाऊ आहे. आणि धातूंच्या व उपधातूंच्या खाणी चोहोंकडे पुष्कळच आहेत.

राज्यकारभाराचे कामांत आस्त्रियामध्यें जर्मन घराण्यांतील लोक व हंगरीमध्यें मोंगोलियन घराण्यापैकीं माग्यार लोक प्रमुख आहेत. परंतु दोन्ही देशांत स्लाव्होनियन लोकांचा भरणा फार आहे. तसेंच आग्नेयी बाजूस ग्रीक व नैर्ऋत्य बाजूस इताल्यन लोकांचे वंशज पुष्कळ आहेत.

## १४. रूमानिया.

हें संस्थान पूर्वी तुर्कस्तानचे सुलतानास खंडणी देत होतें, परंतु आतां स्वतंत्र आहे. ह्याचें क्षेत्रफळ ४८,३०७ चौरसमैल व लोकसंख्या ५५,००,००० आहे. हें एका राजाचे ताब्यांत आहे व तेथील राज्यव्यवस्था बहुतकरून इंग्लंदचे राज्यव्यवस्थेप्रमाणेंच आहे. हें संस्थान प-

श्चिमेस **हंगरी** व पूर्वेस **काळा** समुद्र ह्यांच्या मध्यें आहे. ह्याचे उत्तरेस व ईशान्येस **प्रूथ** नदी असून पलीकडे **रशिया** देश आहे. दक्षिणेस **दान्यूब** नदी असून पलीकडे **बुलगारियाचें** संस्थान आहे. **सिलिस्त्रियाचे** पलीकडे गेल्यावर **दान्यूब** नदी उत्तरवाहिनी होऊन ह्या संस्थानांतून वाहत गेली आहे. तेथून ह्या संस्थानची दक्षिण हद्द थेट **काळ्या** समुद्रापर्यंत गेली आहे.

**पर्वत—कर्पाथियन** पर्वत **रुमानिया** आणि **हंगरी** ह्यांच्या मध्यें आहे.

**नद्या**—मुख्य नदी **दान्यूब**, ही ह्या संस्थानांतून वहात जाऊन **काळ्या** समुद्रास मिळते. **प्रूथ** ही मोठी नदी हा देश आणि **रशिया** ह्यांचे मध्यहद्दीवरून येऊन **दान्यूब** नदीस मिळते.

ह्या संस्थानचे लोक प्राचीन काळचे **लातिन** लोकांचे वंशज आहों असें ह्मणतात. **बुकारेस्त** ही ह्या संस्थानची राजधानी आहे. शिवाय **यासी** आणि **गालत्स** हीं प्रसिद्ध शहरें आहेत.

## १५. सार्विया.

हें संस्थान पूर्वी **तुर्कस्तानचे सुलतानास** खंडणी देत होतें, परंतु आतां स्वतंत्र आहे. ह्याचें क्षेत्रफळ १९,०५० चौरसमैल व लोकसंख्या २५,००,००० आहे. हें **दान्यूब** नदीचे दक्षिणेस **बासन्या** आणि **बुलगारिया** ह्यांचे मध्यें आहे. हें एका राजाचे ताब्यांत आहे, व तेथील राज्यव्यवस्था **रुमानियां**तील राज्यव्यवस्थेप्रमाणें आहे.

**नद्या**—मुख्य नदी **दान्यूब**, ही ह्या देशाचे उत्तर हद्दीवरून वहात गेली आहे. **साव** ही मोठी नदी **आस्त्रियां**तून येऊन **दान्यूब** नदीस मिळते.

येथील लोक **स्लाव्होनियन** घराण्यांपैकीं आहेत. ह्या संस्थानची राजधानी **बेलग्राद**, हें तटबंदी शहर **दान्यूब** व **साव** ह्यांचे संगमावर आहे. मध्यभागीं **क्रागोजिवात्झ**, हें पूर्वी राजधानीचें शहर होतें.

## १६. मान्तेनेग्रो.*

हें संस्थान पूर्वी **तुर्कस्तानचे सुलतानास** खंडणी देत होतें, परंतु आतां स्वतंत्र आहे. ह्याचें क्षेत्रफळ ३,६३० चौरसमैल व लोकसंख्या

*काळापर्वत.

१,००,००० आहे. हें संस्थान आस्त्रिया व तुर्कस्तान ह्यांचे मध्यें आहे. ह्यांतील प्रदेश अगदीं डोंगराळ असून लोक फार काटक आहेत. हें एका राजाचे ताब्यांत आहे. ह्या संस्थानांत जेतिनी हें राजधानीचें शहर आहे. आद्रिआतिक समुद्रावर आंतिवारी हें प्रसिद्ध बंदर आहे.

## १७. तुर्कस्तान.

तुर्कस्तानाचे उत्तरेस रूमानिया, सार्वेया आणि आस्त्रिया व हंगरी, पश्चिमेस आस्त्रिया, मोन्तेनेग्रो, आद्रिआतिक समुद्र व भूमध्य समुद्र; दक्षिणेस ग्रोस; आणि पूर्वेस आर्किपेलागो, मारमेराचा समुद्र व काळा समुद्र हीं आहेत.

येथील बादशाहा मुसलमानी धर्माचा आहे. त्यास सुलतान ह्मणतात. ह्या देशांत बुलगारिया, ईस्त रुमोलिया, वगैरे ७ प्रांत आहेत. बुलगारिया व ईस्तरुमोलिया मिळून एक संस्थान आहे. तें तुर्कस्तानचे सुलतानास खंडणी मात्र देतें, बाकी सर्व प्रकारें स्वतंत्र आहे. ह्याचें क्षेत्रफळ ३८,२९० चौरसमैल व लोकसंख्या ३३,२८,००० आहे. बुलगारिया प्रांत उत्तरेस दान्यूब नदी व दक्षिणेस बाल्कन पर्वत ह्यांचे मध्यें आहे. व ईस्तरुमोलिया प्रांत बाल्कनपर्वताचे दक्षिणेस आहे. सोफिया ही ह्या संस्थानाची राजधानी आहे. फिलिपोपालिस ही ईस्त रुमानिया प्रांताची पूर्वींची राजधानी आहे. रसचक, सिलिस्त्रिया, निकोपाली आणि विदीन हीं दान्यूब नदीचे कांठीं मोठीं शहरें आहेत. काळ्या समुद्रावर वार्ना हें मुख्य बंदर आहे. तुर्कस्तानांतील बाकीचे प्रांतांचें क्षेत्रफळ ६१,२०० चौरसमैल व लोकसंख्या ४७,८६,००० आहे.

**शहरें**–ह्या देशाची राजधानी कान्स्तांतिनोपल ( स्तंबूल ) ही बास्परसच्या सामुद्रधुनीवर आहे. हें शहर इसवी सन ३३० वे वर्षी कान्स्तांतेन बादशाहानें स्थापिलें. अद्रियानोपल हें व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. सालोनिकी ह्याच नांवाच्या आखातावर मोठें बंदर आहे. गालिपोली हें दार्दनेल्सचे सामुद्रधुनीवर बंदर आहे.

**पर्वत**–बाल्कन पर्वत बुलगारिया आणि ईस्त रुमोलिया ह्यांचे मध्यें असून पूर्वपश्चिम गेला आहे. तुर्कस्तानचे पश्चिमेस व दक्षिणेस

एक मोठी पर्वतांची ओळ आहे त्यांत **मौंत ऑलिंपस** हें फार मोठें शिखर आहे.

**नद्या**–**दान्यूब** ही **बुलगारियाचे** उत्तर हद्दीवरून वहात जाऊन **रुमानिया** देशांत गेली आहे. **साव** ही **आस्त्रिया** आणि **तुर्कस्तान** ह्यांचे हद्दीवरून वहात जाऊन **सार्विया** देशांत गेली आहे.

**आखातें**–**सालोनिकी**चें आखात हें मुख्य आहे. शिवाय दुसरीं लहान लहान आखातें पुष्कळ आहेत.

**सामुद्रधुन्या**—**दार्दानेल्स** (अथवा हेलेस्पांत) ची सामुद्रधुनी **आर्किपेलागो** आणि **मारमोरा** ह्यांच्यामध्यें आहे.

**बेटें**—**क्रीत** (अथवा कान्दिया) व **लेमनास** हीं मुख्य आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—धान्य, लोंकर, फळें, गुलाबी अत्तर, रेशीम, लांकूड, मीठ, तंबाखू, कातडीं वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात. **स्तंबूल** एथील अत्तरासारखें अत्तर दुसरें कोठेंहि होत नाहीं अशी आख्या आहे.

राज्यकारभाराचे कामांत **बुलगारियन** लोक **बुलगारिया** व **ईस्त रुमीलिया** ह्या प्रांतांत व **तुर्क** लोक बाकी सर्व प्रांतांत प्रमुख आहेत. परंतु येथें **स्लावोनियन** आणि **ग्रीक** लोकांचा मोठा भरणा आहे.

ह्या देशांतील जमीन सुपीक आहे. जागजागीं धातूंच्या खाणी पुष्कळ आहेत. लोक गरीब असून त्यांचे आंगीं धाडसपणा मुळींच नाहीं. येथील राजाही तसाच अव्यवस्थित आहे.

## १८. ग्रीस.

**तुर्कस्तान**चे दक्षिणेस **ग्रीस** आहे. त्याचे पश्चिमेस व दक्षिणेस **भूमध्यसमुद्र** आणि पूर्वेस **आर्किपेलागो** हीं आहेत. **तुर्कस्तान** व **ग्रीस** मिळून एक द्वीपकल्प आहे.

ह्या देशाचे १ उत्तरेकडील भाग, २ **मोरियाचें** द्वीपकल्प व ३ लगत्याचीं बेटें असे तीन विभाग आहेत.

**शहरें**—मुख्य राजधानीचें शहर **आथेन्स** हें प्राचीन इतिहासांत

फार प्रसिद्ध आहे. **कारिंथ,** ह्याच नांवाचे संयोगीभूमीजवळ आहे. **नापल्या** हें बंदर आहे. **स्पार्ता, कार्फू** हींही मोठीं शहरें आहेत.

**आखातें—पात्रास** आणि **लेपांतो** (अथवा कारिंथ) हीं आखातें **ग्रीस**चा उत्तरभाग आणि **मोरिया** ह्यांच्यामध्यें आहेत. **इजीना**चें आखात, **मोरिया** आणि **आथेन्स** ह्यांच्यामध्यें आहे.

**भूशिरें—मोरिया**चें दक्षिण टोंक **मातापान,** हें प्रसिद्ध भूशिर आहे.

**संयोगीभूमि—कारिंथ**ची संयोगीभूमि **मोरिया** व **ग्रीस**चा उत्तरभाग ह्याच्यामध्यें आहे.

**बेटें—अयोनियन** बेटें **ग्रीस** व **तुर्कस्तान** ह्यांचे पश्चिमेस आहेत. **नेग्रोपांत** आणि **सैक्लेदीज** हीं बेटें **ग्रीस**च्या पूर्वेस आहेत.

**पर्वत—ग्रीस** हा अगदीं डोंगराळ देश आहे व त्यांत **मौंतपारनासस** हा फार उंच पर्वत आहे.

**व्यापाराचे जिन्नस—**येथून सुकलेलीं फळें, तेल आणि शिसें वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात.

**ग्रीक** लोक गरीब आहेत, पण दर्यावर्दीपणांत प्रवीण व व्यापारी असे आहेत. येथील राजा अव्यवस्थित आहे.

---

## भाग ४.

## आफ्रिका.

**आफ्रिका** हें मोठें द्वीपकल्प आहे, व तें **आशियाखंडास सुवेज**च्या संयोगीभूमीनें जोडलेलें आहे. ह्याचे उत्तरेस **भूमध्यसमुद्र,** पश्चिमेस **अत्लांतिक** महासागर आणि पूर्वेस **हिंदी** महासागर, **तांबडा** समुद्र, **सुवेज**चें आखात, **अरबस्तान** आणि **सिरिया** हीं आहेत. वर्णनाचे सोईकरितां ह्या खंडाचे **उत्तरआफ्रिका, पश्चिमआफ्रिका, दक्षिण आफ्रिका, पूर्वआफ्रिका, मध्यआफ्रिका,** आणि लगत्याचीं बेटें असे सहा भाग कल्पिले आहेत.

युरोपियन लोकांच्या वसाहती जेथें आहेत तेथें आणि **अबिसीनिया** देशांत ख्रिस्ती धर्म चालतो बाकी सर्व उत्तर **आफ्रिकेंतील** लोक मुसल-

मान आहेत. पश्चिम आणि मध्य आफ्रिका येथें काळे, जाड ओंठाचे व लोंकरी सारख्या केंसाचे शिद्दी लोक राहतात; पैकीं **सेनिगांबिया, सहारा** आणि **सौदन** ह्या देशांतील लोकांनीं **मुसलमानी** धर्म स्वीकारला आहे व ते सुधारण्याचे मार्गास लागले आहेत; बाकी देशांतील लोक अगदीं अडाणी आहेत, मनुष्याचें मांस खातात आणि वारंवार शेजाऱ्यांबरोबर युद्धप्रसंग करितात. **दक्षिण** आणि **पूर्व आफ्रिके**तील लोक शिद्दि लोकांपेक्षां सुधारलेले आहेत व किनाऱ्यावरील कांहीं शहरांत **मलायी** व **अरब** ह्या लोकांची वस्ती आहे.

**आफ्रिकाखंडा**च्या पश्चिम आणि पूर्व किनाऱ्यांवरील गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितां **युरोपियन** लोकांनीं जागजागीं जीं ठाणीं बसविलीं होतीं तीं कालगतीनें प्रबल होऊन तेथें त्या लोकांनीं आपलीं स्वतंत्र राज्यें स्थापन करण्याचा क्रम चालू केला आहे. तसेंच **लिविंग्स्तन** आणि **स्तान्ली** यांणीं **झांबिजी** आणि **कोंगो** ह्या नद्यांचा शोध लावला, **क्यामेरान** याणें पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रवास केला, **मंगोपार्क** आणि **लॉंडेर** यांणीं **नैजर** नदीचा शोध लाविला आणि **स्पीक, बर्तन** आणि **बेकर** ह्यांनीं मोठ्या सरोवरांचा शोध लावला. ह्या सर्व कारणांमुळें **आफ्रिकाखंडांत** हल्लीं मोठी घडामोड चालू आहे व या पुढें या खंडांत विद्या आणि कलाकौशल्य यांचें पाऊल पुढें पडण्याचा संभव आहे.

## १. उत्तर आफ्रिका.

ह्या भागांत **ईजिप्त, अबिसीनिया,** आणि **बार्बरी** संस्थानें, असे तीन देश आहेत.

### १ ईजिप्त.

हा देश **आफ्रिकाखंडा**च्या ईशान्य कोनास आहे. ह्याचे उत्तरेस **भूमध्यसमुद्र,** पश्चिमेस **त्रिपोली** व **लिबियाचें** मैदान ( **सहाराचा** पूर्वभाग) आणि पूर्वेस **तांबडा** समुद्र व **सुवेज**ची संयोगीभूमि हीं आहेत.

ह्या देशांत खुद्द **ईजिप्त, न्यूबिया, कार्दोफान** व त्याचे दक्षिणेस **नैल** नदीचे कांठावरील **गोंदोकोरो**पर्यंतचा प्रदेश, हे येतात. ह्या शेवटच्या प्रदेशाची माहिती अजून चांगलीशी झाली नाहीं.

खुद **ईजिप्त** देशांत **नैल** नदीचे कांठचा लांबट व चिंचोळा प्रदेश व त्याचे दोहों बाजूंकडील वाळूचीं मैदानें हीं आहेत. ह्या मैदानांतही ठिकठिकाणीं सुपीक जागा आहेत. **ईजिप्तां**त ***खालचा ईजिप्त, मधला ईजिप्त** आणि **वरचा ईजिप्त** असे तीन प्रांत आहेत. वरच्या **ईजिप्ता**चे दक्षिणेस **न्यूबिया, कार्दोफान** आणि **दारफर** हे प्रांत आहेत.

**शहरें**—**ईजिप्ता**ची राजधानी **कायरो नैल** नदीचे कांठीं आहे. ह्या शहराचे वायव्येस किनाऱ्यावर **आलेक्जांद्रिया** नांवाचें बंदर आहे. हें शहर थोरला **शिकंदर** बादशाहा ह्यानें वसविलें. **सुवेज**च्या कालव्याचे उत्तरद्वाराजवळ **पोर्तसाईद** व दक्षिणद्वाराजवळ **सुवेज** हीं ठिकाणें प्रसिद्ध आहेत. **स्वाकिन** हें तांबड्या समुद्रावर प्रसिद्ध बंदर आहे. **न्यूबिया** प्रांतांत मुख्य शहर **खार्तुम** हें **नैल** आणि **ब्लुनैल** ह्यांचे संगमाजवळ आहे. **डोंगाला, बरबर, कसाला** आणि **सेनार** हीं हीं बरींच मोठीं शहरें आहेत. **कोबी दारफर** प्रांतांत आहे. **यूरोपां**तील देश आणि **हिंदुस्थान** व **चीन** वगैरे **आशियां**तील देश ह्यांमधील व्यापाराचे संबंधानें **ईजिप्त** ही मोठी रहदारीची जागा आहे. मोठमोठीं तारवें व आगबोटी **भूमध्यसमुद्रां**तून सुवेजच्या कालव्यामधून **तांबड्या** समुद्रांत जातात; अथवा व्यापारी लोक **आलेक्जांद्रिआ** येथें माल उतरून घेऊन आगगाडींतून **कायरो** आणि **सुवेज** येथें पाठवितात.

ह्या देशांत **नैल** ही मुख्य नदी आहे. ही नदी पृथ्वीमध्यें इतर सर्व नद्यांहून लांब आहे. ही **विक्तोरिया न्यांजा** व **आलबर्त न्यांजा** ह्या मोठ्या सरोवरांपासून निघून उत्तरेकडे जाते. फार लांबपर्यंत गेल्यावर तिला **ब्लुनैल** व **अतबारा** ह्या मोठ्या नद्या **अबिसीनिया** देशांतून येऊन **न्यूबिया** प्रांतांत मिळतात. नंतर ती दोन मुखांनीं **रोसेता** व **दामियेता** शहरांजवळ **भूमध्यसमुद्रा**स मिळते. ह्या दोन मुखांमधला प्रदेश सुपीक आहे. खुद **ईजिप्त** फार सुपीक आहे. त्यांत पाऊस फारसा पडत नाहीं; परंतु **नैल** नदीचे उगमाजवळचे प्रदेशांत पाऊस फार पडतो, तेणेंकरून त्या नदीस प्रतिवर्षी मोठे पूर येतात व पाणी दुतर्फा लांबवर पसरतें,

*खालचा ईजिप्त हा नोहाचा नातू मिसर ह्यानें वसविला ह्मणून ह्या देशाला मिसर देश हें नांव चालतें.

म्हणून कांठचे प्रदेशांत फार चांगलें पीक येतें. न्यूबिया व कार्दो-फान हे प्रांत ईजिप्तासारखे सुपीक नाहींत, व त्यांत मोठमोठीं वाळवंटें आहेत. दारफर प्रांत सुपीक आहे.

हा देश फार प्राचीन कालापासून विद्याचारसंपन्न देशांपैकीं आहे. ह्यांत बहुत राज्यांच्या घडामोडी होऊन आतां तो एका राजाचे ताब्यांत आला आहे. त्यास खेदिव् एल मिसर म्हणतात. तो बाह्यात्कारी कान्स्तांतिनोपल येथील सुलतानाचा मांडलिक म्हणवितो, तरी स्व-तंत्रपणें वागतो. खुद्द ईजिप्त, न्यूबिया आणि दारफर येथील बहुतेक लोक व खेदिव् हे मुसलमान असून अरबी भाषा बोलतात. परंतु खुद्द ईजिप्त देशांत कांहीं ख्रिस्ती लोक आहेत. ते मूळचे रहिवाशांचे वंशज आहेत असें म्हणतात. ह्या देशांतील मुसलमान हे अरब लोक आणि मूळचे रहिवासी ह्यांचे वंशज* आहेत. न्यूबियाचे दक्षिणेकडील प्रदेशांत व कार्दोफान प्रांतांत शिद्दी लोक राहतात. तेथून पुष्कळ शिद्दी लोकांस न्यूबियाचे उत्तरभागांत व खुद्द ईजिप्तांत गुलाम करून नेले आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—येथून मुख्यत्वें धान्य, साखर, तंबाखू व कापूस, हे जिन्नस परमुलखास जातात; व मध्य आफ्रिकेंतून कारवान लोक हस्तिदंत, सोन्याची माती, चामडीं, शहामृगांचीं पिसें वगैरे जिन्नस ह्या देशांत आणितात.

## २. आबिसीनिया.

अबिसीनिया ऊर्फ हबस हा डोंगराळ देश ईजिप्तचे आग्नेयीस आहे. ह्याचे दक्षिणेस सोमाली लोकांचा देश आहे व पूर्वेस इतालियन लोकांचा इरिथ्रिया देश आहे.

**शहरें**—ह्या देशाचे तीग्रे, अम्हारा, आणि शोआ असे तीन मुख्य विभाग आहेत व त्यांत गोंदार, अडोवा आणि अंकोबार हीं मुख्य शहरें आहेत. अडोवा हें शहर व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. येथील राजास नेगस असें म्हणतात व आदिस-आबाबा हें हल्लीं राज-धानीचें शहर आहे. तांबड्या समुद्राचे किनाऱ्यावर मसुवा म्हणून जें

---

*न्यूबियांतील मूळचे रहिवासी ईजिप्तांतील मूळचे रहिवाशांसारखेच होते व त्यांस इथिओपियन्स असें म्हणत असत.

बंदर आहे त्या बंदरांतून येथील माल परमुलखास रवाना होतो. **मागदाला** हा प्रसिद्ध डोंगरी किल्ला आहे, तो **इंग्लिशांनीं** सन १८६८त जिंकून घेतला.

**नद्या**—**ब्ल्युनैल** आणि **अतबारा** ह्या नद्या **अबिसीनियाचे** पर्वतांत उगम पावून उत्तरेकडे वाहात जाऊन **नैलनदीस** मिळतात.

ह्या देशांत पाण्याची समृद्धि असून जमीन सुपीक आहे व जंगलही पुष्कळ आहे. धान्य, बुंद, कापूस वगैरे जिन्नस पुष्कळ पिकतात. येथील लोक **न्युबियाचे** मूळचे रहिवाशी, **अरब, ईस्राइल, शिद्दी** वगैरे लोकांचे वंशज आहेत. ते मुख्यत्वें करून **अम्हारी** भाषा बोलतात. ते आपल्यास ख्रिस्ती म्हणवितात. परंतु त्यांचा आचार विचार भ्रष्ट आहे. कातडीं, हस्तिदंत आणि डीक हे जिन्नस परमुलखास रवाना होतात.

### ३. बार्बरी संस्थानें.

हीं संस्थानें **भूमध्य** समुद्राच्या दक्षिण किनाऱ्याचे लगत्यास असून त्यांचे पूर्वेस **ईजिप्त** व पश्चिमेस **अत्लांतिक** महासागर आहे.

हीं संस्थानें चार आहेत; १ **त्रिपोली**, २ **तूनिस**, ३ **अलजीरिया** व ४ **मोरोको**.

**त्रिपोली**—ह्या संस्थानांत **त्रिपोली** व **बार्का** हे प्रांत आणि वाळवंटांतील **फेजान**चा सुपीक प्रदेश हे आहेत. येथील अधिकाऱ्यास **बे** म्हणतात. तो **तुर्कस्थानचे सुलताना**चा मांडलिक म्हणवितो. ह्या संस्थानाची राजधानी **त्रिपोली** शहर आहे.

**तूनिस**—येथील अधिकाऱ्यास **बे** ह्मणतात. तो **फ्रान्स**चे ताब्यांत आहे. ह्या संस्थानची राजधानी **तूनिस**, हें शहर मोठें असून व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. ह्या शहराजवळ **कार्थेज** ह्मणून एक पडकें शहर आहे.

**अलजीरिया**—हें **फ्रेंच** लोकांचे ताब्यांत आहे. ह्याची राजधानी **अलजिर्स** शहर आहे. **कान्स्तंतैन** हें दुसरें मोठें शहर ह्या संस्थानांत आहे.

**मोरोको**—येथील अधिकाऱ्यास **सुलतान** ह्मणतात. त्याची राजधानी **मोरोको** शहर आहे. **फेज** हें शहर **मोरोको** लेदर ( कमाव-

लेलें कातडें ) च्या कारखान्याकरितां प्रसिद्ध आहे. **मोगादोर** हें मुख्य बंदर आहे. **तांजिर** आणि **तेतुआन** हीं बंदरें **जिब्रालतर**चे सामुद्रधुनीवर आहेत. **जिब्रालतर**चे समोर **क्यूता** ह्मणून एक मजबूत डोंगरी किल्ला आहे. ज्या उंच ठिकाणास प्राचीनकाळीं '**पिलर्स आफ हरक्यूलीस**' ह्मणत असत त्यांपैकीं **क्यूता** हें एक आहे. हा किल्ला व **तेतुआन** बंदर **स्पेनच्या** ताब्यांत आहेत.

**बार्बेरी** संस्थानांचे भाग दक्षिणेकडून मोठ्या मैदानांत गेले आहेत; परंतु पश्चिमेस हीं संस्थानें व मोठें मैदान ह्यांचे मध्यें **अत्लस** पर्वतांची ओळ असून ती पूर्वेकडे गेली आहे. **अत्लस** पर्वतांचे उत्तरेकडील सखल जमिनींत धान्य पुष्कळ पिकतें; व पर्वताचे उतरणींवर खजुराचीं व दुसरीं फळझाडें फार होतात. डोंगरांत धातूंच्या खाणी पुष्कळ आहेत. ह्या संस्थानांतील लोक **अरब**जातीचे आहेत.

**आखातें—सीद्रा** आणि **केब्स** हीं आखातें किनाऱ्यावर आहेत.

**भूशिरें—केपबोन** आणि **केपस्पार्तेल** हीं प्रसिद्ध आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—ह्या संस्थानांतून घोडे, फळें, धान्य, तंबाखू, कमाविलेलीं कातडीं, मीठ, तांबें, रुपें वगैरे जिन्नस परमुलखास रवाना होतात.

## २. पश्चिम आफ्रिका.

**बार्बेरी** संस्थानांचे दक्षिणेस **सहारा**चें मोठें मैदान आहे व त्या मैदानाचे दक्षिणेस पश्चिम किनाऱ्याचे लगत्यास **सेनिगाल** आणि **आरेंज** ह्या नद्यांचे मध्यें **सेनिगांबिया, वरचा गिनी, खालचा गिनी (पोर्तुगीज पश्चिम आफ्रिका)** आणि **हातेंतात** लोकांचा देश **(जर्मन पश्चिम आफ्रिका)** असे चार देश आहेत.

### १. सेनिगांबिया.

वर सांगितलेल्या चार देशांपैकीं **सेनिगांबिया** हा अगदीं उत्तरेकडचा देश आहे. त्याचे पूर्वेस **सिद्धि** लोकांचा **सौदन** देश आहे.

**भूशिरें—केपवर्द** आणि **केपब्लांको** हीं **आफ्रिके**च्या पश्चिम भागास आहेत.

**नद्या**—**सेनिगाल** आणि **गांबिया** ह्या दोन नद्या येथें मुख्य आहेत ह्मणून ह्या देशास **सेनिगांबिया** हें नांव पडलें आहे. तिसरी नदी **रियोग्रांद** ही आहे. ह्या तिन्ही नद्या **सेनिगांबिया** आणि **सौदन** ह्या देशांमधील पर्वतांत उगम पावतात.

**सेनिगांबिया** देशांत तद्देशीय लोकांचीं पुष्कळ संस्थानें आहेत पण तीं सर्व **फ्रेंच** लोकांचे आश्रयानें असतात. तेथें **मुसलमानी** धर्म चालतो व तेथील लोक **सिद्धी**लोकांपेक्षां कांहीं सुधारलेले आहेत. **सेनिगाल** नदीचे कांठावर एक **फ्रेंच** लोकांचें संस्थान आहे, त्याची राजधानी **सेंतलुई**; **गांबिया** नदीचे कांठावर एक **इंग्लिश** लोकांचें संस्थान आहे, त्याची राजधानी **बाथर्स्त**; **रियोग्रांद** नदीचे कांठावर एक **पोर्तुगीज** लोकांचें संस्थान आहे, त्याची राजधानी **बिसाओ**; आणि अगदीं दक्षिणेस **सिआरालिओन** ह्मणून **इंग्लिश** लोकांचें दुसरें संस्थान आहे, त्याची राजधानी **फ्रीतौन** आहे. **फ्रीतौन** हें चांगलें बंदर आहे. ह्या संस्थानांत **इंग्लिश** लोकांनीं सोडलेले गुलाम लोक राहतात व गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितांच त्यांनीं येथें वसाहत केली आहे.

## २. वरचा गिनी.

हा देश **सिआरालिओन**पासून **कांगो** नदीचे मुखापर्यंत आहे. ह्याचे उत्तरेस **कोंग** पर्वत असून पलीकडे **सौदन**देश आहे; पश्चिमेस व दक्षिणेस **गिनी**चें आखात आहे आणि पूर्वेस **कांगो फ्रीस्तेत** आहे.

**नद्या**—**नैजर** ऊर्फ **जोलिबा** ही **सौदन** देशांतून येऊन दोन मुखांनीं **गिनी**चे आखातास मिळते. **कांगो** ही **कांगो फ्रीस्तेत** ह्या देशांतून येऊन ह्या देशाचे दक्षिण हद्दीवरून वहात जाऊन **अत्लान्तिक** महासागरास मिळते.

**अखातें व उपसागर**—**गिनी**चें आखात व **बैत** आफ् **बेनिन** आणि **बैत** आफ् **बियाफ्रा** हे उपसागर दक्षिणेकडेस आहेत.

ह्या देशाचे किनाऱ्याजवळचा **नैजर** नदीचे मुखांमधला प्रदेश दलदलीचा आहे. ह्या नदीचे आग्नेयीस **कामेरुन** पर्वतापर्यंतचा प्रदेश डोंगराळ आहे; बाकी किनाऱ्याजवळचा सर्व प्रदेश सुपीक आहे. ह्या

देशाचे किनाऱ्यावर ठिकठिकाणीं जे व्यापार चालत आले त्यांवरून त्यास निरनिराळीं नांवें पडलीं आहेत. तीं अशीं:- १ **ग्रेनकोस्त** ( धान्याचा किनारा). २ **ऐवरी कोस्त** ( हस्तिदंताचा किनारा ), ३ **गोल्द्कोस्त** (सोन्याचा किनारा) आणि ४ **स्लेवकोस्त** ( गुलामाचा किनारा).

ह्या देशांतील बहुतेक प्रदेश **यूरोपियन** राष्ट्रांचे ताब्यांत गेला आहे. तद्देशीय संस्थानांपैकीं **लैबीरियाचें** संस्थान फार प्रसिद्ध आहे. त्याची राजधानी **मनरोविया** आहे. गुलामांस आश्रय देण्याकरितां कांहीं **अमेरिकन** लोकांनीं हें संस्थान सन १८२० त स्थापिलें. हल्लीं तें **सिद्धि** लोकांचे ताब्यांत असून प्रजासत्तात्मक आहे. **सिद्धि** लोकांच्या इतर संस्थानांपैकीं **अशांती** व **दाहोमी** हीं प्रसिद्ध आहेत. **अशांती** संस्थान **गोल्द् कोस्तच्या** उत्तरेस असून तें इंग्लिशांचे ताब्यांत आहे व त्यांत **कुमासी** हें मुख्य शहर आहे. **दाहोमी** हें **तोगोलॉन्द्**च्या पूर्वेस असून **फ्रेंच्यांचे** ताब्यांत आहे व त्यांत **आन्बोमी** हें मुख्य शहर आहे.

**इंग्लिशांचीं संस्थानें.** ( १ ) सोन्याचे किनाऱ्यावरचें संस्थान, राजधानी **केपकोस्त क्यासल**. **आक्रा** आणि **एलमीना** हीं दुसरीं मोठीं ठाणीं आहेत. (२) गुलामाचे किनाऱ्यावरचें **लेगास**चें संस्थान. **लेगास** हें पश्चिम किनाऱ्यावर चांगलें बंदर आहे. ( ३ ) **नैजर** नदीचे कांठचा **रायल नैजर कंपनी**चे ताब्यांतला मुलूख. राजधानी **आसाबा नैजर** नदीचे [illegible] आहे. ह्या कंपनीनें **मध्यसौदन** देशांतील **सोकोतोचें** विस्तीर्ण राज्य व त्याचे ताब्यांतील संस्थानें ह्यांशीं ठराव करून त्यांचे राज्यांची व्यवस्था आपलेकडे घेतली आहे.

**जर्मन लोकांचीं संस्थानें**-सोन्याचे किनाऱ्याचे पूर्वेस **तोगोलॉन्द्** आणि **नैजर** कंपनीचे मुलुखाचे पूर्वेस **क्यामरून**चें संस्थान हीं आहेत.

**फ्रेंच**लोकांचें **कोंगो** संस्थान **क्यामरुन** संस्थानचे दक्षिणेस आहे.

### ३. खालचा गिनी (पोर्तुगीज पश्चिम आफ्रिका.)

हा देश **कांगो** आणि **कुनेनी** ह्या दोन नद्यांचे मध्यें आहे. ह्याचे पूर्वेस **कांगो फ्रीस्तेत** आणि **ब्रितिश सौथ आफ्रिका** हे देश आहेत. कामाचे सोईकरितां ह्या देशाचे **लोएन्दा, अंब्रिज, बेंग्वेला आणि**

**मोसामिदीज** असे चार विभाग करून ते निरनिराळ्या अधिकाऱ्यांचे ताब्यांत दिले आहेत. **सेंतपाल दि लोपन्दा** ही ह्या देशाची राजधानी आहे.

**८. हातेंतात लोकांचा देश (जर्मन पश्चिम आफ्रिका).**

**कुनेनी** आणि **आरेंज** नद्यांमधला प्रदेश ह्यांत आहे. ह्याचे पूर्वेस **ब्रितिश सौथ आफ्रिका** आहे. केप **फ्रियो**चे उत्तरेकडील भागास **दमारालॉन्द** आणि दक्षिणेकडील भागास **नामाक्वालॉन्द** असें ह्मणतात. ह्या देशाचे किनाऱ्याजवळची जमीन सुपीक नाहीं पण आंतील भागाची सुपीक आहे. ह्यांत **एंग्रापेक्वेना** हें मुख्य बंदर आहे. ह्या देशांत तांब्याच्या खाणी पुष्कळ आहेत.

**३. दक्षिण आफ्रिका.**

**आरेंज फ्रीस्तेत** आणि **त्रान्सवाल रिपब्लिक** ह्या दोन संस्थानांशिवाय **दक्षिण आफ्रिकें**तील सर्व देश हल्लीं **इंग्रज** सरकारचे ताब्यांत आहेत व त्या सर्वांना **ब्रितिश सौथ आफ्रिका** हें नांव दिलें आहे.

१. **आरेंज फ्रीस्तेत**.—हें प्रजासत्ताक संस्थान **केप कालनी**चे उत्तरेस असून त्यांत **डच** लोकांचे वंशज मुख्य अधिकारी आहेत. **ब्लूमफोन्तीन** ही त्याची राजधानी आहे व तेथून **केप कालनी**पर्यंत आगगाडीचा रस्ता केला आहे. **हारिस्मिथ** हें दुसरें शहर पूर्वेकडेस आहे व तेथून **नाताल**पर्यंत आगगाडीचा रस्ता केला आहे. लोकर, कातडीं, शहामृगाचीं पिसें, सोनें व हिरे हे व्यापाराचे जिन्नस आहेत.

२. **त्रान्सवाल रिपब्लिक**.—हें संस्थान उत्तरेस **लिंपोपो** आणि दक्षिणेस **वाल** ह्या दोन नद्यांचे मध्यें आहे व येथें **डच** लोकांचे वंशज मुख्य अधिकारी आहेत. **प्रितोरिया** हें राजधानीचें शहर आहे, पण **जोहानिसबर्ग** हें ह्या देशांत सर्वांत मोठें शहर आहे. **प्रितोरिया**पासून पूर्व किनाऱ्यावर **लोरेंझो मार्क्विस**पर्यंत व दक्षिणेस **ब्लूमफोन्तीन**पर्यंत आगगाडीचे रस्ते केले आहेत. लोकर, कातडीं, सोनें, हस्तिदंत, शहामृगाचीं पिसें व धान्य हे व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत.

३. **ब्रितिश सौथ आफ्रिका**.—हा विस्तीर्ण प्रदेश दक्षिणेस **केप आफ गुड होप** आणि उत्तरेस **कांगो फ्रीस्तेत** ह्यांच्या मध्यें आहे व ह्यांत देश आहेत ते:

| देशाचें नांव. | राजधानी. |
| --- | --- |
| ( १ ) **केप कालनी व काफ्रारिया** ... | **केपतौन व वतरवर्थ.** |
| ( २ ) **नाताल व झुलुलॉन्द** ... | **पीतर्मारित्सबर्ग.** |
| ( ३ ) **बसुतोलॉन्द** ... ... | **मासेरू.** |
| ( ४ ) **बेश्वनालॉन्द** ... ... | **रायबर्ग.** |
| ( ५ ) **बेश्वाना प्रोतेक्तरेत.** ... | **पालापी.** |
| ( ६ ) **ब्रितिश सौथ आफ्रिका** कंपनीचे ताब्यांतला मुलूख.... | **किल्ला साल्सबरी.** |

**केप कालनी** आणि **नाताल** येथें **इंग्लिश** लोकांच्या वसाहती असून ते देश **इंग्लंद**च्या **महाराणी**नें नेमलेल्या **गवरनरां**च्या ताब्यांत आहेत. ह्या दोन्ही देशांत **पार्लमेंत**च्या सभा असून त्यांच्या सल्ल्यानें राज्यव्यवस्था होते. **काफ्रारिया** प्रांत **केप कालनी**चे पूर्वेस असून तेथील **गवरनर**च्या ताब्यांत आहे. **जुलूलॉन्द नाताला**चे उत्तरेस असून तेथील **गवरनर**चे ताब्यांत आहे.

**केप कालनी** येथील **गवरनरला ब्रितिश सौथ आफ्रिकेचे हाय कमिशनर** असेंही ह्मणतात व तो बाकीचे प्रांताची व्यवस्था ठेवितो. **बसुतोलॉन्द** हा प्रांत **नाताल** आणि **आरेंज रिवर फ्रीस्तेत** ह्यांचे मध्यें असून तो एका **कमिशनरा**चे ताब्यांत आहे.

**आरेंज** आणि **झांबिजी** ह्या नद्यांचे मध्यें **बेश्वाना** लोकांचा देश आहे. ह्याचा दक्षिणेकडील भाग ह्मणजे **आरेंज** आणि **मोलोपो** ह्या नद्यांमधील प्रदेश **ब्रितिश** सरकारानें खालसा करून आपले राज्यांत सामील केला आहे, त्याला **बेश्वानालॉन्द** असें ह्मणतात. मधला भाग म्हणजे **मोलोपो** नदी आणि **त्रान्सवाल**चे उत्तर हद्दीपासून थेट पश्चिमेकडे जाणारी रेषा ह्यांच्या मधील प्रदेश एका तद्देशीय राजाचे ताब्यांत आहे, त्यास **खामा** असें म्हणतात. हा राजा **इंग्रज** सरकारचे आश्रयानें असतो व त्याणें आपले राज्यांत पुष्कळ सुधारणुका केल्या आहेत. **पालापी** येथें एक **असिस्तंत कमिशनर** रहातो. उत्तरेकडील भागांत तद्देशीय संस्थानें आहेत. त्यांवर **ब्रितिश सौथ आफ्रिका** कंपनीचे अधिकारी देखरेख ठेवतात.

**ब्रिटिश सौथ आफ्रिका** कंपनीचे मुलखांतून **झांबिजी** नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वहात जाते. तेणेंकरून त्याचे दोन भाग होतात. दक्षिणेकडील भागांत **मातावेली** आणि **मेशोना** लोकांचे देश आहेत. ह्या देशांत पाणी विपुल असून जमीन सुपीक आहे व त्यांत सोन्याच्या खाणी पुष्कळ आहेत. **मातावेली लोक** शेजारचे मुलखांत हल्ले करीत असत म्हणून सन १८९३ त **कंपनीनें** त्यांवर स्वारी करून त्यांचा मोड केला व त्यांची राजधानी **बुलुवायो** हस्तगत करून घेतली. **बुलुवायो** पासून **प्रितोरिया** पर्यंत आगगाडीचा रस्ता केला आहे. **केपटाऊन** पासून **बुलुवायो** पर्यंत अंतर १४०० मैल आहे. **मेशोना** देशांत किल्ला **सालसबरी** येथें कंपनीचें ठाणें आहे. येथून पूर्वकिनाऱ्यावर **बेरा** बंदरापर्यंत आगगाडीचा रस्ता करण्याचें काम चालू आहे.

राजधानीचे शहरांशिवाय **केपकालनी**मध्यें **सायमन्स तौन, ग्रेहाम्स तौन** आणि **पोर्त इलिझाबेथ, नातालांत दरबान** (**पोर्त नाताल,**) आणि **बेश्वाना** देशांत **शोहाग** आणि **किंबर्ली** हीं प्रसिद्ध शहरें आहेत.

**भूशिरें**–**केप आफ गुदहोप** आणि **केप आग्लास** हीं प्रसिद्ध आहेत. **केप आफ गुद होप** हें इ. स. १४९३ ह्या वर्षी **बार्थोलोम्यू दिआस** ह्या नांवाचे पुरुषानें शोधून काढिलें.

**उपसागर**– **तेबल बे, आलगोआ बे** आणि **देलागोआ बे** हे मुख्य आहेत.

**नद्या**–**झांबिजी** ही **दिलोले** सरोवरांतून निघून दक्षिणेकडे वहात जाते. नंतर **चोबी** नदीचा संगम झाल्यावर ती पूर्ववाहिनी होऊन **हिंदी-महासागरास** मिळते. समुद्रास मिळण्यापूर्वी तिला **शायर** नदी **नायसा** सरोवरांतून येऊन मिळते. **लिंपोपो** ही **ट्रान्सवाल**च्या उत्तर हद्दीवरून पूर्वेकडे वर्तुळाकार मार्गानें वहात जाऊन **हिंदीमहासागरास** मिळते. **आरेंज** ही **वसुतोलॉन्द** मध्यें उगम पावून **केपकालनीचे** उत्तर हद्दीवरून पश्चिमेकडे वहात जाऊन **अतलांतिक महासागरास** मिळते. हिला **वाल** आणि **मोलोपो** ह्या नद्या मिळतात.

**व्यापाराचे जिन्नस.** लोंकर, कातडीं, शहामृगाचीं पिसें, मद्य, साखर, हस्तिदंत व हिरे हे आहेत.

## ४. पूर्व आफ्रिका.

हा भाग दक्षिणेस **त्रान्सवाल रिपब्लिक** आणि **झुलुलॅान्द** आणि उत्तरेस **तांबड्या समुद्रा**वरील **स्वाकिन** बंदर ह्यांच्या मध्यें आहे. ह्या भागांत **सोफाला, मोझांबिक, झांजिबार, सोमाली लान्द** आणि **गाला लान्द** असे पांच देश होते. परंतु त्यांतील बहुतेक मुलूख हल्लीं **यूरोपियन** लोकांचे ताब्यांत गेल्यामुळें ह्या भागांत पुढें लिहिल्याप्रमाणें देश आहेत.

**१ पोर्तुगीज पूर्व आफ्रिका.** **३ ब्रितिश पूर्व आफ्रिका.**
**२ जर्मन पूर्व आफ्रिका.** **४ इतालीयन पूर्व आफ्रिका (इरिथ्रिया).**

**१. पोर्तुगीज पूर्व आफ्रिका**—ह्या देशांत **लोरेंझोमार्किस** आणि **मोझांबिक** असे दोन प्रांत असून त्यांचे मध्यें **झांबिजी** नदी आहे. हा देश दक्षिणेस **देलागोआ** उपसागराचा दक्षिण भाग आणि उत्तरेस **रोवूमा** नदी ह्यांचे मध्यें आहे. पश्चिमेस **त्रान्सवाल रिपब्लिक, ब्रितिश सौथ आफ्रिका, ब्रितिश सेंत्रल आफ्रिका** आणि **नाएसा** सरोवर हीं आहेत.

**शहरें**—मुख्य शहर **लोरेंझो मार्किस** हें **डेलागोआ** उपसागरावर असून उत्तम बंदर आहे. येथून **त्रान्सवाल** देशांत जाण्याकरितां आगगाडीचा रस्ता केला आहे. **सोफाला** ही पूर्वीची राजधानी. सोफालाचे उत्तरेस **बेरा** हें चांगलें बंदर आहे. येथून **मेशोना** देशांत जाण्याकरितां आगगाडीचा रस्ता करण्याचें काम सुरू आहे. **मोझांबिक** प्रांतांत **मोझांबिक** हें मोठें शहर आहे. **चिंद, किलिमेन, सेना** आणि **तेती** हीं बंदरें **झांबिजी** नदीचे कांठीं आहेत.

ह्या देशांत, कापूस तंबाखू, नीळ, बुंद, सागू, धान्य आणि सर्व प्रकारचीं फळें ह्यांचें चांगलें पीक होतें.

**२. जर्मन पूर्व आफ्रिका.**—हा देश **रोवूमा** नदीपासून **पेंबा**बेटाच्या लगत्यापर्यंत गेला आहे. त्याचे उत्तरेस **किलिमानझारो** पर्वत व **विक्तोरिया न्यॉंझा** सरोवर व पश्चिमेस **कांगो फ्रीस्तेत** आणि **तांगानिका** सरोवर हीं आहेत. हा देश पूर्वी **झांझिबार**चे **सुलतान**चे ताब्यांत होता.

ह्यांत **बागामोयो, दार-एस-सलाम** आणि **किल्वा** हीं मुख्य बंदरें आहेत. ह्या देशांतून हस्तिदंत, रबर आणि कोपालडीक हे बाहेर देशास रवाना होतात.

३. **ब्रिटिश पूर्व आफ्रिका.**—हा देश **जर्मन पूर्व आफ्रिका** आणि **जूबा** नदी ह्यांचे मध्यें आहे. ह्याचे पश्चिमेस **कांगो फ्रीस्तेत** आणि वरच्या **नैल**चा पश्चिमेकडील **पानोथा** हीं आहेत. ह्या मध्यें **उगांदा, उसोगा, उनिआरो** वगैरे प्रांत असून त्यांची व्यवस्था **इंपीरियल ईस्त आफ्रिका कंपनी**कडे सोंपवली आहे. **मोंबासा, लामू, उंबा** आणि **किस्मायु** हीं मुख्य बंदरें आहेत. **मोंबासा** ही या देशाची राजधानी आहे व येथून **वि-क्तोरिया न्यांझा** सरोवरापर्यंत आगगाडीचा रस्ता करण्याचें काम सुरू आहे. **आदन**चे आखाताचे दक्षिणेस **सोमाली** लोकांचें लहानसें संस्थान आहे तें **ब्रिटिश** सरकारचे आश्रयाखालीं आहे. त्यांत **बरबेरा** आणि **झीला** हीं मुख्य बंदरें आहेत. ह्या देशांतून नीळ, हस्तिदंत, रबर आणि डीक हीं परमुलखास रवाना होतात.

४. **इतालियन पूर्व आफ्रिका. तांबड्या** समुद्रावरील **इतालियन** लोकांचीं ठाणीं एकत्र करून त्याला **इरिथ्रिया** हें नांव सन १८९२ त दिलें. ह्यांत **झाबदीरात** आणि **पासो** हे दोन प्रांत आहेत. हा देश **जूबा**नदीपासून **तांबड्या** समुद्रावरच्या **मसूवा** बंदराच्या उत्तर हद्दीपर्यंत आहे. ह्यांत **मसूवा** आणि **आसाब** हीं चांगलीं बंदरें आहेत. ह्या देशांतील लोक मुख्यत्वें मेंढ्या बाळगून निर्वाह करितात.

**पर्वत**—उत्तरेस **केप गार्दफ्वी** पासून दक्षिणेस **केप आफ् गुदहोप** पर्यंत एक पर्वतांची ओळ पूर्व किनाऱ्याशीं समांतर आहे. तींत **झांजि-बार** आणि **विक्तोरिया न्यांझा** सरोवर ह्यांच्यामध्यें **किलिमान्-झारो** हा फार उंच पर्वत आहे.

**भूशिरें**—केप **गार्दाफ्वी आफ्रिके**चा पूर्व बिंदु आहे.

**नद्या**—मुख्य नदी **झांबिजी** ही **मोझांबिक**चे खाडीस मिळते. **रोवूमा, ताना** आणि **जूबा** ह्या दुसऱ्या नद्या आहेत.

**सरोवरें**—**विक्तोरिया न्यांझा** हें सरोवर सर्वांत मोठें आहे आणि ह्यापासून **नैल** नदी निघाली आहे असा शोध इ० स० १८५७ त

कपतान स्पीक साहेब ह्यानें लाविला. **रुडाल्फ** हें सरोवर **ब्रिटिश पूर्व आफ्रिके**मध्यें आहे.

**बेटें**—पूर्व किनाऱ्याचे लगत्यास बेटें आहेत तीं:—

**झांजिबार**--( राजधानी **झांजिबार** ) आणि **पेंबा** हीं एका **अरब** राजाचे ताब्यांत आहेत.त्यास **सुलतान** असें ह्मणतात. **सुलतान ब्रिटिश**सरकारचे आश्रयानें रहातो. **कोमोरू** बेटें हीं एका तद्देशीय राजाचे ताब्यांत आहेत. **मादागास्कर** ( राजधानी **ताननारिवो** आणि **बुर्बो** हीं **फ्रेंच** लोकांचे ताब्यांत आहेत. **मारीशस** (राजधानी, **पोर्तलुइ**), **सेचेल** आणि **सोकोत्रा** हीं **इंग्लिशां**चे ताब्यांत आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—सोनें, हस्तिदंत, रबर, आणि डीक हे व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत. पूर्व किनाऱ्यावर गुलामांचा मोठा व्यापार चालत असे परंतु **झांजिबारचे सुलतानानें** तो व्यापार आतां अगदीं बंद केला आहे. **मारिशस** बेटांत उत्तम साखर तयार होते.

पूर्व किनाऱ्यावर **अरब** व्यापाऱ्यांचा मोठा भरणा आहे. दक्षिणेकडे **काफर** लोकांसारखे व उत्तरेकडे **अबिसीनियां**तील लोकांसारखे लोकांची वस्ती आहे. हे लोक पश्चिम आणि मध्यआफ्रिकेंतील **सिद्धि** लोकांपेक्षां सुधारलेले आहेत.

## ५. मध्यआफ्रिका.

**मध्यआफ्रिके**तील पुष्कळ प्रदेशाचा अजून पुरा शोध लागला नाहीं. तरी त्या भागांत पुढें लिहिल्याप्रमाणें चार देश आहेत.

१ **सहाराचें मोठें मैदान.**
२ **सौदन ऊर्फ निग्रिशिया.**
३ **कांगोफ्रीस्तेत** (**कांगो**नदीचे कांठचें स्वसत्ताक राज्य).
४ **ब्रितिश सेंत्रल आफ्रिका.**

**१. सहाराचें मोठें मैदान**—हें **बार्बरी** संस्थानचे दक्षिणेस असून त्याचे पूर्वेस **ईजिप्त** व पश्चिमेस **अतलान्तिक** महासागर आहे. ह्या मैदानांत पुष्कळ सुपीक व ओलाव्याच्या जागा आहेत. तेथें **बार्बरी** संस्थानें व **सौदन** ह्यांचे दरम्यान उंटावर बसून जाणारे येणारे व्यापारी **कारवान** लोक मुक्काम करितात. **फेजान**चा सुपीक प्रदेश ह्याच मैदा-

नांत आहे. ह्या मैदानांतील लोक **बार्बरी** संस्थानांतील लोकांसारखे असून **मुसलमानी** धर्माचे आहेत.

२. **सौदन ऊर्फ निग्रिशिया**—हा देश **सहारा**चे दक्षिणेस आहे. ह्याचे पश्चिमेस **सेनिगांबिया**, दक्षिणेस **वरचा गिनि** आणि पूर्वेस **आबिसीनिया** हे देश आहेत. ह्या देशाचे पूर्व भागांतील **सेन्नार, कारदोफान, दारफर** वगैरे प्रांतांवर **ईजिप्त**चे राजाचा हक्क आहे. बाकी सर्व देश तद्देशीय संस्थानिकांचे ताब्यांत आहेत.

**सौदन** हें **सिद्धी** लोकांचें मूळ घर होय. त्यांपैकीं **फुलबे** अथवा **फुल्हा** ह्मणून एक मिश्र जात आहे, ती मोठी हिम्मतवान आहे. ह्या सर्व लोकांनीं आतां **मुसलमानी** धर्म स्वीकारिला आहे. **फुल्हा** लोकांचें **सोकोतो**चें विस्तीर्ण राज्य व त्याचे ताब्यांतील **ग्यांदो** आणि **आद्‌मावा** हीं संस्थानें मध्यभागीं आहेत, व **बंबारा** आणि **मोसिना** हीं पश्चिम भागीं आहेत. **बोर्नू, बागिरमी** आणि **वडाई** हीं संस्थानें **सिद्धी** लोकांचीं असून **चाद** सरोवराचे सभोंवतीं आहेत.

**शहरें**—**बंबारा**ची राजधानी **सेगो, तिंबक्तु** आणि **से** हीं **नैजर** नदीचे कांठीं आहेत. **सोकोतो**ची राजधानी **कानो**, हें शहर व्यापाराकरितां प्रसिद्ध आहे. **बोर्नू**ची राजधानी **कूका**, हें शहर **चाद** सरोवरावर असून ह्या देशांत सर्वांत मोठें आहे. **आद्‌मावा**ची राजधानी **योलो** हें **बेनू** नदीचे कांठीं आहे.

**पर्वत**—**कोंग**पर्वत हा एका बाजूस **सौदन** व दुसऱ्या बाजूस **सेनिगांबिया** आणि **वरचा गिनी** ह्यांचे मध्यें आहे. **सौदन**चे दाक्षिणेस **चद्दा** नदीचे उगमाजवळ **अतलांतिका** पर्वत आहे.

**नद्या**—**नैजर** ऊर्फ **जोलिबा** ही **कोंग** पर्वतांत उगम पावून वर्तुळाकार मार्गानें **सौदन** आणि **वरचा गिनी** ह्या देशांतून वहात जाऊन दोन मुखांनीं **गिनी**चे आखातास मिळते. **चद्दा** आणि **बेनू** ह्या नद्या **नैजर** नदीस पूर्वेकडून मिळतात.

**सरोवरें**—**चाद** हें गोड्या पाण्याचें मोठें सरोवर आहे पण उथळ आहे. **शारी** व दुसऱ्या नद्या ह्या सरोवरास मिळतात.

३. कांगोफ्रीस्तेत (कांगोनदीचे कांठचें स्वसत्ताक राज्य). सौदनचे दक्षिणेस जें मोठें मैदान आहे त्याला हें नांव दिलें आहे. कांगो नदीचे कांठचा बहुतेक प्रदेश ह्यांत येतो व ह्याचें क्षे० फ० सुमारें दहा लक्ष चौ० मै० आहे. युरोपांतील मुख्य राष्ट्रांच्या सल्यानें सन १८८५त ह्या राज्याची स्थापना होऊन त्याचें आधिपत्य बेलजियमचे राजाकडे देण्यांत आलें. कांगोचे मुखापासून विवी शहरापर्यंत ह्मणजे सुमारें १०० मैलपर्यंत आगबोटी वर जातात; विवीपासून लिओपोल्दविलो पर्यंत सुमारें २०० मैलपर्यंत ह्या नदीस जागजागीं धबधबे आहेत. पण लिओपोल्दविलीपासून स्तानलीचे धबधब्यापर्यंत सुमारें १००० मैलपर्यंत आगबोटी चालतात. विवीपासून लिओपोल्दविलोपर्यंत आ-गगाडीचा रस्ता करण्याचें काम चालू आहे, तें पुरें झालें ह्मणजे समुद्रा-पासून स्तानलीचे धबधब्यापर्यंत प्रवास करणें सुखावह होईल.

शहरें—कांगोचे मुखाजवळ बोमा आणि बनाना हीं चांगलीं बं-दरें आहेत. बोमा हें राजधानीचें शहर आहे. न्यांग्वे हें अरब लो-कांचें व्यापाराचें ठाणें आहे. आग्नेयीस कतंगा येथें तांब्यांच्या मोठ्या खाणी आहेत.

नद्या—मुख्य नदी कांगो ही नाएसा सरोवराचे पश्चिमेस उगम पावून ब्यांग्विओलो आणि मोइरो ह्या सरोवरांतून वहात जाऊन अत्लान्तिक महासागरास मिळते. हिला डावेकडून कसाई आणि उजवेकडून मोबंगी ह्या मोठ्या नद्या मिळतात. कांगो नदीची लांबी ३००० मैल आहे. पण आफ्रिकेंतील इतर नद्यांपेक्षां हींत पाण्याचा सांठा जास्त आहे.

सरोवरें—आलबर्तन्यांझा, आलबर्त एदवर्दन्यांझा, आणि तांगानिका हीं सरोवरें ह्या देशाचे पूर्वबाजूस आहेत.

ह्या देशांत सिद्दी लोक रहातात, परंतु झांझिबार देशांतून अ-रबलोक हस्तिदंत खरेदी करण्याकरितां येतात. हस्तिदंत, रबर आणि ताडाचें तेल हे व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत.

ब्रितिश सेंत्रल आफ्रिका--हा देश कांगो फ्रीस्तेत आणि

**जर्मनपूर्वआफ्रिका** यांचे दक्षिणेस व **झांबिजी** नदीचे उत्तरेस आहे. **नाएसा** सरोवर या देशाचे पूर्वेस आहे व **शायर** नदी त्या सरोवरांतून निघून दक्षिणेकडे वाहत जाऊन **झांबिजी** नदीस मिळते.

**नाएसा** सरोवराचे पश्चिमेकडील प्रदेशांत व **शायर** नदीचे कांठचे प्रदेशांत गुलामांचा व्यापार बंद करण्याकरितां व तेथील लोकांस सुशिक्षित करण्याकरितां कांहीं **इंग्लिश** मिशनरी पुष्कळ वर्षें परिश्रम करीत होते; ह्मणून सन १८९१ त **ब्रितिश** सरकारानें तो मुलूख आपल्या ताब्यांत घेऊन त्याला **ब्रितिश सेंत्रल आफ्रिका प्रोतेक्तरेत** हें नांव दिलें व त्यावर **एक इंपीरियल कमिशनर** नेमिला.

**शहरें—झोंबा** हें राजधानीचें शहर असून **शायर** नदीचे कांठचे उंचवट्याचे प्रदेशांत आहे. **ब्ल्यांतायर** हें मोठें शहर **शायर** नदीचे कांठीं आहे. **लिविंगस्तोनिया** हें **नाएसा** सरोवराचे कांठीं आहे. **चिंद** हें **झांबिजीचे** कांठीं बंदर आहे.

## ६. लगत्याचीं बेटें.

पूर्व किनाऱ्यावरील बेटांचें वर्णन पूर्वींच केलें आहे. ( **पूर्व आफ्रिका** पहा). पश्चिम किनाऱ्यावर **अझोर्स, मदीरा, कानरी** आणि **केपवर्द** हीं बेटें आहेत. (**स्पेन** आणि **पोर्तुगाल** पहा). त्याच किनाऱ्यावर **गिनीचे** आखातांत **फर्नांदोपो** आणि **आनाबोना** हीं **स्पेनच्या** ताब्यांत आहेत. **प्रिन्सेस ऐलंद** आणि **सांतोमे** हीं **पोर्तुगालचे** ताब्यांत आहेत; आणि **दक्षिण अतलांतिक** महासागरांत **असेन्शन** आणि **सेंत हेलिना** हीं **इंग्लिशांचे** ताब्यांत आहेत.

# भाग ५.

## अमेरिका.

**अमेरिका** खंडाच्या उत्तरेस **आर्क्तिक** महासागर आहे; पश्चिमेस **पासिफिक** महासागर आहे; दक्षिणेस **अंतार्तिक** महासागर आहे; आणि पूर्वेस **अतलांतिक** महासागर आहे. **अमेरिका** खंडाचा वायव्य कोंपरा आणि **आशिया** खंडाचा ईशान्य कोंपरा ह्यांच्यामध्यें **बेहरिंगची** सामुद्रधुनी आहे.

**अमेरिका** खंडाचे मोठे दोन भाग आहेत. त्यांस **उत्तर अमेरिका** व **दक्षिण अमेरिका** हीं नांवें चालतात. हे दोन भाग **पानामा** संयोगीभूमीनें जोडले आहेत.

## उत्तर अमेरिका.

**सीमा**—उत्तरेस **आर्क्तिक** महासागर; पश्चिमेस **बेहरिंग**ची सामुद्रधुनी आणि **पासिफिक** महासागर; दक्षिणेस **पानामा** संयोगीभूमि आणि **पासिफिक** महासागर; आणि पूर्वेस **कारिबियन** समुद्र, **मेक्सिको**चा उपसागर आणि **अतलांतिक** महासागर, अशा आहेत.

**उत्तर अमेरिकेंत** चार देश आहेत त्यांचीं नांवें —

| | |
|---|---|
| **१ कानदाचें राज्य.** | **३ मेक्सिको.** |
| **२ युनैतेदस्तेत्स.** | **४ सेंत्रल (मध्य) अमेरिका.** |

**उत्तरअमेरिकेच्या** दक्षिणेस **मेक्सिको**पासून **पानामा** संयोगीभूमीपर्यंत जो चिंचोळा प्रदेश आहे, त्यास **सेंत्रल अमेरिका** ह्मणतात. ह्या देशांत लहान लहान सहा स्वतंत्र संस्थानें आहेत. वर सांगितलेल्या चार देशांशिवाय **उत्तरअमेरिकेच्या** लगत्यास मोठमोठीं अनेक बेटें आहेत, त्यांचें वर्णन पुढें केलें आहे.

**समुद्र**—**कारिबियन** समुद्र **उत्तर अमेरिका** व **दक्षिण अमेरिका** ह्यांच्या मध्यें आहे.

**पर्वत**—**राकी** पर्वतांची ओळ **उत्तर अमेरिकेंत** उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत गेली आहे.

**धर्म* व राज्यरीती**—पूर्वी **अमेरिका** खंडांत मूळचे राहणारे (इंडियन) लोक मात्र राहत असत. परंतु हें खंड इ० स० १४९२ ह्या वर्षीं **कोलंबस** नांवाच्या पुरुषानें शोधून काढिलें; त्या वेळेपासून **युरोप** खंडांतून पुष्कळ लोक तेथें जाऊन राहूं लागल्यामुळें मूळचे लोकांची वस्ती कमी होत गेली. **कानदा** आणि **युनैतेदस्तेत्स** येथें जाऊन राहिलेले लोक **प्रातस्तंत** मताचे असून **इंग्लिश** भाषा बोलतात; बाकी

---

* हा पारिग्राफ उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका ह्या दोन्ही भागांस लागू आहे.

सर्व अमेरिकेंत जाऊन राहिलेले लोक रोमन क्याथलिक मताचे असून स्पानिश अथवा पोर्तुगीज भाषा बोलतात. धर्म आणि भाषा ह्यांमध्यें असा फरक असण्याचें कारण हें आहे कीं, इंग्लिश लोकांनीं उत्तर भागांत आणि स्पानिश व पोर्तुगीज † लोकांनीं मधल्या आणि दक्षिणेच्या भागांत अशी वेगळाली वसाहत केली. अमेरिका खंडांतील बहुतेक देशांत लोकसत्तात्मक राज्यें आहेत.

## १. कानडाचें राज्य.

ह्या राज्यांत, वायव्य कोनांतील प्रदेश शिवाय करून उत्तर अमेरिकेचा सर्व उत्तर भाग येतो. वायव्य कोनांतील प्रदेश पूर्वी रशियाचे ताब्यांत होता; परंतु थोडे दिवसांपूर्वी तो रशियापासून युनैतेदस्तेत्सनें विकत घेतला आहे.

ह्या राज्यांत आंतारियो, कीबेक, नोवास्कोशिया, न्यूब्रन्सविक, मानितोबा, ब्रितिश कोलंबिया आणि प्रिन्स एदवर्द ऐलंद असे सात प्रांत आहेत. हे प्रांत इंग्लंदचे राणीनें नेमलेल्या गव्हरनर जनरलच्या ताब्यांत आहेत. ह्यांशिवाय त्याचे ताब्यांत दोन प्रांत आहेत त्यांत राज्यसंबंधी व्यवस्था अद्यापि झाली नाहीं. ह्या देशाची राजधानी ओतावा शहर आहे.

शहरें—ओतावा नदाचे कांठीं ओंतावा, आणि आंतारियो सरोवराचे कांठीं तोरांतो, हीं आंतारियो प्रांतांत आहेत. ओतावा आणि सेंत लारेन्स ह्या नद्यांचे संगमावर मांत्रियाल, आणि सेंत लारेन्स नदीचे कांठीं कोबेक, हीं कोबेक प्रांतांत आहेत. सेंतजॉन हें शहर न्यूब्रन्सविक प्रांतांत आहे आणि हालिफाक्स हें मोठें बंदर नोवास्कोशिया प्रांतांत आहे.

पर्वत—ह्या देशाचे पश्चिमेस राकी पर्वताची ओळ आहे, ती आर्तिक महासागरापासून युनैतेदस्तेत्सच्या सीमेपर्यंत गेली आहे.

नद्या—सेंतलारेन्स अतलांतिक् महासागरास मिळाली आहे, आणि मांकेंजी ही आर्तिक महासागरास मिळाली आहे.

---

† ब्राझिलचें विस्तीर्णराज्य पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांत आहे.

सरोवरें—सुपीरियर, ह्यूरोन, एरी, आणि आंतारियो हीं कानदा आणि युनैतेदस्तेत्स ह्यांच्या मधल्या सीमेवर आहेत. ह्यांशिवाय विनिपेग, ग्रेतस्लेवलेक व ग्रेतबेरलेक हीं मोठालीं सरोवरें आहेत.

आखातें व उपसागर—बाफिनचा उपसागर ग्रीनलंदचे पश्चिमेस आहे. हद्सनचा उपसागर कानदाचे राज्याचे उत्तरेस आहे. फंदीचा उपसागर न्यूब्रन्सविक आणि नोवास्कोशिया ह्यांच्या मध्यें आहे. सेंतलारेन्सचें आखात, कानदाचें राज्य आणि न्यूफौन्दलंद बेट ह्यांच्या मध्यें आहे.

सामुद्रधुन्या—बेलीएलची सामुद्रधुनी न्यूफौन्दलंद आणि अमेरिकेचा ईशान्य कोन (लाब्रादोर) ह्यांच्या मध्यें आहे. देविसची सामुद्रधुनी बाफिनचा उपसागर आणि अत्लांतिक महासागर ह्यांच्या मध्यें आहे. हद्सनची सामुद्रधुनी हद्सनचा उपसागर आणि अत्लांतिक महासागर ह्यांच्या मध्यें आहे. बारोची सामुद्रधुनी आणि स्मिथची सामुद्रधुनी ह्या बाफिनचा उपसागर आणि आर्तिक् महासागर ह्यांच्या मध्यें आहेत.

भूशिरें—चद्ले, चार्लस आणि सेबल हीं मुख्य भूशिरें आहेत.

द्वीपकल्प—नोवास्कोशिया कानदाचे राज्याचे आग्नेयीस आहे.

बेटें—प्रिन्स एद्वर्द ऐलंद पूर्वेकडे आहे. वानकवर ऐलंद ब्रितिश कोलंबियाचे नैर्ऋत्येस आहे. हें बेट आणि युनैतेदस्तेत्स ह्यांच्या मध्यें जूअनदीफ्युकाची सामुद्रधुनी आहे. आन्तिकोस्ती सेंतलारेन्सच्या मुखाजवळ आहे. केप ब्रितन ऐलंद, प्रिन्स एद्वर्द ऐलंदच्या पूर्वेस आहे.

व्यापाराचे जिन्नस—धान्य, लांकूड, मासे, कातडीं, लोंकर हे जिन्नस परमुलखास जातात. ह्यांखेरीज ब्रितिश कोलंबिया प्रांतांत मोठमोठ्या सोन्याच्या खाणी आहेत.

## २. युनैतेदस्तेत्स.

युनैतेदस्तेत्सचें लोकसत्तात्मक राज्य हें पृथ्वीमध्यें जीं फार नामांकित व वजनदार राज्यें आहेत, त्यांपैकीं एक आहे. ह्या रा-

ज्यांत ३७ संस्थानें व जेथें अजून राज्यव्यवस्थेचा जम बसला नाहीं असे १२ प्रांत आहेत. ह्या राज्याचे उत्तरेस **कानदाचें** राज्य आहे; पश्चिमेस **पासिफिक्** महासागर आहे; दक्षिणेस **मेक्सिकोचें** राज्य व **मेक्सिको**चा उपसागर हीं आहेत; आणि पूर्वेस **अतलांतिक्** महासागर आहे. **अमेरिका** खंडाच्या वायव्य कोनांतील प्रदेश जो पूर्वी **रशियाचे** ताब्यांत होता तो आतां ह्या राज्यांत सामील झाला आहे.

**शहरें**—मुख्य राजधानीचें शहर **वाशिंग्तन** हें **पोतोमाक** नदीचे कांठीं आहे. **सेंतलुई मिसूरी** नदीचे कांठीं आहे. **शिकागो** हें **मिचिगान सरोवरा**चे कांठीं आहे. **न्यूआर्लियन्स** हें **मिसिसिपी** नदीचे कांठीं आहे. **सान्फ्रान्सिस्को** हें **कालिफोर्निया** प्रांतांत आहे. शिवाय **न्यूयार्क, ब्रूकलिन, फिलादेलफिया, बालतिमोर, बोस्तन** वगैरे पुष्कळ मोठीं शहरें आहेत.

**पर्वत**—ह्या देशाच्या पश्चिम किनाऱ्याजवळ एक डोंगरांची ओळ आहे, आणि त्या ओळीचे पूर्वेस कांहीं अंतरावर **राकी** पर्वतांची ओळ आहे, ती **कानदाचे** राज्यांतून येऊन **मेक्सिको**कडे गेली आहे. पूर्वेस **सेंतलारेन्स** नदीपासून **मेक्सिकोच्या** उपसागरापर्यंत **आलेघानी** पर्वतांची ओळ आहे.

**नद्या**—**मिसिसिपी** ही मोठी नदी **युनैतेद्स्तेत्स**च्या उत्तरेस **सुपीरियर** सरोवराचे पश्चिमेकडील प्रदेशांत उगम पावून थेट दक्षिणेकडे वहात जाऊन **मेक्सिकोच्या** उपसागरास मिळाली आहे. हिला **राकी** पर्वतांतून **मिसूरी** व **आलेघानी** पर्वतांतून **ओहिओ** ह्या नद्या येऊन मिळतात. शिवाय **तांबडी** नदी व दुसऱ्या पुष्कळ मोठ्या नद्या हिला मिळतात. **रीओग्रांददेलनार्त** ही दुसरी मोठी नदी **राकी** पर्वतांत उगम पावून दक्षिणेकडे वाहत जाऊन नंतर **युनैतेदस्तेत्स** आणि **मेक्सिको** ह्यांचे मधल्या सीमेवरून वाहत गेली आहे. **सेन्तलारेन्स** ही **कानदाचे** राज्यांतून येऊन ह्या देशाचे उत्तर हद्दीवरून वाहत गेली आहे. **युकोन** ही **कानदाचे** राज्यांत उगम पावून

अमेरिकेचे वायव्य कोनांतील प्रदेशांतून वाहत गेली आहे. रीओकोलोरादो ही कालिफोर्नियाचे आखातास मिळाली आहे. शिवाय हद्सन, देलावेर, ससक्कीहाना, कोनितिकत वगैरे अनेक नद्या आहेत.

सरोवरें—मिचिगान हें कानदांतील सरोवरांस लागून आहे. ग्रेत साल्तलेक हें राकी पर्वतांचे पश्चिमेस आहे.

उपसागर—देलावेरचे आणि चेसापीकचे हे पूर्वेकडे आहेत.

भूशिरें—पूर्व किनाऱ्यावर काद, हातेरास आणि सेबल् व पश्चिम किनाऱ्यावर फ्रातरी हीं मुख्य आहेत.

द्वीपकल्पें-फ्लारिदाचें, अत्लांतिक् महासागर आणि मेक्सिकोचा उपसागर ह्यांच्या मध्यें आहे; आणि आलियास्काचें, अमेरिकाखंडाचे वायव्य कोनास आहे.

बेटें—लांगऐलंद, न्यूयार्कचे पूर्वेस आहे. अल्यूशियन बेटें आलियास्काचे नैर्ऋत्येस आहेत.

व्यापाराचे जिन्नस—कापूस, तंबाखू, धान्य आणि तांदूळ हे जिन्नस परमुलखास जातात. वरजिनिया येथील तंबाखू व जार्जिया व कारोलैना येथील कापूस व तांदूळ हे जिन्नस अति उत्तम अशी प्रसिद्धि आहे.

कालिफोर्निया व त्याचे जवळील संस्थानांत सोनें पुष्कळ सांपडतें. दगडी कोळसे, लोखंड व मातीचें तेल वगैरे जिन्नस पुष्कळ संस्थानांतून सांपडतात.

## ३. मेक्सिको.

मेक्सिकोच्या लोकसत्तात्मक राज्यांत २७ संस्थानें व दोन प्रांत आहेत. ह्या राज्याचे उत्तरेस युनैतेद्स्तेत्स, पश्चिमेस पासिफिक महासागर, दक्षिणेस सेंत्रल अमेरिका आणि पूर्वेस मेक्सिकोचा उपसागर हीं आहेत.

शहरें- मुख्य राजधानीचें शहर मेक्सिको आहे. ह्याशिवाय

पूर्व किनाऱ्यावरील **वेराक्रूज** आणि **तांपिको** आणि पश्चिम किनाऱ्यावरील **आकापलको** हीं मोठीं शहरें आहेत.

**पर्वत**—**राकी** पर्वतांची ओळ **युनैतेद्स्तेत्स**मधून येऊन दक्षिणेकडे गेली आहे.

**नद्या**—**रीओग्रांदेंद्लनार्त** ही **मेक्सिको**च्या उत्तर सीमेवरून वाहत जाऊन **मेक्सिको**च्या उपसागरास मिळाली आहे.

**आखातें**—पूर्वेस **मेक्सिको**चें व पश्चिमेस **कालिफोर्नियाचें**, अशीं दोन आखातें आहेत.

**द्वीपकल्पें**—**युकातान**चें, **मेक्सिको**चें आखात आणि **कारिबियन** समुद्र ह्यांच्या मध्यें आहे. **खालचा कालिफोर्निया**, हें द्वीपकल्प **कालिफोर्नियाचें** आखात आणि **पासिफिक** महासागर ह्यांच्या मध्यें आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—रुपें, तांबें, किरमिजी दाणा, नीळ, कातडीं आणि महागनी वगैरे लांकडें हे आहेत.

## सेंत्रल ( मध्य ) अमेरिका.

**सेंत्रल अमेरिका मेक्सिको**च्या दक्षिणेस आहे. त्यांत पांच लोकसत्तात्मक संस्थानें व एक इंग्लिश लोकांचें संस्थान अशीं सहा संस्थानें आहेत. त्यांचीं नांवें:—

| संस्थानें. | राजधान्या. |
|---|---|
| १ **ग्वातिमाला** ................ | **न्यूग्वातिमाला.** |
| २ **ब्रितिशहांदूरास** ........... | **बेलिज.** |
| ३ **हांदुरास** ........... ..... | **कोमायाग्वे.** |
| ४ **सान्साल्वादोर** ........... | **सान्साल्वादोर.** |
| ५ **निकाराग्वे** ................ | **मानाग्वे.** |
| ६ **कास्तारिका** .............. | **सानजोसी.** |

**सरोवरें**—**निकाराग्वे** हें मुख्य सरोवर आहे.

**आखातें**—**हांदुरास**चें आखात पूर्वेकडे आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—नीळ, किरमिजी दाणा आणि डुंक हे आहेत.

## ५. लगत्याचीं बेटें.

पूर्वी सांगितलेल्या बेटांशिवाय **उत्तर अमेरिकेचे** लगत्यास पुष्कळ बेटें आहेत. त्यांत **ग्रीनलंद, न्यूफौंदलंद, वेस्त इंदिया बेटें** आणि **बर्म्यूदा** बेटें हीं मुख्य आहेत.

१. **ग्रीनलंद**–हें बेट **अमेरिका** खंडाच्या ईशान्य कोनास आहे. हें **देनमार्क**चें ताब्यांत आहे. **ग्रीनलंद** हा **अमेरिका** खंडाचाच भाग अशी पूर्वी समजूत होती, परंतु तें बेट आहे असा आतां निर्णय झाला आहे. **बेहरिंगच्या** सामुद्रधुनीपासून **बाफीनचे** उपसागरास जाण्यास जळमार्गाचा रस्ता खास आहे, परंतु तो नेहमीं बर्फानें बुजलेला असतो.

२. **न्यूफौंदलंद**–हें बेट **कानदाचे** राज्याचे पूर्वेस आहे. हें **इंग्लिशांचे** ताब्यांत आहे. ह्यांत **सेन्तजॉन्स** हें राजधानीचें शहर आहे. ह्या बेटाचे किनाऱ्यास भूशिरें पुष्कळ आहेत. त्यांत **केप-रेस** हें मुख्य आहे. ह्या बेटाचे किनाऱ्यावर मासे धरण्याचें काम जसें चालतें तसें पृथ्वीमध्यें दुसरे कोठेंही चालत नाहीं.

३. **वेस्त इंदिया बेटें**–ह्या बेटांचे चार समुदाय आहेत. त्यांचीं नांवें–१ **बाहामा बेटें**, २ **ग्रेतर आंतिलिस बेटें**, ३ **लेसर आंतिलीस** (वाऱ्याकडचीं) **बेटें**, आणि ४ **लीवर्द** **ऐलंद** (वाऱ्या-समोरचीं) **बेटें**.

**बाहमा बेटें**—हीं बेटें सुमारें ५०० असून **इंग्लंद**चे ताब्यांत आहेत. यांत **ग्रेत बाहमा, न्यूप्राविदेन्स** आणि **सान्साल्वादोर** मुख्य आहेत. येथील मुख्य शहर **नासाऊ** हें **न्यूप्राविदेन्स** बेटांत आहे.

**ग्रेतर आंतिलीस बेटें**—ह्यांत **क्यूबा, जमेका, हैती** ऊर्फ **स्यान दोमिंगो** आणि **पोर्तोरीको** हीं मोठीं आहेत. **क्यूबा स्पेन**-च्या ताब्यांत आहे. त्याची राजधानी **हवाना** आहे. **जमेका इंग्लंदचे** ताब्यांत आहे. त्यांत **किंग्स्तन** हें मुख्य शहर आहे.

**लेसर आंतिलिस ऊर्फ विंदवर्द बेटें आणि लीवर्द**

**ऐलंद् बेटें**—ह्या समुदायांपैकीं बहुतेक बेटें, इंग्लंद, स्पेन आणि **फ्रान्स** ह्यांचे ताब्यांत आहेत. **इंग्लंद**चे ताब्यांतील **त्रिनिदाद्** आणि **बारबेदोज** आणि **फ्रान्स**चे ताब्यांतील **मार्तिनिक** आणि **ग्वादालूप** हीं मुख्य आहेत.

**व्यापाराचे जिन्नस**—साखर, बुंद, तंबाखू, सुंठ, कापूस वगैरे जिन्नस **वेस्तइंदिया** बेटांतून बाहेर जातात.

**४. बर्म्यूदा बेटें**—हीं **युनैतेद्स्तेत्स**च्या पूर्वेस **अत्लांतिक** महासागरांत आहेत. हीं सुमारें ३०० असून **इंग्लंद**चे ताब्यांत आहेत.

## दक्षिण अमेरिका.

**दक्षिण अमेरिका** ही उत्तरेस मात्र **सेंत्रल अमेरिकेशीं पानामा** संयोगीभूमीनें जोडलेली आहे. बाकी सर्व बाजूंनीं **दक्षिण अमेरिकेस** पाण्याचा वेढा आहे. तो असा–उत्तरेस **कारिबियन** समुद्र; पश्चिमेस **पासिफिक्** महासागर, दक्षिणेस **अन्तार्तिक** महासागर आणि पूर्वेस **अत्लांतिक** महासागर.

दक्षिण **अमेरिकेंत** बारा देश आहेत, त्यांचीं नांवें.

**१ कोलंबिया, २ वेनेजुएला, ३ इक्वेदोर, ४ गियाना, ५ ब्राजिल, ६ पेरू, ७ बोलिविया, ८ चिली, ९ आर्जेंतैन कान्‌फेद्रेशन, १० पाराग्वे, ११ युराग्वे** आणि **१२ पातागोनिया** व दक्षिणेकडील बेटें.

**समुद्र**—**कारिबियन** समुद्र **वेस्त इंदिया** बेटें आणि दक्षिण-**अमेरिका** ह्यांच्या मध्यें आहे.

**पर्वत**—**आंदिज** पर्वतांची ओळ **सेंत्रल अमेरिके**पासून **दक्षिण अमेरिके**चे पश्चिम भागांतून थेट दक्षिण टोंकापर्यंत गेली आहे.

### १. कोलंबिया.

**कोलंबिया** हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी **बोगोता** आहे.

**नद्या**—**मागदालिना** ही **आंदिज** पर्वतांत उगम पावून **कारिबियन** समुद्रास मिळाली आहे.

**आखातें आणि उपसागर**--**दारियन**चें आखात **कारिबियन** समुद्रांत आहे व **पानामा**चा उपसागर **पासिफिक** महासागरांत आहे.

**पानामाचे** उपसागरावर **पानामा** शहर आहे. ह्या शहरा-पासून **पानामा** संयोगीभूमीचे दुसरे आंगास **आस्पिनवाल** शहरापर्यंत आगगाडीचा रस्ता केला आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—कापूस, नीळ, रबर व एके प्रकारची औषधी साल, हे आहेत.

## २. वेनेज़ुएला.

**वेनेज़ुएला** हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी **काराकास** आहे.

**नद्या**--**ओरिनोको** ही प्रसिद्ध नदी **अत्लांतिक** महासागरास मिळाली आहे.

**आखातें**—**वेनेज़ुएला**चें आखात **कारिबियन** समुद्रांत आहे.

**सरोवरें**—**माराकैबो** हें मुख्य सरोवर आहे.

ह्या देशांतून मुख्यत्वेंकरून कापूस परमुलखास रवाना होतो.

## ३. इक्वेदोर.

**इक्वेदोर** हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी **कीतो** आहे

**पर्वत**—**कोतोपाक्सी** आणि **चिंबोराजो** हे पर्वत **आंदिज** पर्वतांच्या ओळींत आहेत.

**उपसागर**—**ग्वायाक्विल**चा उपसागर **पासिफिक** महासागरांत आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—नारळ, रबर, व एक प्रकारची औषधी साल हे आहेत.

## ४. गियाना.

**गियाना** देशाचे तीन भाग आहेत, त्यांचीं नांवें—

| | | |
|---|---|---|
| १ **ब्रिटिश गियाना.** | राजधानी. | **जार्जतौन.** |
| २ **डच्च गियाना.** | ,, | **पारामारिबो.** |
| ३ **फ्रेंच गियाना.** | ,, | **कायेनी.** |

**नद्या**—**एसेक्विबो** आणि **सुरिनाम** ह्या **अत्लांतिक** महासागरास मिळाल्या आहेत

**व्यापाराचे जिन्नस**—साखर, काकवी, दारू, बुंद, मिरची, मसाल्याचे पदार्थ, कापूस औषधी द्रव्यें वगैरे आहेत.

### ५. ब्राजिल.

**ब्राजिलच्या** विस्तीर्ण लोकसत्तात्मकराज्यांत २१ संस्थानें आहेत.

**शहरें**–मुख्य राजधानीचें शहर **रिओदेजानैरो**, हें मोठें बंदर आहे. **बाहिया** ऊर्फ **सानसाल्वादोर** हें बंदर **आलसेंत्सवे** नांवाच्या उपसागरांत आहे. **रेसिफी** ऊर्फ **पेरनामबुको** हें बंदर **बाहियाचे** उत्तरेस आहे.

**नद्या–आमाजोन, नैल** शिवाय करून पृथ्वींत सर्वांहून मोठी **नदी**, ही **आंदिज** पर्वतांत उगम पावून **अतलांतिक** महासागरास मिळाली आहे. शिवाय **तोकान्‌तिन्स** आणि **सानफ्रान्सिस्को** ह्या मोठ्या नद्या आहेत.

**भूशिरें—केपसेंतरोक** पूर्वेकडे आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—कापूस, साखर, मौल्यवान धातु आणि रत्नें हे आहेत.

### ६. पेरू.

**पेरू** हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी **लीमा** शहर आहे. **कुथको** ही पूर्वीचे राजांची राजधानी होती. **कालाव** हें **लीमाचे** उत्तरेस बंदर आहे.

**पर्वत—आंदिज** पर्वतांची ओळ ह्या देशांतून गेली आहे.

**सरोवरें—तितिकाका** हें सरोवर दक्षिण हद्दीवर आहे.

**व्यापाराचे जिन्नस**—सोरा, अलपाकाची लोंकर, धातु, रत्नें, ग्वानो* हे आहेत.

### ७ बोलिविया.

**बोलिविया** हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी **ओरूरो** शहर आहे. शिवाय **लापाज,** आणि **चुकीसाका** हीं मोठीं शहरें आहेत. **पोतोसी** रुप्याच्या खाणींकरितां प्रसिद्ध आहे.

**पर्वत—सोराता** आणि **इलिमानी** हीं **आंदिज** पर्वतांचे ओळींत उंच शिखरें आहेत.

---

* पेरू देशाचे पश्चिमेकडील बेटांत पक्ष्यांची शीट सांपडते तीस ग्वानो ह्मणतात. ह्या शिटीचें शेतांकरितां उत्तम खत होतें.

सरोवर—तितिकाका हें सरोवर उत्तर हद्दीवर आहे.

व्यापाराचे जिन्नस—रुपें, तांबें, कथील, व दुसऱ्या धातु, नारळ, बुंद, अलपाकाची लोंकर, व एक प्रकारची औषधी साल, हे आहेत.

## ८. चिली.

चिली हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी सांतियागोदेचिली आहे. वालपारैसो हें मुख्य बंदर आहे.

पर्वत—आंदिज पर्वतांची ओळ ह्या देशांतून गेली आहे.

बेटें—चिलोई आणि जुवानफरनानदीज हीं मुख्य बेटें आहेत.

व्यापाराचे जिन्नस—रुपें, तांबें, गहूं, कापूस, आणि लोंकर हे आहेत.

## ९. आर्जेंतैन कानफेदरेशन ऊर्फ लाप्लाता.

ह्या लोकसत्तात्मक राज्याची राजधानी बुएनोस ऐरेस हें शहर रिओदेलाप्लाता खाडीचे दक्षिण अंगास आहे.

नद्या—पाराना ही रिओदेलाप्लाताचे खाडीस मिळते.

व्यापाराचे जिन्नस—कातडीं आणि चरबी हे आहेत.

## १०. पाराग्वे.

पाराग्वे हें लोकसत्तात्मक राज्य आहे. त्याची राजधानी असनशिअंन ही पाराग्वे नदीचे कांठीं आहे.

नद्या—पाराग्वे आणि पाराना ह्या मुख्य नद्या आहेत. पाराग्वे ह्या देशाचे पश्चिम हद्दीवरून व पाराना पूर्व आणि दक्षिण हद्दींवरून वाहत जाऊन नैर्ऋत्य कोनावर त्यांचा संगम झाला आहे.

व्यापाराचे जिन्नस—चहा, तंबाखू आणि कातडीं हे आहेत.

## ११. युराग्वे.

युराग्वे हें लोकसत्तमाक राज्य आहे. त्याची राजधानी मांतेविदियो हें रिओदेलाप्लाताचे मुखाजवळ आहे.

नद्या—युराग्वे ही या देशाचे पश्चिम हद्दीवरून वाहत जाऊन रिओदेलाप्लाताचे खाडीस मिळाली आहे.

व्यापाराचे जिन्नस—कातडीं, चरबी, हाडें, आणि लींकर हे आहेत.

### १२. पातागोनिया व दक्षिणेकडील बेटें.

**पातागोनिया** हा देश **चिलीचे** ताब्यांत आहे, परंतु तेथील लोक अगदीं अडाणी आहेत.

**पातागोनियाचे** दक्षिणेस पुष्कळ बेटें आहेत. त्यांत **तेरादेलफुएगो, स्तातेन, फाकलंद** बेटें आणि **सौथ जार्जिया,** हीं मुख्य आहेत. **तेरादेलफुएगो** नांवाचीं पुष्कळ बेटें आहेत.

हीं बेटें आणि **पातागोनिया** देशाचा दक्षिण किनारा ह्यांच्या मध्यें **मागेलनची** सामुद्रधुनी आहे. ह्या बेटांपैकीं अगदीं दक्षिणेकडील बेटावर **केप हार्न** म्हणून एक भूशिर आहे. तें अमेरिका खंडाचे अगदीं दक्षिणेकडचें टोंक होय. ह्या बेटाजवळ समुद्र फार तुफान असतो म्हणून लोक ह्या टोंकास वळसा घालून न जातां फारकरून **मागेलनचे** सामुद्रधुनींतून जातात.

**फाकलंद बेटें** इंग्लिशांचे ताब्यांत आहेत. परंतु त्यांत वस्ती फारशी नाहीं.

---

## भाग ६.

### ओशियानिया.

**पासिफिक** महासागरांत जीं असंख्यात बेटें आहेत त्या सर्वांस मिळून **ओशियानिया** असें नांव आहे. ह्या बेटांचे चार भाग कल्पिले आहेत. ते असे.—१. **मलायाशिया,** २. **आस्त्रालेशिया,** ३. **मैक्रोनेशिया** आणि ४. **पोलिनीशिया.**

### १. मलायाशिया.*

**आशियाखंडाच्या** आग्नेयी दिशेस **पासिफिक** महासागरांत जीं बेटें आहेत त्यांस **मलायाशिया** अथवा पूर्वेकडील द्वीपसमूह म्हणतात. **मलायाशिया** हा **ओशियानियाचा** वायव्येकडचा भाग आहे. त्यांत पांच मोठे समुदाय आहेत. त्यांचीं नावें:—

---

* मलायी लोकांचीं बेटें.

| समुदाय. | मुख्य बेटें. |
|---|---|
| १ संदा बेटें ................ | सुमात्रा आणि जावा. |
| २ बोर्निओ बेटें ................ | बोर्निओ. |
| ३ सेलिबीज बेटें................ | सेलिबीज. |
| ४ मोलक्का ऊर्फ मसाल्याचीं बेटें... | अंबोयना. |
| ५ फिलिपैन बेटें................ | लूझोन. |

ह्या बेटांत मलायी लोकांची वस्ती फार आहे.

हीं बेटें फार सुपीक आहेत. त्यांत मसाल्याचे पदार्थ, साखर, बुंद, नीळ, तांदूळ आणि तंबाखू ह्यांचें पुष्कळ पीक होतें.

१ संदा बेटें—सुमात्रा हें मलायाशियामध्यें अगदीं पश्चिमेकडचें बेट असून मलायाचे द्वीपकल्पाचे दक्षिणेस आहे. हें बेट आणि मलाया ह्यांचे मध्यें मलाक्काची सामुद्रधुनी आहे. या बेटाचे उत्तरेकडील व पूर्वेकडलि प्रदेशांत तद्देशीय लोकांचीं कांहीं संस्थानें आहेत. त्यांत आचीन आणि सिआक हीं संस्थानें प्रमुख आहेत; बाकी सर्व बेट दच लोकांचे ताब्यांत आहेत. पादांग आणि बेनकूलेन हीं त्यांचीं मुख्य शहरें आहेत.

जावा बेट सुमात्राचे दक्षिणेस असून त्या दोन बेटांमध्यें संदाची सामुद्रधुनी आहे. जावा हें दच लोकांचे ताब्यांत आहे. त्याची राजधानी बाताविया शहर आहे. सुरबाया आणि समरंग हीं चांगलीं बंदरें आहेत.

ह्या समुदायापैकीं कांहीं लहान बेटांत पोर्तुगीज लोकांचीं ठाणीं आहेत.

२. बोर्निओ बेटें—यांत बोर्निओ हें सर्वांत मोठें बेट आहे. या बेटाचा बहुतेक भाग दच लोकांच्या ताब्यांत आहे. ह्या बेटांतील सरावक प्रांत व बोर्निओ शहराचे उत्तरेकडील लाबुआन बेट हीं इंग्लिशांचे ताब्यांत आहेत. ब्यांजरमासिन आणि पांतिआनक हीं मुख्य शहरें आहेत.

३. सेलिबीज बेटें—ह्यांत सेलिबीज हें सर्वांत मोठें बेट असून दच लोकांचे ताब्यांत आहे. ह्यांत मेनादो आणि मकासर हीं मोठीं शहरें आहेत.

४. **मोलक्का बेटें** ऊर्फ मसाल्याचीं बेटें—ह्यांपैकीं बहुतेक बेटें **डच** लोकांचे ताब्यांत आहेत. **अंबोयना** बेट ही व्यापाराची मुख्य जागा आहे.

५. **फिलिपैन बेटें**—**मलायाशिया**मध्यें हीं अगदीं उत्तरेकडचीं बेटें आहेत. ह्यांपैकीं बहुतेक बेटें स्पेनच्या ताब्यांत आहेत. ह्यांमध्यें **लूजोन** हें मोठें बेट आहे. त्यांत **मानिल्ला** हें मुख्य शहर आहे.

## आस्त्रालेशिया.*

**आस्त्रालेशिया** हा **ओशिनिया**चा नैर्ऋत्येकडचा भाग आहे. येथील मूळचे राहणारे लोक **मलायो** लोकांसारखे नसून काळ्या रंगाचे आहेत ह्मणून **आस्त्रालेशियास मेलानेशिया** असेंही ह्मणतात.

**आस्त्रालेशियां**त **आस्त्रालिया**, **तासमानिया**, **न्यूजीलंद**, **न्यू क्यालेदोनिया**, **न्यूहेब्रेदोज**, **फीजी** बेटें, **सालोमन** बेटें, **न्यू-ब्रिटन**, **न्यूअयर्लंद**, **न्यूगिनी** व आणखी पुष्कळ बेटें आहेत. ह्यांतून पहिल्या तीन बेटांत इंग्लिश लोकांनीं वसाहत केली आहे.

१. **आस्त्रालिया**—ह्या बेटाला **पूर्वीं न्यूहालंद** ह्मणत असत. हें पृथ्वीमध्यें सर्वांहून मोठें आहे, ह्मणून त्याला **महाद्वीप**ही ह्मणतात. त्याचें क्षेत्रफळ **यूरोपखंडा**च्या $\frac{६}{७}$ क्षेत्रफळाबरोबर आहे.

**सामुद्रधुन्या**—**टॉरेस**ची सामुद्रधुनी **आस्त्रालिया** आणि **न्यू-गिनी** ह्यांच्यामध्यें आहे. **बास**ची सामुद्रधुनी **आस्त्रालिया** आणि **तासमानिया** ह्यांच्या मध्यें आहे.

**आखातें**—**कार्पेंतारिया**चें आखात उत्तरेस आहे. **आस्त्रालियन बाइत** हें मोठें आखात दक्षिणेस आहे.

**समुद्र**—**आस्त्रालिया**चा ईशान्य किनारा आणि **सालोमन** बेटें ह्यांच्या मधील समुद्रांत **पोवळ्यांच्या** किड्यांपासून झालेले खडक व बेटें आहेत ह्मणून त्यास **पोवळ्यांचा** ( कारल ) समुद्र ह्मणतात.

**आस्त्रालिया इंग्लंद** देशाचे ताब्यांत आहे. वसाहतीचे मानानें त्याचे पाच विभाग झाले आहेत, व ते **राणी**नें नेमलेल्या **गवरनरां**चे ताब्यांत आहेत. त्यांचीं नांवें.-

---

*आशियाचे दक्षिणेकडील.

| विभाग. | राजधानी. |
| --- | --- |
| **क्वीन्सलँद्** ................. | **ब्रिसबेन.** |
| **न्यूसौथवेल्स.** ...... ........ | **सिद्नी.** |
| **विक्टोरिया** ............. ..... | **मेलबोर्न.** |
| **दक्षिण आस्त्रालिया** ... . ...... | **आदेलेद्.** |
| **पश्चिम आस्त्रालिया** ........ ... | **पर्थ.** |

ह्या बेटांत व्यापार मोठा चालतो. लोंकर, सोनें, तांबें, कथील, शिसें, तेल, चरबी, कातडीं, कापुस, साखर, धान्य, वगैरे जिन्नस परमुलखास जातात.

२. **तासमानिया**—ह्या बेटास पूर्वी **वान्दिमन्सलांद्** ह्मणत असत. हें बेट **इंग्लंदचे राणीनें** नेमलेल्या **गवरनराचे** ताब्यांत आहे. ह्यांत **होबर्टतौन** हें मुख्य शहर आहे.

लोंकर हा व्यापाराचा मुख्य जिन्नस आहे.

**न्यूजीलंद् बेटें**—ह्या बेटांत **इंग्लिश** लोकांनीं वसाहत केली आहे. हीं बेटें **आस्त्रालियाचे** आग्नेयीस असून त्यांत दोन मोठीं व पुष्कळ लहान आहेत. **नार्थ येलंद्** बेटांत **वेलिंगतन** हें राजधानीचें शहर आहे.

ह्या बेटांत लोंकर आणि सोनें हे व्यापाराचे मुख्य जिन्नस आहेत. **न्यूजीलंद्** बेटांत मूळचे राहणारे लोकांची वस्ती मोठी आहे. त्यांस **माओरीज** ह्मणतात. **माओरीज** हे **मलायी** लोकांसारखे असून **आस्त्रालेशियांतील** इतर मूळचे लोकांपेक्षां सुधारलेले आहेत, ह्यांपैकीं पुष्कळ लोक शेतकी व दुसरे धंदे करितात.

**आस्त्रालेशियांतील** दुसऱ्या बेटांविषयीं फारशी माहिती नाहीं. कांहीं बेटांतील लोक मिशनरी लोकांचे प्रयत्नानें सुधारलेले आहेत. परंतु बाकी सर्व बेटांतील लोक अगदीं अडाणी आहेत. **न्यूकालेदोनिया,** हें बेट **फ्रेंचांचे** ताब्यांत आहे. **फीजी** बेटें **इंग्लिशांचे** ताब्यांत आहेत. **न्यूगिनी ऊर्फ पापुआ** हें मोठें बेट असून त्याचा कांहीं भाग **दच** लोकांचे ताब्यांत आहे. ह्या बेटांतून पर, मसाल्याचे पदार्थ, लांकूड वगैरे जिन्नस बाहेर जातात.

## मैक्रोनेशिया.*

**मैक्रोनेशिया** हा ओशियानियाचा ईशान्येकडचा भाग आहे.

* लहान बेटें.

त्यांत **पासिफिक** महासागरांतील लहान लहान बेटांचे पुष्कळ समुदा य येतात. पैकीं पांच मुख्य आहेत. त्यांचीं नांवें.—

१ **बोनिन** बेटें, **जपानचे** दक्षिणेस आहेत.

२ **लाद्रोन** ऊर्फ **मारियान** बेटें, **फिलिपैन** बेटांचे पूर्वेस आहे..

३ **पेलू** आणि **कारोलैन** बेटें, **लाद्रोन** बेटांचे दक्षिणेस आहेत.

४ **मारशल** बेटें, **कारोलैन** बेटांच्या पूर्वेस आहेत.

५ **सांदविच** बेटें—या समुदायापैकीं **हावाई** हें, **मैक्रोनेशि**यांत सर्वांत मोठें बेट आहे. **ओआहू** बेटांत **होनोलुलु** हें **सांदविच** बेटांत मुख्य शहर आहे.

**मैक्रोनेशियांतील** बेटांची हवा सुंदर व त्यांतील जमीन सुपीक आहे. **लाद्रोन** बेटें **स्पेनच्या** ताब्यांत आहेत. आणि तेथील लोक मुख्यत्वें **स्पानिश** लोकांचे वंशज आहेत बाकी सर्व बेटांत **मलाय्री** लोकाचो वस्ती आहे. हे लोक पूर्वी अगदीं अडाणी होते, परंतु **युरोपियन** व **अमेरिकन** लोकांचे सहवासानें ते दिवसेंदिवस सुधारत चालले आहेत. **सांदविच** बेटांतील राजानें ख्रिस्ती धर्म स्वीकारिला, हें पाहून त्या बेटांतील बहुतेक लोक ख्रिस्ती झाले आहेत.

## पोलिनीशिया.*

**पोलिनीशिया** ऊर्फ **सौथसी पेलंद्** बेटें. हा **ओशियानि**याचा आग्नेयीकडचा भाग आहे. पश्चिमेकडून प्रारंभ केला असतां पुढें लिहिलेले आठ समुदाय त्यांत येतात.—

| | |
|---|---|
| १ **फ्रेंद्ली** बेटें. | ५. **आस्त्राल** बेटें. |
| २. **सामोआ** ऊर्फ **नाविगेतर्स** बेटें. | ६. **लो आर्किपेलागो** |
| ३. **कुक्स** बेटें. | ७. **मार्कीसा** बेटें. |
| ४. **सोसैती** बेटें. | ८. **ईस्तर** बेटें. |

या बेटांतील हवा सुंदर व जमीन सुपीक आहे. त्यांत बहुधा **मला**[य्री] लोकांची वस्ती आहे. हे लोक पूर्वी अगदीं अडाणी होते, परंतु मिश[नरी] लोकांचे प्रयत्नानें ते हळू हळू सुधारत चालले आहेत. **सोसैती** बेटांपैकीं **ताहिती** बेट फार सुंदर व सुपीक आहे. **सोसैती**बेटें, **मार्कीसा** बेटें व **लो आर्किपेलागो**पैकीं कांहीं बेटें, हीं **फ्रेंचांचे** ताब्यांत आहेत.

---

* पुष्कळ अथवा असंख्यात बेटें.

समाप्त.